म. ग्रं. सं. ठाणे

विषय
निबंध

संग्रहालय क्रमांक
८६

लेखक वासुदेव गणेश
सहस्रबुद्धे

सन
१९०४

पुस्तकाचें नांव नीतिशास्त्राचीं
मूलतत्वें

८६

नीतिशास्त्राचीं मूलतत्वें.

निबंध

राठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणें सन १८

# नीतिशास्त्राचीं मूलतत्वें.

हें

पुस्तक

"एलिमेन्ट्स आफ् मोरॅलिटी"

नामक इंग्लिश ग्रंथाच्या आधारें

वासुदेव गणेश सहस्त्रबुद्धे,

"शिक्षणमीमांसे"चे कर्ते,

यांनीं केलें,

तें

मुंबईंत

नेटिव ओपिनियन छापखान्यांत छापिलें.

सन १८९९.

किंमत १० आणे.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

**राव बहादुर न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, सी. आय. ई.,**

यांस

त्यांची अतुल विद्वत्ता, अगाध देशप्रीति, लोकोत्तर सौजन्य इत्यादि अनेक गुणांबद्दल

**ग्रंथकर्त्यानें**

हें

**पुस्तक**

( परवानगीनें )

सम्मानपूर्वक

अर्पिलें असे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

# प्रस्तावना.

---

धर्म व नीति हे शब्द आबालवृद्धांच्या मुखीं आहेत सर्व लोक धर्माच्या व नीतीच्या गोष्टी बोलतात. त्यांचें वास्तविक स्वरूप जाणणें कठीण आहे असें बहुशः कोणाला वाटतही नाहीं. परंतु भिन्न भिन्न जनसमाजांच्या संबंधानें त्या विषयांचा सूक्ष्म रीतीनें विचार करूं लागलें ह्मणजे त्यांचें काठिन्य व्यक्त होऊं लागतें, व तो करतांना मोठमोठ्या तत्वज्ञांचीही मति कुंठित होऊन जाते. त्यांस सुद्धां अव्याप्तिअतिव्याप्तिरहित असें धर्माचें व नीतीचें व्यापक लक्षण करण्यास कठीण पडतें. कित्येक स्थळीं ह्या दोहों विषयांचा संकर झाल्यामुळें त्यांचें पृथकपणें लक्षण करतां येत नाहीं. अशा वास्तविक रीतीनें गहन परंतु लौकिकामध्यें सुलभ मानलेल्या अत्यंत महत्वाच्या विषयांची लोकांस यथार्थ कल्पना आणून देणें किती अगत्याचें आहे हें येथें निराळें सांगावयास नकोच. ती कल्पना अल्पस्वल्प रीतीनें तरी लोकांस यावी ह्या उद्देशानें वरील विषयांचा पूर्वोक्त संकर होण्याचीं कारणें काय, व त्यांचें स्वरूप भिन्नपणानें जाणण्याची आवश्यकता किती आहे ह्या गोष्टींचा प्रथमतः

थोडासा विचार करितों. त्यावरून प्रस्तुत पुस्तकाची आवश्यकता आणि उपयुक्तता ही लोकांच्या ध्यानांत येईल.

प्राचीन काळीं जेव्हां जगांतील लोकांचें परस्परांशीं फारसें दळणवळण नव्हतें, तेव्हां धर्म व नीति ह्यांचें वस्तुतः ऐक्यच होतें असें ह्मटलें तरी चालेल. परंतु पुढें उत्तरोत्तर जगाची आद्य स्थिति बदलत जाऊन दळणवळणाचीं साधनें जसजशीं वाढत चाललीं तसतसा लोकांचा अन्योन्य संबंधही वाढत जाऊन धर्म आणि नीति ह्यांचें पृथक्करण होऊं लागलें, व त्यांचे प्रदेश भिन्न होण्यास सुरवात झाली. हा प्रकार सर्व धर्मांच्यासंबंधानें सारखा घडून आलेला आहे. जगांत सुरू असलेले मुख्य धर्म म्हटले म्हणजे हिंदु, बौद्ध, ख्रिस्ती आणि मुसलमानी हे होत. ह्यांपैकीं प्रत्येकामध्यें धर्मपर आणि नीतिपर वचनांचा सारखा संग्रह झालेला आहे. वेद, उपनिषदें, व भगवद्गीता हे हिंदूंचे परम पूज्य सर्वमान्य धार्मिक ग्रंथ होत. त्या प्रत्येकामध्यें ईश्वरभक्ति, मोक्षप्राप्ति वगैरे गोष्टींचें विवरण आलें असून व्यावहारिक नीतिपर नियमांचाही अंतर्भाव झालेला आहे. परधर्मी लोकांसही हे ग्रंथ परम आदरणीय झाले आहेत ह्याचें इंगित त्यांमध्यें नीतीचीं उदार तत्वें समाविष्ट आहेत हेंच आहे. बौद्ध धर्म तर नीतीच्या नियमांची एक गाथाच आहे. ख्रिस्ती लोकांचें पवित्र शास्त्र बायबल ह्याची रचना अशाच प्रकारची आहे. त्यांमध्यें ईश्वरोपासनेच्या नियमांबरोबर नीतीच्या नि-

यमांचाही समावेश केलेला आहे. त्यांतील दहा आज्ञा नीतिशास्त्राच्या सारभूत वचनांची एक पंक्तिच आहे असें म्हटलें तरी चालेल. मुसलमान लोकांचें धर्मपुस्तक कुराण यामध्यें तरी धर्मपर वचनांबरोबर नीतीचे नियम विधिनिषेधरूपानें दिलेले आहेत. ह्याप्रमाणें लोकांच्या ऐहिक आणि परमार्थिक गरजा एकाच पुस्तकावर भागल्या जाव्या अशा हेतूनें सर्व प्राचीन धर्मपुस्तकें तयार केलेलीं असावीं, असा एक सहजीं तर्क होतो. अत्यंत विरुद्ध जरी नाहीं तरी वस्तुतः भिन्न अशा वस्तूंच्या प्राप्तीच्या साधनांचा एकाच पुस्तकामध्यें संग्रह व्हावा ही गोष्ट दिसण्यामध्यें चमत्कारिक दिसते हें खरें. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति अगदीं तशीच होती, व अजूनही ती बऱ्याच अंशीं तशीच आहे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे.

धर्म व नीति ह्यांचा अशा रीतीनें एकाच ग्रंथामध्यें समावेश होत गेल्यामुळें त्यांच्या ऐक्याची कल्पना लोकांच्या मनांत इतकी दृढ होऊन गेलेली आहे, कीं तीं वस्तुतः भिन्न आहेत हें आमचें विधान पुष्कळांस विलक्षणही वाटेल. परंतु त्यांच्या विषयांचा जरा विचार केला तर असें आढळून येईल कीं, आमचें विधान विलक्षण नाहीं इतकेंच नव्हे, तर तें अगदीं यथार्थ आहे. धर्माचा विषय ईश्वर व परलोक हा आहे. नीतीचा विषय इहलोक आणि भूयिष्ठहितसंपादन हा आहे; धर्म पारलौकिक सुखाचा मार्ग दाखवितो; नीति ऐहिक सुखाची प्राप्ति करून देते; धर्माचीं बंधनें जे

ईश्वर मानतात त्यांनाच लागू आहेत; नीतीची बंधनें अगदीं नास्तिकांसही सुटलेलीं नाहींत. ह्याप्रमाणें ह्या दोन्हींचे विषयच जर भिन्न आहेत, तर त्या परस्परांपासून भिन्न आहेत असें ह्मणण्यामध्यें कोणत्याही प्रकारची अयथार्थता नाहीं हें उघडच दिसतें.

आतां धर्म आणि नीति ह्या दोन भिन्न वस्तूंचा एकाच ग्रंथामध्यें संग्रह करण्यास काय प्रयोजन झालें असावें ह्याचा विचार करूं. ह्याकरितां आधीं धर्माच्या स्वरूपाचें दिग्दर्शन होणें अवश्य आहे. श्रद्धा सर्व धर्माचा पाया आहे. या पायावरच सर्व धर्मरूपी इमारत उभारलेली आहे. श्रद्धेखेरीज सर्व धार्मिकता व्यर्थ आहे; ती धार्मिकता नव्हे दांभिकता आहे. जेथें भाव तेथें देव अशा अर्थाचीं जीं वाक्यें आह्मीं लोकांच्या तोंडून नेहमीं ऐकत असतों, तीं अगदीं यथार्थ आहेत. त्यांमध्यें धर्माचें खरें सार आहे. अशा प्रकारें धर्मास श्रद्धेचा पाया देणें ह्मणजे त्यास कोणत्याही प्रकारची गौणता आणणें आहे, असें नाहीं. ज्या नानाविध मूर्तामूर्तविषयक शास्त्रांचा आमचा जारीनें अभ्यास चालला आहे त्यांच्या तरी मुळाशीं काय आहे? प्रथमतः कांहीं गोष्ट गृहीत धरण्यांत येऊन तिच्या पायावरच त्या त्या शास्त्राची पुढील सर्व रचना केलेली आहे. सर्व शास्त्रांमध्यें अत्यंत अमूर्त शास्त्र ह्मटलें ह्मणजे गणितशास्त्र होय. परंतु त्याचीही सर्व व्यवस्था अशाच प्रकारची आहे. युक्तिडच्या सिद्धांतांची पुढील सर्व सिद्धता ठीक असते, परंतु ती सर्व

पहिल्या तीन गृहीत कृत्यांवर अवलंबून आहे, हें विसरतां कामा नये. ह्याच दृष्टीनें धार्मिक गोष्टींचा विचार केला तर धर्मपुस्तकें ईश्वरप्रणित आहेत असें मानणें, पारलैकिक गोष्टींवर विश्वास ठेवणें, ह्यांत मानवी बुद्धीकडे कांहीं जाड्य किंवा कमीपणा येतो, असें मानण्यास बिलकूल कारण दिसत नाहीं.

ह्याप्रमाणें श्रद्धा जर सर्व धर्मांचा पाया आहे, तर तिच्यावांचून खरें धर्माचरण शक्यच नाहीं, हें स्पष्ट आहे. धार्मिक नियमांचें आपल्या हातून यथार्थ परिपालन होण्यास त्यांच्या अदृष्ट फलावर आमचा पूर्ण विश्वास असला पाहिजे. तसा विश्वास नसेल तर आमचें वर्तन त्या नियमांस अनुसरून कधींही रहावयाचें नाहीं, व तें तसें रहाणार नाहीं तर ते सर्व नियम व्यर्थ होणार आहेत. धार्मिक नियमांस जी गोष्ट लागू आहे ती नीतीच्या नियमांसही लागू असली पाहिजे. नीतिच्या नियमांचे आपल्या हातून योग्य रक्षण होण्यास त्या नियमांच्या फलावरही आमचा विश्वास असला पाहिजे. परंतु नीतिपर वर्तनाचें जगामध्यें जें फल आपल्या अनुभवास येतें त्याचा विचार केला तर असें ह्मणावें लागतें कीं, त्यावरून मनुष्यमात्राचा नीतीच्या नियमांवर विश्वास बसण्याचा संभव दिसत नाहीं. सदाचरणापासून बहुतकरून सुखप्राप्ति होते हें जरी खरें आहे, तरी ती खात्रीनें होतेच होते असा जगामध्यें नेहमीं अनुभव येत नाहीं. कित्येक वेळां अगदीं उलट अनुभव येतो. सदाचारी मनुष्याचे

दिवस अगदीं विपरीत व दारिद्र्यांत जात असल्याचीं, विशेषेंकरून त्याचाच इतर लोकांकडून छळ होत असल्याचीं, आणि दुराचारी मनुष्याचें जगांत चांगलें चालून त्यांस लोकांकडून मान मिळत असल्याचीं उदाहरणें आम्हीं थोडींथोडकीं पहात नाहीं. ह्यावरून पुष्कळांचा असा समज होऊन गेलेला आहे कीं, ऐहिक सुखाच्या प्राप्तीचें मुख्य साधन जें धन तें संपादन करण्याचे मार्गच निराळे आहेत. आमच्यामध्यें जे श्रीमंत ह्मणून गाजत आहेत त्यांच्यापैकीं पुष्कळांकडे बोटें दाखवून लोक धडधडीतपणें असें ह्मणतात कीं, हे सर्व लोकांचीं डबोलीं बुडवून श्रीमंत झालेले आहेत, व ह्मणून लोकांचीं डबोलीं बुडविणें ह्यासारखा श्रीमंत होण्यास दुसरा उत्तम मार्ग नाहीं. जगामध्यें दिवस काढावयाचे ह्मणजे एका कानांत तुळशीपत्र व दुसऱ्या कानांत बिल्वपत्र घालून चालावयाचें नाहीं असें प्रतिपादन करून आपल्या अत्यंत निंद्य कृत्यांचेंही समर्थन करणारे लोक आमच्या नेहमीं पाहण्यांत येत आहेत. ह्याप्रमाणें नीतीच्या दृष्टफलावरच जर तिच्या नियमांचें रक्षण अवलंबून असतें, तर तिच्या संबंधानें जगाची स्थिति फारच विपरीत होऊन गेली असती. आजला जगामध्यें खऱ्या नीतीचा मागमूस तरी राहिला असता कीं काय ह्याचीही शंकाच आहे. ही भावि अनिष्ट स्थिति टाळण्याकरितांच निरनिराळ्या धर्मसंस्थापकांनीं नीतीची अदृष्ट फलाशीं सांगड घालून तिचा धर्मामध्यें समावेश करून घेतला असावा. धर्म

आणि नीति ह्यांचें झालेलें हें ऐक्य जगाच्या एकंदर स्थितीस फारच हितकर झालें आहे. नीतीस धार्मिक महत्व प्राप्त झाल्यामुळें तिच्या नियमांवर लोकांची सहजीं श्रद्धा बसून तिच्या नियमांचें रक्षण अधिक सुकर झालें. आज जगामध्यें जें सत्याचरण, जें पातिव्रत्य, व जें दानशौर्य आपल्या दृष्टीस पडत आहे, त्याचें कारण त्या प्रत्येकाच्या अदृष्ट फलावर लोकांची असलेली बळकट श्रद्धा हेंच होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सत्यरक्षणाकरितां जिवावर उदार झालेल्या पुरुषांचीं, पातिव्रत्य संभाळण्याकरितां प्राणाची आहुति देणाऱ्या स्त्रियांचीं, व दानत राखण्याकरितां सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या माणसांचीं जीं उदाहरणें आम्ही पाहतों त्यांमध्यें त्यांच्या मनांत ऐहिक सुखाची व ऐहिक उपयुक्ततेची कल्पना जागृत होती असें मानण्यास यत्किंचित तरी कारण आहे काय? धर्मपुस्तकामध्यें व पुराणांतरीं त्या सद्गुणांच्या वर्णिलेल्या महत्वावर असलेल्या त्यांच्या श्रद्धेनें त्यांस तीं सत्कृत्यें करण्यास प्रवृत्त केलें आहे ह्याविषयीं काडीमात्र संशय नाहीं. ह्यावरून हें उघड होतें कीं, मनुष्यांची नीतीच्या नियमांच्या परिपालनाकडे प्रवृत्ति होण्यास त्यांच्या अदृष्ट फलावर त्यांचा असलेला विश्वासच मुख्यत्वेंकरून कारणीभूत झालेला आहे; व त्यांच्या मनामध्यें हा विश्वास उत्पन्न करण्यास धर्माचें आणि नीतीचें संमेलन करणें अवश्य झालें असावें.

धर्म व नीति ह्यांच्या ह्या सहजीं झालेल्या एकी-

करणाचें पुन्हां पृथक्करण करण्याची केव्हां वेळ आली ह्याचा आतां विचार करूं. आह्मीं अगदीं प्रारंभीं सांगितलेंच आहे कीं, जगाची आद्य स्थिति जसजशी बदलत गेली तसतसें हें पृथक्करण होण्यास सुरुवात झाली. प्राचीन काळीं जेव्हां दळणवळणाच्या सोयी फारच तुटपुंजीच्या होत्या, तेव्हां लोकांचे ऐहिक व्यवहार फारच नियमित असत. ते बहुधा एका विवक्षित प्रदेशांत राहणाऱ्या एकाच धर्माच्या लोकांपलीकडे जात नसत. परंतु पुढें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार होत जाऊन नौकागमन, आगगाड्या, तारायंत्रें वगैरे प्रवासाचीं व दळणवळणाचीं साधनें जसजशीं प्रचारांत येऊं लागलीं, तसतसा दूरदूरच्या विधर्मी लोकांचा अन्योन्य संबंध जास्त येत गेला. आह्मां हिंदुस्थानांतील लोकांचेंच उदाहरण घ्याना. पूर्वी आमचे सर्व व्यवसाय देशांतल्या देशांत किंबहुना प्रांतांतल्या प्रांतांत चालत होते. वायव्य सरहद्दीवरील अटक शहराच्या पलीकडे जाण्याचा आह्मांस अटकाव होता. ह्या अटकावावरूनच त्या शहरास तें नांव पडलें असावें अशी कल्पना आहे. परंतु आतां जगाच्या पाहिजे त्या भागावर आपण खुशाल जाऊं शकतों. पुराणांतील निरनिराळ्या लोकांच्या वर्णनावरून पाताळाची नुसती आह्मांस कल्पना मात्र होती, परंतु आतां आमचे लोक तेथें जातात, तेथले लोक इकडे येतात, व त्यांचा व आमचा प्रत्यक्ष व्यापार चालतो. अशीच सर्व जगभर स्थिति होऊन गेली आहे. आज या मुंबई शहरांत

अमुक धर्माचे किंवा अमुक देशचे लोक नाहींत असें नाहीं. नुसते सर्व धर्मांचे व सर्व देशचे लोक आहेत इतकेंच नव्हे, तर त्यांचे सर्कतीनें समाईक धंदे चालले आहेत. याप्रमाणें लोकांचें परस्पर दळणवळण वाढत गेलें, परंतु त्याबरोबर त्यांच्यांतील धर्मभेद यत्किंचित-ही कमी झाले नाहींत इतकेंच नव्हे, तर नेहमीं येणाऱ्या व्यावहारिक संबंधांमुळें त्यांची स्पष्टता अधिकच दिसण्यांत येऊं लागली. धार्मिक गोष्टींच्या संबंधानें लोकांमध्यें पूर्वापार चालत आलेले मतभेद व मातलेले कलह सुप्रसिद्ध आहेतच. ह्या भूतलावर घडून आलेल्या ज्या घोर रणसंग्रामांच्या हकीगती आह्मी इतिहासामध्यें वाचतों त्यांपैकीं अर्ध्या अधिकांच्या मुळाशीं धर्म आहे. सर्व धर्मांचें साध्य जर एक आहे, व त्यांमध्यें जो मतभेद आहे तो जर केवळ साधनांच्या संबंधानें आहे, तर लोकांमध्यें धर्माच्या निमित्तानें असे भयंकर कलह माजण्याचें कांहीं कारण नव्हतें. परंतु त्या गौण मतभेदांसच मनुष्याच्या दुरभिमानाची आणि हट्टवादीपणाची भर पडून उत्तरोत्तर उग्र स्वरूप येत गेलें, व तें या सुशिक्षित व धर्मौदार्याच्या कालामध्येंही वस्तुतः कायमच राहिलें आहे. "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" ह्या उक्तीवरून जर धर्मौदार्याचा कांहीं बोध होत असेल तर त्याचें श्रेय एकट्या हिंदु धर्मासच दिलें पाहिजे, व तेंही हिंदु धर्माच्या अलीकडच्या सुधारलेल्या आवृत्तीस नव्हे, कारण ती उक्ति एका पुरातन हिंदु धर्म ग्रंथांतलीच

आहे. तथापि सर्व धर्मांची पूर्वींपासून परस्परांच्या संबंधानें एकंदरीनें वक्र दृष्टिच आहे व ती पुढेंही अशीच कायम रहाणार ही गोष्ट खरी आहे. ख्रिस्ती आणि महंमदी धर्मांच्या लोकांचे जगांतून इतर धर्म नष्ट करून टाकण्याचे प्रयत्न जरी चालले आहेत, तरी हिंदुधर्मासारखे पुरातन धर्म आपली जागा धरून आहेतच. सारांश, एकंदर आजपर्यंतच्या स्थिती-वरून लोकांचें धार्मिक गोष्टींमध्यें ऐक्य होण्याचा संभव दिसत नाहीं. तें होणें कदाचित् इष्ट असेल, परंतु त्या कामीं लोकांचे प्रयत्न चालूनही तें होत नाहीं एवढी गोष्ट खरी आहे. ह्याप्रमाणें लोकांमधील धर्म-भेद ठाम राहून त्यांच्या व्यावहारिक व्यवसायांचें मात्र स्थित्यंतर झाल्यामुळें त्यांस पूर्वींचीं धर्मान्तर्गत नीति-बंधनें अपुरीं होऊं लागलीं. धार्मिक मतभेद निवळ धार्मिक तत्वांसच धरून राहिले नाहींत, त्यांचा अंमल धर्मान्तर्गत नीतितत्वांपर्यंत येऊन पोंचला. हिंदूंचीं नीतितत्वें मुसलमानांस मान्य होऊं नयेत, मुसलमानांचीं हिंदूंस पसंत पडूं नयेत, व उभयतांची ख्रिस्त्यांस गैर वाटावीं असा प्रकार होऊं लागला. भक्ष्याभक्ष्यविचार, स्नानपानादि गोष्टींचे नियम, व वस्त्रप्रावरणव्यवस्था वगैरे गोष्टींचा शरीररक्षण, शरीरशुद्धि, व शरीराळं-करण ह्यांच्याशीं संबंध आहे; अर्थात् त्या सर्व ऐहिक आहेत. धर्माच्या खऱ्या तत्वांशीं त्यांचा संबंध नाहीं. परंतु त्यांच्या संबंधानेंही लोकांत रणें उसळ-लेलीं आहेत. कधीं कधीं लोक मुख्य धर्मभेद विसरून

जातात, व त्याच्यामधील सर्व श्राद्धें ह्या गोष्टींवरच येऊन बसतात. ही स्थिति खचितच अनिष्ट आहे. एकत्र राहणें जर आतां अवश्य आणि अपरिहार्य झालें आहे, तर लोकांमध्यें नेहमीं अशीं भांडणें व कलह चालणें कधीं चांगलें नाहीं. अनुभवावरून लोकांतील धर्मभेद अजिबात बंद होणें अशक्य दिसतें. परंतु नीतीचीं तत्वें धर्मांत घुसडलीं गेल्यामुळें हरएक गोष्टीच्या संबंधानें त्यांच्यामध्यें उपस्थित हो-णारीं भांडणें जर कांहीं उपायांनीं बंद करितां आलीं, तर तेवढ्याचाही पुष्कळ उपयोग होण्याचा संभव आहे. त्याच्या योगानें लोकांतील एकोपा आणि स-लोखा वाढून सार्वजनिक सुखाच्या वृद्धीस मोठी भर-होणार आहे. धर्मापासून नीतीचीं तत्वें पृथक् करून त्यांतील जीं कांहीं सर्व धर्मांच्या लोकांस मान्य हो-ण्यासारखीं असतील त्यांचा स्वतंत्र संग्रह करून ठेवणें, व जीं मान्य होण्यासारखीं नसतील त्यांच्या संबंधानें अमुक हिंदूंचीं, अमुक मुसलमानांचीं, व अमुक ख्रि-स्त्यांचीं असा स्पष्ट खुलासा करून, त्यांचा वास्तविक धर्माशीं कांहीं संबंध नाहीं, तीं ऐहिक गोष्टींपुरतींच आहेत, अशी सर्वांची समजूत करून देणें, हा आमच्या मतें सार्वजनिक हितवृद्धीचा एक उत्तम उपाय आहे. सार्वजनिक हितसंपादन हें हल्लीं मनुष्यांच्या सर्व कर्तव्यांमध्यें एक अत्यंत महत्वाचें कर्तव्य गणलें जात आहे; व ह्या कर्तव्याच्या सिद्धीस धर्म व नीति ह्यांचें पृथक्करण होणें प्रस्तुत काळीं कसें अवश्य झालें आहे

हें वरील प्रतिपादनावरून सहजीं लक्षांत येण्यासारखें आहे.

ह्याप्रमाणें धर्म व नीति ह्यांचें पृथक्करण करणें जरी इष्ट आणि अवश्यही झालें असलें, तरी तें करण्याचें खरोखर मनांत आणण्यापूर्वी तें कितपत शक्य आहे ह्या गोष्टीचा प्रथमतः विचार झाला पाहिजे. धर्म आणि नीति ह्यांच्या पृथक्करणाच्या अवश्यकतेचा प्रश्न आजच पुढें आला आहे असें नाहीं. सर्व सुधारलेल्या देशांमध्यें त्याच्या संबंधानें कित्येक वर्षे तरी चर्चा चाललेली आहे. परंतु हिंदुस्थानामध्यें मात्र तो प्रश्न विशेष अगत्याचा आणि नडीचा झाला आहे. हा देश अनेक शतकें परसत्ताक्रांत असल्यामुळें त्यांत विधर्मी लोकांची संख्या वाढत चालली आहे. मुसलमान लोकांचें राज्य जरी नष्ट होऊन गेलें, तरी त्या धर्माचे कायमचे रहिवाशी देशांत येऊन राहिले ते राहिलेच. पोर्चुगीज लोकांचा अंमल जरी सर्व देशभर पसरलेला नव्हता, तरी तो जेथें जेथें पसरला, तेथें तेथें त्यांची कायमची वसति झालीच. हल्लींच्या ब्रिटिश राज्यामध्येंही तो प्रकार चाललाच आहे. पोर्चुगीज अंमल सुरू झाल्यापासून व हल्लीं ब्रिटिश अंमलामध्यें कांहीं ह्या देशांतलेच धर्मान्तरानें ख्रिस्ती झालेले व कांहीं जन्मतः ख्रिस्ती परंतु ह्या देशांत रहावयास आलेले अशा लोकांची संख्या बरीच झाली आहे. विलायतेहून येणाऱ्या ब्रिटिश कामगारांस ह्या देशांत कायमचीं घरेंदारें करून रहाण्याचा सरकारांतून प्रतिबंध नसता,

तर आजला ही संख्या केवढी तरी वाढली असती. ही एकंदर देशाच्या संबंधाची स्थिति झाली. मोठमोठ्या शहरांची व्यापारधंद्यांमुळें कशी स्थिति झालेली आहे हें आह्मीं पूर्वीच सांगितलें आहे. तेथें चिनी ह्मणूं नका, जपानी ह्मणूं नका, ग्रीक ह्मणूं नका, सर्व प्रकारचे लोक आहेत. आज हिंदुस्थानांत हिंदु, मुसलमानी, ख्रिस्ती, बौद्ध ह्या चारी मुख्य धर्मांचे लोक आहेत; व त्यांचा हरएक व्यावहारिक गोष्टींमध्यें परस्पर संबंध येत आहे. इतक्या लोकांचे व्यवसाय सुरळीतपणें चालण्यास त्यांस सर्वसाधारण नीतिनियमांचें बंधन असणें किती अवश्य झालें आहे हें निराळें सांगावयास नकोच. परंतु सर्व धर्मांचें मंथन करून तदंतर्गत नीतीचीं सारभूत तत्वरत्नें हुडकून काढण्याच्या प्रयत्नास सुरुवात झाली तर धुमसत असलेले धर्मकलह न जाणों पुन्हां प्रज्वलीत होतील ह्या भीतीनें तो प्रयत्न सतत मागें पडत आला आहे. साधारण लोकांची गोष्ट राहूं द्या, परंतु आपणांस सर्व शक्तिमान् ह्मणविणाऱ्या प्रत्यक्ष ब्रिटिश सरकाराचीही ह्या कामीं पुढें होण्याची छाती होत नाहीं. ह्या सुधारणेच्या एकुणसाव्या शतकामध्यें सर्वच सरकारें लोकशिक्षण हें एक आपलें अत्यंत महत्वाचें कर्तव्य मानीत आलीं आहेत. त्यांतही ब्रिटिश सरकारची ह्या कामीं विशेष ख्याति आहे. तें सरकार नवीन जिंकलेल्या प्रांतांतील लोकांच्या संबंधानेंही आपलें हें कर्तव्य विसरत नाहीं. त्या सरकारानें ह्या देशामध्यें लोकशिक्षणाचा सुरू केलेला अव्याहत

क्रमच त्याचें राज्य लोकप्रिय होण्यास विशेष कारणीभूत झालेला आहे. शिक्षणाची मुख्य अंगें तीन आहेतः—मानसिक, शारीर, आणि नैतिक. ह्यांपैकीं पहिल्याकरितां सरकारानें शाळा, पाठशाळा, व विश्वविद्यालयें स्थापन केलीं आहेत, व दुसऱ्याकरितां ह्याच संस्थांस अलीकडे कोठें कोठें व्यायामशाला, क्रीडाभुवनें, तालीमखाने जोडले आहेत. परंतु तिसऱ्याकरितां मात्र सरकारानें अजून कोठें कांहीं केल्याचें आढळून येत नाहीं. थोड्या वर्षांपूर्वीं चालू शिक्षणक्रमामध्यें कोणत्या सुधारणा होणें इष्ट आहे ह्याचा विचार करण्याकरितां जें एक एतद्देशीय व युरोपियन यांचें मिश्र कमिशन बसविण्यांत आलें होतें, त्या कमिशननेंही नैतिक शिक्षणाच्या संबंधानें कांहीं ह्मणण्यासारख्या सूचना केल्या नाहींत. कमिशनांतील सभासदांनीं सूचना केल्या नाहींत ह्याचें कारण नीतिशिक्षणाचें महत्व त्यांच्या लक्षांत आलें नाहीं हें नव्हे. त्या शिक्षणाचें महत्व त्यांस समजलें होतें. परंतु त्याच्या महत्वाप्रमाणें तें देण्याची शाळांत व पाठशाळांत कशी व्यवस्था करावी, नीतीच्या नियमांचें शिक्षण सुरू करावें, तर ते नियम धर्मांत घुसडलेले, शाळांत व पाठशाळांत तर सर्व धर्मांचीं मुलें आहेत, इत्यादि कारणांमुळें कोणत्या धर्मांतल्या नीतिनियमांचें ग्रहण करावें, ही मोठी पंचाईत आली. ह्या पंचायतींतून पार पडण्याचा त्या कमिशनच्या सभासदांस समाधानकारक मार्ग न दिसल्यामुळें त्यांनीं शाळांमध्यें नीतिशिक्षणाचें स्वतंत्र

क्रमिक पुस्तक असण्याची आवश्यकता नाहीं, शिक्षकांच्या वर्तनावरून व जीं इतर पुस्तकें मुलें वांचतात तेवढ्यांवरून त्यांना जेवढा नीतिबोध होईल तेवढा पुरे, अशा तऱ्हेचा आपला अभिप्राय दिला. सरकारचा १८५७ सालच्या बंडापासून धार्मिक गोष्टींमध्यें उदासीन राहण्याचा निश्चयच झालेला आहे. त्यांना कमिशनचा हा अभिप्राय सहजींच पसंत पडला. त्यानंतर हिंदुस्थान सरकारानें नीतिशिक्षणाच्या संबंधानें एक दोन ठराव प्रसिद्ध केले. परंतु त्यांतही नीतिशिक्षण कसें द्यावें, त्यासंबंधाचें क्रमिक पुस्तक असणें अवश्य आहे किंवा नाहीं वगैरे गोष्टींचा कांहीं एक विचार न करितां सरकारानें उडवाउडवीच केलेली आहे. सरासरी सरकार धर्माप्रमाणें नीतीच्या संबंधानें सुद्धां उदासीनच राहत आलें आहे; व त्याचें कारण अर्थात् सरकारास नीतीचे नियम सर्वांस मान्य होतील अशा रीतीनें शिकविण्याचा मार्ग सुचत नाहीं हेंच आहे.

बरें, नीतिशिक्षणाच्या संबंधानें सरकाराकडून हयगय होत आहे ती आहे; लोकांकडून तरी त्या शिक्षणाच्या प्रसारार्थ कांहीं प्रयत्न होत आहेत काय? कांहीं लोक आपल्या मुलाबाळांस घरोघर स्वधर्मास अनुसरून थोडंबहुत नीतिशिक्षण देण्याचा उद्योग चालवितात, परंतु त्यांचा तो उद्योग शिस्तवार नसल्यामुळें त्याचा ह्मणण्यासारखा उपयोग होत नाहीं. एकंदरीनें नीतिशिक्षणाची जिकडून तिकडून अनास्थाच चालली आहे, व तिचे शोचनीय परिणाम लोकस्थिती-

मध्यें स्पष्टपणें व्यक्त होऊं लागले आहेत. अडाणी व अशिक्षित लोकांची गोष्ट सोडून द्या; शिकलेल्या व सुशिक्षित लोकांमध्यें तरी सत्य, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, देशाभिमान, बंधुप्रीति, सार्वजनिकदृष्टि, भूतदया, मिताहार, मितव्यय, मितभाषण, स्वावलंबन इत्यादि गुणांपैकीं, सर्वांची किंवा पांच चार गुणांची गोष्ट राहिली, एक दोन गुण तरी कायमचे आंगीं आहेत असे किती लोक आढळून येतील? मुळीं मोजण्याचाच प्रसंग यावयाचा नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं, परंतु मोजण्यास फारसा त्रास पडावयाचा नाहीं इतकें तरी खरें. खानेसुमारीप्रमाणें अगदीं मोजदाद घेण्यांत आली तर कदाचित् शिकलेल्या व सुशिक्षित लोकांपेक्षां अडाणी आणि अशिक्षित लोकांतच पूर्वोक्त गुण अधिक प्रमाणानें असल्याचें आढळून येण्याची भीति आहे. विश्वविद्यालयरूपी गिरणींतून प्रतिवर्षी शेंकडों पदवीधर पटपट बाहेर येत आहेत, परंतु त्यांपैकीं पुष्कळांच्या आंगीं वरील गुणांच्या ऐवजीं मनाची अस्थिरता, दुटप्पीपणा, परनेयबुद्धिता, अनुकरणौत्सुक्य, लांगूलचालनप्रवृत्ति, पराधीनता इत्यादि दुर्गुणांचीच विशेष समृद्धि दिसून येते. पदवीधर वर्गाची आह्मी ही विनाकारण अग्रू घेत आहों असें कोणीं समजूं नये. वस्तुस्थितीचें यथार्थ वर्णन करितांना आह्मांस नाइलाजास्तव ह्या गोष्टीचें कथन करावें लागत आहे, व तें करतांना खुद्द आह्मांला वाईटही वाटत आहे. शिक्षणाचा असा विपरीत

परिणाम होत आहे ह्याचें कारण अर्थात् चालू पद्धतीची सदोषता हेंच असलें पाहिजे. शरीराची आणि शिक्षणाची स्थिति सारखी आहे. ज्याप्रमाणें शरीराच्या सर्व अवयवांची वाढ यथाप्रमाणें व एकसमयावच्छेदेंकरून चालली पाहिजे, त्याप्रमाणें शिक्षणाच्याही सर्व अंगांची व्यवस्था योग्य रीतीनें आणि योग्य काळीं होत गेली पाहिजे. शिक्षणाच्या तीन्ही अंगांकडे आह्मांस लक्ष दिलें पाहिजे. नुसतें मानसिक, नुसतें शारीरिक, किंवा नुसतें नैतिक शिक्षण अथवा ह्यांपैकीं कोणतींही दोन हातीं घेऊन चालावयाचें नाहीं. तिन्ही शिक्षणांस एकाच काळीं हळू हळू प्रारंभ झाला पाहिजे. परंतु आमच्या चालू शिक्षणपद्धतीमध्यें नीतिशिक्षणास अजिबात फांटा मिळाल्यासारखाच आहे, व त्याचेच हे शोचनीय परिणाम आह्मी भोगीत आहों. तूर्त आमचें सर्व प्रकारांनीं स्थित्यंतर झालें आहे, व त्या स्थित्यंतरानुरूप आह्मी आपलें वर्तन ठेवण्यास समर्थ झालों तरच आमचा निभाव लागण्याचा संभव आहे. कालमानास अनुसरून ज्याप्रमाणें आह्मीं आपल्या मानसिक शिक्षणाचें सुकाणूं थोडथोडें फिरविलें आहे त्याप्रमाणें आह्मांस आपल्या नीतिशिक्षणाचेंही सुकाणूं थोडथोडें फिरविलें पाहिजे. प्राचीन धर्मग्रंथ किंवा वाडवडील सांगत आले त्याप्रमाणें आह्मी चालूं असेंच, ह्मणून केवळ चालावयाचें नाहीं. बरें, सर्व पूर्व सोडून अगदीं आंतून बाहेरून पाश्चिमात्य साहेब बनूं असें ह्मणणेंही उपयोगाचें नाहीं.

तूर्त आमच्या समाजामध्यें ह्या दोन्ही अत्यंत कोटींचीं माणसें आहेत, व त्यांनींच आमची नीतीच्या संबंधानें ताळ न तंत्र अशी स्थिति करून टाकिली आहे. अशा प्रसंगीं वास्तविक रीतीनें नीतिशिक्षणाचा विशेष प्रकारचा बंदोबस्त असणें अवश्य होतें; परंतु तशा प्रकारचा बंदोबस्त नाहीं इतकेंच नव्हे, तर लोकांनीं व सरकारानेंही तें देण्याचें काम अत्यंत नाजुक व भानगडीचें समजून अगदीं आंगाबाहेर टाकिल्यासारखें केलें आहे. परंतु शिक्षणाच्या एका अत्यंत महत्वाच्या अंगाच्या संबंधानें अशी अनास्था चालावी ही गोष्ट समाजाच्या उत्कर्षास खचित फारच घातुक आहे. ह्यास्तव ही शोचनीय अनास्था दूर करण्याच्या कामीं यथासामर्थ्य प्रयत्न करणें हें प्रत्येक समाजहितेच्छूचें कर्तव्य आहे; व तें कर्तव्य आपल्या हातून अंशमात्र तरी व्हावें एवढ्याकरितांच हा प्रस्तुतचा प्रयत्न आहे.

शाळांमध्यें मुलांस पद्धतवार रीतीनें नीतिशिक्षण देण्याची सुरुवात करण्यास सरकारची मुख्य हरकत तें देण्याचा मार्ग सर्व धर्मांच्या लोकांस पसंत पडे असा शोधूनही सांपडावयाचा नाहीं, ही होय. ही हरकत काल्पनिक नाहीं, खरी आहे. कारण मुलांस पद्धतवार रीतीनें नीतिशिक्षण द्यावयाचें ह्मणजे तें एखाद्या स्वतंत्र क्रमिक पुस्तकाच्या आधारानें देण्यांत आलें पाहिजे. परंतु अजूनपर्यंत तशा प्रकारचें पुस्तक तयार नाहीं, व तें तयार करण्याला कोणी धजतही

नाहीं. नीतीचे नियम धर्मांत घुसडलेले असल्यामुळें त्यांत कोणत्या नियमांचा संग्रह करावा हा पहिला जबरदस्त प्रश्न पुढें येतो. प्रश्न बरोबर आहे, परंतु त्यांतून पार पडण्याचा मार्गच नाहीं असें मात्र आह्मांस वाटत नाहीं. निरनिराळ्या धर्मांत गोंवलेलीं जीं नीतितत्वें आहेत त्यांचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला तर असें आढळून येईल कीं, त्यांपैकीं पुष्कळ सर्व धर्मांस साधारण आहेत, व त्यांसंबंधानें कोणाचाही मतभेद उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. सत्य बोलावें, प्रामाणिकपणानें वागावें, परपीडा करूं नये, दुसऱ्यावर प्रीति करावी हीं तत्वें सर्व धर्मांत सांगितलेलीं आहेत, व तीं हिंदूंस, मुसलमानांस आणि ख्रिस्त्यांस सारखींच मान्य आहेत. अशा तत्वांचा नीतिशिक्षणाचें जें क्रमिक पुस्तक तयार करावयाचें त्यामध्यें संग्रह करण्यास मुळींच हरकत नाहीं. ह्याशिवाय प्रत्येक धर्मामध्यें शरीररक्षण, शरीरशुद्धि वगैरे गोष्टींच्या संबंधानें दुसऱ्या धर्मांतील लोकांस मान्य होणार नाहींत अशा प्रकारचे कांहीं नियम घालून दिलेले आहेत, परंतु ते गौण गोष्टींच्या संबंधाचे आहेत, व त्यांचा त्या पुस्तकामध्यें संग्रह न होणें हेंच बरें आहे. कारण ते तसे घालण्यांत आले तर त्यांच्यासंबंधानें निरनिराळ्या लोकांमध्यें भांडणें सुरू होण्याचा संभव आहे. त्यांचें आचरण करणें हें ज्याच्या त्याच्या खुशीवर अवलंबून राहिलें पाहिजे, व त्यासंबंधानें सर्वांनीं परस्परांविषयीं उदार बुद्धि धारण करणेंच

उचित होईल. आणखीही कांहीं सर्वसाधारण तत्वें त्या पुस्तकामध्यें घालतां येण्यासारखीं आहेत अलीकडे ह्या सुधारणाशतकामध्यें सार्वजनिक दृष्टि, देशाभिमान, सार्वत्रिक भूतदया वगैरे कांहीं नवीन सद्गुण प्रचारांत येऊं लागले आहेत. ते पूर्वी अगदीं अपरिचित होते असें नाहीं, परंतु त्यांचा प्रसार अलीकडेच विशेष होऊं लागला आहे, हें खरें आहे. त्यांस कित्येक इंग्रजी पुस्तकांमध्यें "अर्वाचीन सद्गुण" असें नांव देण्यांत आलें आहे. ते सर्व धर्मांच्या लोकांस सारखे मान्य होण्यासारखे आहेत, व तदंगभूत नीतितत्वांचाही सदहू क्रमिक पुस्तकांत समावेश होण्यास हरकत नाहीं. ह्याप्रमाणें सर्व धर्मांस साधारण असलेलीं व्यापक नीतितत्वें, "अर्वाचीन सद्गुण," व तदंगभूत नीतितत्वें हीं एकत्र करून त्यांचें एक नीतिशिक्षणाचें सर्वमान्य क्रमिक पुस्तक बनवितां येईल अशी आमची पुष्कळ दिवसांपासून कल्पना झालेली होती. ती बरेच दिवस नुसती कल्पनाच राहिली होती. परंतु इंग्रजी भाषेमध्यें तशा प्रकारचें एक पुस्तक पाहण्यांत आल्यापासून ती कल्पना चांगली दृढ झाली. त्या पुस्तकाच्या धोरणानें मराठी भाषेमध्यें एक पुस्तक आपण तयार करावें असें मनांत आलें, व लगेच त्या उद्योगास लागलों. ते जसजसें तयार होत गेलें तसतसें, मुंबईतील सर्वमान्य "नेटिव ओपिनियन" पत्रांत प्रसिद्ध करण्याकरितां पाठवीत गेलों. त्या पत्राच्या मालकांनीं तें मेहरबानीनें छापून प्रसिद्ध केलें, व त्याबद्दल

त्यांचे उपकार मानावे तितके थोडेच आहेत. अखेरीस पुस्तक क्रमाक्रमानें पुरें होऊन ईशकृपेनें तें समग्र छापून प्रसिद्ध करण्याचा आज हा सुदीन आला ह्या गोष्टीचा आह्मांस मोठा आनंद वाटत आहे.

येथें ज्या पुस्तकाच्या आधारावर प्रस्तुत पुस्तक तयार करण्यांत आलें आहे, त्याच्यासंबंधानें दोन शब्द लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं. त्या पुस्तकाचें नांव " Elements of Morality " असें आहे. तें एक प्रसिद्ध इंग्लिश विदुषीनें लिहिलेलें आहे. तिचें नांव **मिसेस चार्लस ब्रे** हें आहे. त्या बाईनें इंग्रजी भाषेमध्यें अशा प्रकारचीं अनेक उपयुक्त पुस्तकें लिहिलीं आहेत. बाई जरी स्वतः धार्मिक ख्रिस्ती आहे, तरी तिनें सर्व धर्मांतील नीतितत्वांचा अगदीं समदृष्टीनें विचार केलेला आहे, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तिनें नीतीचे आत्मविषयकनीति आणि समाजविषयक नीति असे दोन भाग केले आहेत, व त्या त्या भागामध्यें आत्मविषयक कर्तव्यांचा आणि समाजविषयक कर्त्तव्यांचा अगदीं व्यावहारिक उदाहरणें घेऊन अत्यंत सुबोध भाषेनें विचार केलेला आहे. मूळ पुस्तक इंग्लिश समाजास उद्देशून लिहिलेलें असल्यामुळें आह्मांस आपलें पुस्तक तयार करितांना त्यांतील मूळ व्यवस्थेमध्यें थोडथोडी फिरवाफिरव करावी लागली. एकंदरीनें आमचें पुस्तक ज्या समाजाकरितां लिहिलेलें आहे, त्या समाजास तें चांगल्या प्रकारें उपयोगीं पडे अशा रीतीनें

लिहिण्याचा आह्मीं यथाशक्ति प्रयत्न केला आहे, त्याचें सुज्ञ वाचकांनीं मोठी नजर करून चोज करून घ्यावें इतकीच आमची त्यांस सविनय प्रार्थना आहे.

लिहितां लिहितां ही प्रस्तावना बरीच लांबली. आतां एक दोन अत्यंत आवश्यक गोष्टींचा थोडक्यांत उल्लेख करून आह्मी ती पुरी करितों. आह्मांस **मिसेस चार्लस ब्रे** बाईच्या अप्रतिम पुस्तकाचा लाभ आमचे मित्र **प्रोफेसर नारायण गुणाजी वेलिनकर** एम. ए. एलएल. बी. ह्यांच्या परिचयानें झाला. त्यांच्या संग्रहीं तें पुस्तक होतें, व तें आमच्या सहजीं पाहण्यांत आलें. त्यावरून मराठीमध्यें तशा प्रकारचें पुस्तक करावें असें मनामध्यें आलें. मुंबईमध्यें तें पुस्तक त्या वेळीं मिळत नव्हतें. आह्मीं आपला उद्देश मि. वेलिनकर ह्यांस कळविला; व त्यांनीं लगेच मोठ्या आनंदानें आपल्या संग्रहीं असलेली प्रत आमच्या हवालीं केली. ह्याबद्दल आह्मी त्यांचे फार फार आभारी आहों. पुढें पुस्तक मराठींत करण्याची परवानगी मिळविण्याचा प्रश्न आला. ग्रंथकर्त्री बाई पडली विलायतेस; व तेथें अशा विदुषीकडे आमची दाद लागते कशी ? परंतु हें कामही एका सद्गृहस्थाच्या मेहरबानीनें सहजीं झालें. येथील फ्री जनरल असेंब्लीज इन्स्टिटयूशनचे अक्टिंग प्रिन्सिपाल **रे. मि. गार्डनर** एम्. ए. बी. डी. ह्यांनीं त्यासंबंधाची सर्व खटपट करून आह्मांस त्या बाई-

ची आयती परवानगी आणून दिली. त्याबद्दल त्यांचें व त्या बाईचेंही मनापासून आभार मानणें आमचें कर्तव्य आहे.

शाळांतून अनेक धर्मांची मुलें असल्यामुळें नीतिशिक्षणाचें पुस्तक सुरू करण्याचें जोखीम सरकार घेत नाहीं. तथापि सर्व धर्मांच्या मुलांस ग्राह्य होतील, अशा नियमांचें एखादें पुस्तक होऊन मुलांच्या वारंवार वाचण्यांत येईल तर नीतिशिक्षणास मोठें साहाय्य होईल असें अनेक विद्वान् व शिक्षणप्रसारेच्छु सुज्ञ लोकांचें मत आहे, त्यास अनुसरून हें पुस्तक यथाशक्ति केलें आहे. तें लोकांच्या वाचण्यांत येऊन नीतिशिक्षणास बरेंच साहाय्य होईल अशी आशा आहे. ती सर्व शक्तिमान् परमेश्वर सफल करो.

मुंबई, गिरगांव, गोरेगांवकर बिल्डिंग्स, नंबर २२ तारीख ५ मार्च १८९५. } **वासुदेव गणेश सहस्रबुद्धे.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# आमचें ह्या जगामध्यें एकटें राहणें अशक्य आहे.

आपण कोण, व ज्या जगामध्यें आपण जन्मलों आहों तें जग काय आहे, हे विचार मनामध्यें येण्यासारखीं मनुष्यें मोठीं झालीं, ह्मणजे एखादे वेळेस असा प्रश्न त्यांच्या मनांत येईल कीं, "मी जो एक स्वतंत्र प्राणी दिसतों त्या मजमध्यें स्वतंत्र जीवनाची शक्ति असूं नये हें कसें? मी शेवाळीप्रमाणें खडकास चिकटलेला नाहीं, किंवा एखाद्या झाडाप्रमाणें जमिनीमध्यें पुरलेला नाहीं. मला आपल्या मनामध्यें पाहिजे ते विचार आणितां येतात, व आपलें शरीर पाहिजे तिकडे नेतां येतें. परंतु माझ्या बाहेर जें जग आहे त्यापासून जर कोणीं मला एकीकडे नेऊन ठेविलें, तर, ज्याप्रमाणें ती शेवाळी त्या खडकापासून काढिली असतां, किंवा तें झाड जमिनींतून उपटून टाकिलें असतां, खात्रीनें मरेल, त्याप्रमाणें मीही खात्रीनें मरेन."

वास्तविक प्रकार असा आहे कीं, ज्या प्राण्यास आह्मी 'मी' ही संज्ञा देतों, तो प्राणी, जें कांहीं आमच्याबाहेर आहे, त्याच्या योगानें अंशतः बनलेला आहे. ज्या हवेनें मी वेष्टित आहें, ती हवा मला जिवंत राखण्याकरितां माझ्या शरीराच्या अंत बाहेर एकसारखी खेळती राहिली पाहिजे. माझ्या

सभोंवतालीं जगामध्यें जे प्राणी, ज्या वनस्पति, व जे खनिज पदार्थ आहेत, त्यांपैकीं कांहीं मला माझ्या शरीरांतील यंत्रें चालू राखण्याकरितां वेळोवेळीं आंत घेत गेलें पाहिजे, व कांहींचीं मजकरितां वस्त्रें प्रावरणें केलीं पाहिजेत.

त्याचप्रमाणें माझ्या जातीच्या इतर प्राण्यांनीं जर मला जीवनरक्षणाच्या कामीं मदत केली नाहीं, तर मी जिवंत राहणार नाहीं. जर मी ह्या जगामध्यें एकटाच असतों, तर ज्या वेळीं मी लहान, अज्ञान, पराधीन, व आपलें रक्षण करण्यास असमर्थ असा होतों, त्या वेळीं मला अन्नवस्त्र आणि राहण्यास जरूर ती जागा कशी मिळाली असती ? ह्या सर्व गोष्टींकरितां मला दुसऱ्यांवर अवलंबून रहावें लागत असे. पुढें मी कांहींसा मोठा झाल्यानंतर जेव्हां ह्या सर्व गोष्टी माझ्या मला करणें भाग पडूं लागलें, तेव्हां त्या करण्याचें शिकून घेण्याकरितां तरी मला दुसऱ्यांवरच अवलंबून राहवें लागत असे. जर दुसऱ्यांनीं मला चालावयास किंवा बोलावयास शिकविलें नसतें, तर मला चालतां किंवा बोलतांही आलें नसतें. मी खातों तें अन्न, वापरतों ते कपडे, राहतों तें घर, वाचतों तीं पुस्तकें, वगैरे ज्या ज्या वस्तु मजजवळ आहेत, किंवा ज्यांचा मी उपयोग करितों, त्या सर्व मला दुसऱ्यांनीं श्रम व विचार करून प्राप्त करून दिलेल्या आहेत. दुसऱ्या लोकांसही ह्या सर्व गोष्टी लहानपणीं मजप्रमाणें इतरांकडूनच प्राप्त झाल्या होत्या.

ह्याप्रमाणें जगामध्यें जन्मलेला प्रत्येक मानवी प्राणी आपल्या जीवनरक्षणाकरितां आणि सुखाकरितां जे लोक हल्लीं त्याच्या संन्निध रहातात, जे लोक पूर्वी होऊन गेले, आणि जे कोट्यावधि जगाच्या निरनिराळ्या भागांमध्यें राहतात, त्या सर्वांवर अवलंबून असतो. अशा रीतीनें मनुष्यजातिरूप महाकुटुंब एकत्र झालेलें आहे.

परंतु ह्याप्रमाणें आह्मीं परस्परांची काळजी कां वहावी, आणि आपल्याशिवाय इतरांकरितां आपण श्रम आणि विचार कां करावा? त्याचें कारण असें आहे कीं, आह्मांस परस्पर एकत्र जोडणारीं प्रबल व अदृश्य अशीं अनेक बंधनें आहेत. ह्या बंधनांपैकीं कांहींस मनोवृत्ति ह्मणतात, व कांहींस कर्तव्यें ह्मणतात. ह्या मनोवृत्ति आणि कर्तव्यें कोणतीं ह्याचा आतां आपण विचार करूं; व त्यांत अत्यंत प्रबल अशी मनोवृत्ति जी प्रीति तिजकडेच आपण प्रथमतः वळूं.

---

## जीवन आणि प्रीति.

आह्मीं आपले डोळे पहिल्यानें केव्हां उघडिले, आणि ज्या जगामध्यें आह्मी रहातों तें जग आपल्या केव्हां दृष्टीस पडलें, हें आतां आपणांस आठवत नाहीं. त्याचप्रमाणें आपण पहिल्यानें काय पाहिलें व त्याविषयीं आपल्या मनांत काय विचार आले, ह्याचेंही आपणांस आतां स्मरण नाहीं. परंतु हें जग आपणांस एक रमणीय स्थल वाटलें असावें, ह्याविषयीं शंका नाहीं.

कारण, त्यावेळीं कित्येक माणसें आमच्याकडे खात्रीनें प्रेमदृष्टीनें पहात होतीं, आमची आई आपल्या हातांनीं आह्मांस कुरवाळीत होती, व कांहीं आमच्याशीं लडिवाळपणाचे शब्द बोलून आह्मांस हंसवून आमचें कौतुक करीत होतीं. ज्या वेळेस आह्मांस भूक लागे, त्या वेळेस कोणी आह्मांस कांहीं खावयास देई; जेव्हां आह्मांस झोंप यावयास लागे, तेव्हां आह्मांस कोणी तरी मऊ बिछान्यावर नेऊन ठेवी, आणि आह्मांस गाढ झोंप लागावी ह्मणून आमच्या डोळ्यांवरील उजेड दूर करून काळोख करी; व आह्मी खाऊनपिऊन व झोंप घेऊन ताजेतवाने झालों, ह्मणजे, मोकळ्या हवेवर सूर्यप्रकाशामध्यें, बागेंत, किंवा शेतांत, आह्मांस कोणी फिरावयास घेऊन जाई. तेथें आह्मी वाऱ्याच्या झुळकीनें हालणाऱ्या झाडांकडे किंवा निळ्या आकाशामध्यें जाणाऱ्या येणाऱ्या ढगांकडे टक लावून पहात असूं; तांबडीं, निळीं, किंवा अशाच प्रकारचीं सुबक रंगाचीं आणि सुरेख आकाराचीं फुलें आपल्या लांब देठांवर मोठ्या थाटानें उभीं आहेत किंवा पर्णसमूहांतून आमच्याकडे डोकावून पहात आहेत, असा आम्हांस भास होई. पक्षी उडून जातांना किंवा पतंग ह्या फुलावरून त्या फुलावर जातांना आह्मीं पाहिले, ह्मणजे आह्मीं आपल्या चिमुकल्या हातांनीं टाळ्या मारीत असूं, आणि अशा वेळीं आह्मांस ज्या जगामध्यें आपण आलों आहों, तें जग अत्यंत रमणीय आहे, असेंच खात्रीनें वाटलें असावें. कदाचित् आमचें जन्म एखाद्या

खेड्यापाड्यांत न होतां एखाद्या शहरांत झालें असेल, व आह्मांस पहिल्यानें हिरव्यागार शेतांच्या ऐवजीं गजबजलेल्या रस्त्यामध्यें नेलें असेल; तेथें घरें आणि उंच माड्या ह्यांच्यामुळें आमच्या नजरेस आकाश पडलें नसेल; गाड्या खडखडत वाजत पुढें चालल्या असतां आह्मांस त्यांची भीति वाटली असेल, आणि जे लोक रस्त्यानें घाईनें जात येत होते, त्यांच्याकडे आह्मीं आश्चर्ययुक्त मुद्रेनें न्याहाळून पाहिलें असेल; आणि अशा वेळीं आम्हांस ज्या जगामध्यें आपण आलों आहों, तें जग किती विलक्षण वाटलें असावें!

आमचें जन्म खेड्यापाड्यामध्यें किंवा शहरामध्यें कोठेंही झालेलें असो, आह्मांस जर जन्मतःच विचार करण्याचें सामर्थ्य असतें, तर आह्मांस असें वाटलें असतें कीं, हें जग जरी सुंदर आणि विस्तीर्ण आहे, तरी त्यामध्यें मला एकटें असें रहातां येणार नाहीं. मी एक लहान निराश्रित मूल आहें, व मला ह्या जगामध्यें अगदीं एकटें असें ठेविलें असतें, तर माझें काय झालें असतें?

तुझें काय झालें असतें तें मी तुला सांगतो ऐक. एका स्त्रीस एक मूल झालें. परंतु ती घरची इतकी गरीब होती कीं, तिला त्याचें पालनपोषण करण्याचें सामर्थ्य नव्हतें. शिवाय ती आपलपोटी असल्यामुळें तिची त्या मुलावर ममताही नसे. तिचें स्वतांचें घर नसल्यामुळें त्या मुलाची राहण्याची सोय नव्हती; पाळणा नसल्यामुळें निजावयाची सोय नव्हती; आणि

अन्नवस्त्रांचीही अशीच हलाखी होती. तेव्हां तिनें त्या मुलास एके दिवशीं रात्रीं शेतांत नेलें, आणि त्याला कुंपणाजवळ झाडाचीं पानें वगैरे घालून झांकून ठेऊन आपण तेथूल निघून गेली. ती शेतांतून जात असतां तिनें त्याचें रडें ऐकिलें; परंतु त्या रड्यानेंही तिच्या पाषाणमय अंतःकरणाला द्रव न येतां ती उलट आपलें पाऊल अधिक जलदीनें उठवून तेथून निसटून गेली.

पुढें कांहीं दिवस गेल्यानंतर एका रात्रीं एक मनुष्य आपलें शेतांतलें कामकाज आटपून घरीं येत असतां, त्याला एका कुंपणाजवळ कांहीं पडलेलें आढळलें. त्याचा कांहीं भाग गवतानें आणि झाडाच्या पातेऱ्यानें झांकून गेला होता. तो त्याच्याजवळ गेला तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं, तें एका मुलाचें प्रेत आहे. त्यानें तें थंडीनें कांकडून गेलेलें प्रेत आपल्या हातांत घेतलें, आणि तो त्यास उद्देशून ह्मणाला;—"अरे बिचाऱ्या तान्ह्या मुला, तुझ्या आईची तुजवर प्रीति नव्हती. नाहीं तर ती कितीही गरीब असती; तरी तिनें तुला थंडीवाऱ्यामध्यें येथें सोडून तुझा ह्याप्रभाणें प्राणघात केला नसता."

ह्या विस्तीर्ण जगामध्यें आमचें जन्म झाल्याबरोबर आमच्या आईनें जर आमचें प्रीतिपूर्वक संगोपन केलें नसतें, तर आह्मींही सर्व असेच मरून गेलों असतों.

जे धट्टेकट्टे मनुष्य ह्या जगामध्यें मोठमोठीं कष्टाचीं कामें करितात, आणि जे शहाणे लोक आपल्या ज्ञानानें

इतरांस सन्मार्गाचें वर्तन लावून त्यांचे नायक बनतात, ते सर्व जन्मतः असेच शक्तिहीन आणि पराधीन होते, व त्यांसही लहानपणीं जीवनरक्षणाकरितां आपल्या आईच्या संगोपनावर अवलंबून रहावें लागलें आहे.

जीं आईबापें आपल्या तान्ह्या मुलांची जतन करीत नाहींत, त्यांची हयगय करितात, त्यांस आपण राक्षसी आईबापें ह्मणतों. कारण, प्रीति व जीवन ह्यांचें नेहमीं साहचर्य असावें, असा सृष्टीचा एक अत्यंत महत्वाचा व अत्यंत हितावह नियम आहे. ह्मणून आपण सर्व जीवनाचें अदृश्य आदिकारण जो परमेश्वर तो प्रीतिरूप आहे असें ह्मणतों; आणि ह्मणूनच आमच्या अंतःकरणांतील प्रीति ही सर्व मनोवृत्तींमध्यें एक अत्यंत प्रबल मनोवृत्ति होय.

---

## गृह आणि प्रीति.

जगाच्या ज्या भागामध्यें आपले बालपणचे दिवस जातात, तें आपलें घर होय. आई, बाप, भाऊ, बहिणी हीं आपल्या कुटुंबाचीं माणसें होत; व त्यांमध्येंच आपलीं मनें पहिल्यानें विकास पावूं लागतात. तेथेंच आमच्या मनोवृत्तींचें पाहिलें बीजारोपण होतें; व तेथेंच ज्या चाली व संवयी पुढें आमच्या अगदीं हाडीं खिळून जातात त्या आह्मांस लागण्याची सुरवात होते.

घर हा शब्द उच्चारलेला ऐकल्याबरोबरच आम्हांस एक प्रकारचा आनंद होतो. जर तुम्हीं रस्त्यामधून चा-

ललां तर जे लोक तुमच्या आंगावरून जातात, ते तुमच्याकडे पाहात नाहींत, किंवा तुम्हीं कोण व कोठें जातां, हें जाणून घेण्याची परवाही करीत नाहींत. ह्यास्तव, मुलाला रस्त्यामध्यें सोडून देणें, हें फार धोक्याचें आहे; तें त्यास कोठें एकटें ठेवण्यापेक्षांही वाईट. परंतु तुम्ही आपल्या घराच्या दरवाज्याच्या आंत आल्याबरोबर तुम्हांस तुमच्या नांवानें हांका मारण्याची सुरवात होते. तुम्ही कोठें गेलां होतां, असे प्रश्न तुम्हांस विचारले जातात. तेथें तुमच्याकरितां जेवणाची तयारी चालली असते, आणि तुम्हीं बाहेर असतां, कितीजणांचें तरी लक्ष एकसारखें तुमच्याकडे लागलें होतें, असें तुम्हांस आढळून येतें. सारांश, जीं माणसें ह्याप्रमाणें तुम्हांविषयीं काळजी वाहतात, अशा माणसांमध्यें असलां म्हणजे तुम्ही सुरक्षित असतां.

ज्याप्रमाणें आईनें मुलावर प्रीति करणें हें स्वाभाविक आहे, त्याप्रमाणें एका कुटुंबांतल्या माणसांनीं परस्परांवर प्रीति करणें हेंही स्वाभाविकच आहे. तीं सर्व एकाच घरामध्यें राहतात, आणि एकाच आढ्याखालीं निजतात. त्यांपैकीं एखाद्यास सुख झालें, तर सर्वांस सुख होतें. एखाद्यास दुखणें आलें किंवा दुःख झालें, तर सर्व दुःखी होतात. आणि ह्याप्रमाणें प्रत्येक गोष्टीच्या संबंधानें त्यांचीं सुखदुःखें एकवटून गेलीं असल्यामुळें तीं परस्परांस जीव कीं प्राण होऊन जातात. तुम्हांस एकटें राहतां आलें, तरी तुम्हांस त्यापासून सुख व्हावयाचें नाहीं. तुम्हांस नेहमीं जें सुख म्ह,

णून वाटतें तें काय असतें तें मनांत आणा. सर्वांनीं एके जागीं बसणें, एके जागीं खेळणें, एके जागीं उठणें, एके जागीं खाणें, एके जागीं पिणें, एके जागीं शिकणें, ह्यांतच कायतें सर्व सुख आहे. जें मुल एकटें असतें, तें नेहमीं इकडे याहो, येथें बसाहो, आतां आपण एके जागीं बसून गोष्टी बोलूं व खेळूं, अशा लोकांच्या नेहमीं विनवण्या करीत असतें. आम्हां सर्वांस मनुष्याचा सहवास इष्ट आहे.

कधीं कधीं घरामध्यें अनिष्ट गोष्टींचा प्रवेश होऊन, कुटुंबांतील एकोप्याचा आणि सुखाचा विघड होतो. त्या झाडीमध्यें एक सुंदर घर दिसत आहे, तिकडे नजर द्या. तेथें पक्षी मधुर शब्द करून आपल्या पिलांस चारा घालीत आहेत. त्या घरचीं मुलें सदा सुखी असलीं पाहिजेत. परंतु तेथें स्वार्थपरता रूप राक्षसीचा संचार झाला आहे; व तिच्याबरोबर तिच्याचसारख्या विद्रूप कुसंतानांचा एक परिवार आहे; व त्याच्या योगानें त्या घरच्या सर्व सुखाचें मातेरें झालें आहे. ह्या परिवारामध्यें एक आळस नांवाचें लहान संतान आहे. तें कोठें आतां आपलें स्वरूप थोडथोडें व्यक्त करूं लागलें आहे. त्या घरांतील मुलें आळशी असल्यामुळें सकाळीं नेहमीं उशिरां उठत असत. हा त्यांचा आळस केवळ काम करण्यापुरताच होता. खाण्यापिण्याच्या प्रसंगीं तो आळस त्यांस कधीं आडवा येत नसे. तीं आपल्या आईस कधीं घरच्या कामांमध्यें हातभार लावीत नसत; स्वतांचे धडे तयार

करीत नसत; व जांभया देत खुशाल इकडे तिकडे भटकत फिरत असत. त्यांपैकीं कांहींनीं त्या दुष्ट राक्षसीस उडवून टाकण्याचें मनांत आणून एखादें उपयुक्त काम सुरू केलें, तर आळशी मुलें मध्यें येऊन त्यांस त्रास देऊन त्यामध्यें व्यत्यय आणीत असत.

नंतर त्या आपलपोट्या परिवारापैकीं दुःस्वभावरूप दुसरें संतान चटकन् पुढें येऊन आपला प्रताप दाखवूं लागलें. त्या मुलांमध्यें आतां भांडण सुरू झालें आहे. तीं समोर उघडी खिडकी आहे तींतून पहा. त्या मुलांचीं तोंडें मोठ्यानें वाजत असून, तीं एकमेकांवर दांत ओंठ खात आहेत. "तसें करूं नको", "कां बरें, मीं तसेंच करीन, पाहूं बरें कसें करतोस तें", हे शब्द आपल्या कानीं येत आहेत. एक लहान मुल "मीं आपलें चित्राचें पुस्तक तुला देणार नाहीं" असें ह्मणत आहे, व त्यापेक्षां एक जाणता मुलगा "कां बरें, मी तें घेईन" असें उत्तर देत आहे. नंतर त्या मुलाच्या मदतीस जुलूम येतो. तो आपल्या त्या लहान बहिणीस एक तडाका चढवून तिच्या हातांतून तें पुस्तक खसदिशीं ओढून घेतो, व फाडितो. ती मुलगी रडावयास लागते. इतक्यांत काय झालें तें पाहण्याकरितां तेथें त्यांची आई येते. ती धाकटी मुलगी स्फुंदून आईला सांगते. "त्यानें माझें पुस्तक घेतलें, व फाडलें." आई तरी कांहीं मोठी शहाणीशी नव्हती. तिनें तिजला असें म्हटलें कीं, "बरें फाडूंदे हो; बाहेरून यायचें झालें, म्हणजे त्याला मार बसेल." इतक्यांत तो मोठा मुलगा

ओरडून म्हणतो, " मीं नाहीं तिचें पुस्तक फाडलें, तिनेंच तें फाडलें, व माझ्यावर उगीच नांव घालते. " कारण, आतां असत्य व भित्रेपणा हीं दोन अति नादान संतानें इतरांच्या मदतीस तेथें येऊन पोहोंचलीं आहेत.

अशाच प्रकारच्या दुसऱ्या निंद्य संवयी आणि स्वभाव स्वार्थपरतेपासून उत्पन्न होत असतात. उदाहरणार्थ, जेवणाच्या वेळीं पुढें येणारा अधाशीपणा; आपणास सर्व असावें, दुसऱ्यास कांहीं देऊं नये, अशी इच्छा धारण करणारा लोभ; आपण मनांत आणलेली गोष्ट चांगली आहे किंवा वाईट आहे, ह्याचा विचार न करितां मनाप्रमाणें वागणारा हट्ट; आणि ज्यानें आपलें वाईट केलें त्याचें वाईट करणारा, व ह्याप्रमाणें जगांतील वाईट गोष्टी वाढविणारा सूड. हीं सर्व आपलपोटीं संतानें रोगाच्या सांतीप्रमाणें आहेत; आणि त्यांचा एका मुलापासून दुसऱ्या मुलापर्यंत प्रसार होत जातो. ह्याप्रमाणें कुटुंबामध्यें एक मनुष्य वाईट स्वभावाचें असलें, ह्मणजे त्याच्याबरोबर सर्व कुटुंब वाईट स्वभावाचें होऊन जातें. हे मनाचे आणि स्वभावाचे रोग एक प्रकारच्या सांतीच आहेत, इतकेंच नाहीं, तर ते आंवरल्याखेरीज स्वभावामध्यें तसेच वाढूं दिले, तर ते आपणाला घेरून टाकितील, आणि आपण जसजसे मोठे होत जाऊं, तसतसे ज्याप्रमाणें कीड एखाद्या फुलास किंवा फळास अगदीं खाऊन टाकिते, त्याप्रमाणें आपल्या अंतःकरणास खाऊन टाकून त्यांतील सुस्वभावाचें बीज नाहींनाट करून टाकितील.

आतां त्या रम्य घरामध्यें जें स्वार्थपरतारूप पिशा-च माजलें आहे, त्यास आपण तेथून घालवून देऊं, व तेथें प्रीतिरूप आनंदी देवदूतांचा प्रवेश करवूं. असें झालें ह्मणजे त्या घरामध्यें आनंदसूर्याचा प्रकाश पडून, ज्याप्रमाणें प्रत्यक्ष सूर्यप्रकाशानें बाह्य सृष्टीस शोभा येते, त्याप्रमाणें त्या घरासही शोभा येईल.

---

## गृह आणि प्रीति.

प्रीतीचें पहिलें फल म्हटलें म्हणजे मनामध्यें पर-स्परांच्या उपयोगीं पडण्याची इच्छा जागृत होणें हें होय. ही इच्छा उत्पन्न झाली म्हणजे कुटुंबांतील माणसें सुप्रभातीं उठून आपापल्या कामांस लागतात, आणि असें नेहमीं होत गेल्यानें त्यांच्या आंगीं उद्यम-शीलता ह्या अत्युत्तम गुणाचा प्रादुर्भाव होतो. जाणतीं मुलें आपले नेहमींचे धडे व घरचीं कामें करून लहान मुलांस लहानपणचे खेळ व बारीकसारीक धंदे शिकवूं लागतात. तीं सर्व सदा मधमाशांप्रमाणें उद्योगांत गुंतलेलीं असतात, आणि त्या गृहरूप पोळ्यांतील गुणगण बाहेरच्या लहान पक्ष्यांच्या किलकिलाटाप्रमाणें कानांस मधुर लागते. मधाच्या पोळ्यांतील अगदीं लहानशा मधमाशीस सुद्धां आपण स्वतां मध खाण्या-पेक्षां त्याचा इतरांकरितां सांठा करून ठेवण्यांत अधिक आनंद वाटतो; कारण तिजला इतरांब-रोबर त्या पोळ्यांत रहाणें ह्यांतच मधापेक्षांही

कांहीं जास्त मधुर आहे असें वाटतें. मानवी कुटुंबामध्येंही असाच प्रकार असला पाहिजे.

एकदां एका चार वर्षांच्या मुलीला तिच्या एका मैत्रिणीनें आपल्या घरीं एक दिवस रहावयास बोलाविलें. तिनें तिला मोठ्या गंभीरपणानें असें उत्तर दिलें कीं, मला तुझ्याकडे येऊन रहाण्याची संवड नाहीं; तूं विचारलेंस एवढें पुष्कळ झालें. मी जर घरांत नसलें, तर बाबा बाहेरून आले आणि त्यांनीं पाय धुतले म्हणजे त्यांस पाय पुसण्यास रुमाल कोण नेऊन देईल? बाबांस एक दिवस तूं रुमाल देण्यास नसलीस तर तो ते स्वतां घेतील, व त्याचें त्यांस कांहीं वाटणारही नाहीं, असें तिच्या मैत्रिणीनें तिला सांगितलें. परंतु त्याच्या योगानें तिचें समाधान झालें नाहीं. स्वतां एक दिवस सुख भोगण्यापेक्षां ज्याच्यावर तिची प्रीति होती त्याच्या उपयोगीं पडणें तिला अधिक बरें वाटलें.

दुसरी एक लहान मुलगी एक दिवस सकाळीं दुधभाकर खात होती; इतक्यांत तिच्या मनांत आपल्या भावाचें नवीन चित्रांचें पुस्तक आपण पहावें असें आलें. ती भाकर खात होती तशीच उठून तिनें तें पुस्तक आणलें आणि आपल्या बाजूस ठेविलें. तें पुस्तक "आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी" हें होतें. तें पुस्तक तिनें उघडलें, आणि त्यांतील सर्वांमध्यें जें उत्तम चित्र 'धीवर आणि एका अरुंद तोंडाच्या भांड्यांतून धुराच्या लोळाबरोबर निघणारा

मोठा भयंकर राक्षस' तें काढलें. ती त्या चित्राकडे पहात होती, व एकीकडे आपली दूधभाकर खात होती. ती तें चित्र पाहून, हा मोठा राक्षस त्या लहान भांड्यांत पुन्हां कसा परत जाईल, ह्या विचारामध्यें गुंग असतां तिचा हात जवळच्या दुधाच्या पेल्यास लागून तें सर्व दूध चित्रावर उपडें झालें.

भाऊ, हें बघ मीं काय केलें तें, असें म्हणत ती शेजारच्या खोलींत बसलेल्या आपल्या भावाकडे धांवत गेली; आणि त्यास ह्मणाली, मी तुझें सुंदर चित्र खराब केलें, त्याबद्दल मला फार वाईट वाटतें. त्या भावाला आपलें आवडत्या राक्षसाचें चित्र ह्याप्रमाणें खराब झालेलें पाहून अतिशय राग आला; आणि त्यानें रागाच्या तडाक्यामध्यें त्या आपल्या लहान बहिणीला मारिलेंही असतें. परंतु जेव्हां त्यानें तिच्या डोळ्यांतून अश्रु गळतांना पाहिले, व तिला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे, असें जेव्हां तिच्या चेहऱ्यावरून त्याच्या नजरेस आलें, तेव्हां त्याच्यानें तिच्यावर हात उगारवला नाहीं. तिच्या तोंडावरून हात फिरवून तिला तो असें म्हणाला कीं, ताई, कांहीं हरकत नाहीं. अशा चुका होतातच. दुसऱ्या वेळीं जप म्हणजे झालें.

दुसऱ्या वेळेस ती जपून वागली नसेल, असें तुम्हांस वाटतें काय? छे! वागली नसेल, असें कसें झालें असेल? "कांहीं हरकत नाहीं," ह्या शब्दांनीं तिला इतकें वाईट वाटलें होतें कीं, जर तिला तो बोलला असता किंवा त्यानें तिला मारलें असतें, तर त्या-

च्या योगानेंही तिला इतकें वाईट वाटलें नसतें. पुढें ती आपल्या भावाच्या पुस्तकांस फारच जपूं लागली. सौम्य शब्द आणि ममतेचें व सहनशीलतेचें वर्तन ह्यांचा मनुष्यास ताळ्यावर आणण्याच्या कामीं जसा उपयोग होतो, तसा रागाच्या शब्दांचा किंवा शिक्षा म्हणून दिलेल्या माराचा उपयोग होत नाहीं; व हें तत्व अगदीं लहान गोष्टींपासून मोठ्या गोष्टींपर्यंत सर्वत्र सारखें लागूं पडतें.

आमची एकमेकांवर प्रीति असली आणि आह्मी जितकी स्वताविषयीं काळजी घेतों तितकी इतरांविषयीं घेत असलों, ह्मणजे आपल्या अंतःकरणांतील सर्व दुष्ट वासना आणि क्षुद्र मनोवृत्ति ह्या तेव्हांच नाहींशा होतात. तुमचें मन आणि हात हीं जर उपयुक्त आणि योग्य कामांत गुंतलेलीं असलीं, तर दुष्ट स्वभाव आणि राग ह्यांचा तुह्मांस आणि तुमच्या जवळ असणाऱ्या लोकांस संसर्ग होईल अशी भीति बाळगण्याचें कधीं कारण रहाणार नाहीं. जर तुम्हीं लाजिरवाणी गोष्ट आपल्या हातून कधींही न होण्याचा बंदोबस्त ठेविलात, तर तुम्हांस कधींही कोणास भिण्याचें किंवा खोटें बोलण्याचें भाग पडणार नाहीं. जर तुम्हां सर्वांस एकमेकांचा कळवळा असेल, तर बलवानानें बलहीनावर जुलूम केला असें कधीं होणार नाहीं. इतर लोकांस इष्ट गोष्टी प्राप्त झाल्याबद्दल जर प्रत्येकास आनंद होत गेला, तर जगामध्यें लोभ, अधाशीपणा आणि हट्ट ह्यांस थाराच मिळणार नाहीं; आणि तुमच्यापैकीं

जर कोणाच्या हातून अपराध किंवा चूक झाली, तर तो अपराध किंवा ती चूक पोटांत घालण्यास दया, शांति, सहनशलिता आणि क्षमा हे सद्गुण आहेतच.

इंग्रजी भाषेमध्यें प्रीति म्हणजे कायदेशीर वागणें, अशी एक म्हण आहे; व ती म्हण अगदीं यथार्थ आहे. कारण, आपल्या हक्कांकरितां व हिताकरितां आम्हीं जितके झटतों तितके जर इतरांच्या हक्कांकरितां आणि हिताकरितांही झटूं लागलों, तर जगांतील जलूम, दरवडे, दगाबाजी, वगैरे दुष्ट गोष्टी अगदीं नाहींशा होतील. ह्या जगामध्यें ज्या मोठमोठ्या गोष्टी आहेत, त्या सर्वांचा प्रारंभ लहान लहान गोष्टींपासूनच झालेला आहे; आणि ज्या मानवी सद्वासनेच्या योगानें ह्या भूमंडलावर स्वस्थता होऊन निरनिराळे देश आणि राष्ट्रें ह्यांचा परस्पर संबंध जडून तीं सुख पावतात, त्या सर्व सद्वासनेचें बीज घरच्या कुटुंबप्रीतीमध्येंच आहे, असें आपणांस आढळून येईल.

---

## गृह आणि कर्तव्य.

कुटुंबांतील माणसें एकत्र राहण्यास त्यांच्या मनामध्यें परस्परांविषयीं प्रीति असली म्हणजे झालें, असें नाहीं. त्यांची परस्परांच्या संबंधानें कांहीं कर्तव्येंही आहेत. जें कृत्य केवळ योग्य आहे म्हणून आपण करितों, व जें करतांना आपणांस सुख होतें किंवा नाहीं, हें आपण पहात नाहीं, तें आपलें कर्तव्य होय.

आपणांस रहाण्यास घर, वापरण्याला कपडे, खाण्याला अन्न, निजायाला बिछाना, वगैरे सर्व वस्तूंचा नेहमीं आयता पुरवठा होत जातो, असें मुलांस आढळून येऊं लागलें, ह्मणजे त्या आपणांस कशा मिळतात, हें त्यांच्या लक्षांत न येऊन, त्यांना असें वाटण्याचा संभव आहे कीं, ह्या सर्व वस्तु आपणांस आपोआप प्राप्त होतात.

एकदां एक लहान सहा वर्षांचा मुलगा अशी बढाई मारूं लागला कीं, मी आतां मोठा झालों आहे; मी आपलीं सर्व कामें स्वतां करूं शकेन; मला लहान मुलांप्रमाणें कपडे घालण्यास दुसऱ्या माणसाची गरज नाहीं; मला माझ्या आंगरख्याचे बंद स्वतां बांधतां येतात; आणि आतां मला ऊंसाचे करवें करून देण्यास कोणी नको; असें ह्मणून पट्दिशी जवळ पडलेलें ऊंसाचे पेर घेऊन अधाशासारखा खाऊं लागला.

त्याचा वडील भाऊ जवळच होता. तो त्यास ह्मणाला, जर तुझेपाशीं घालण्याला कपड किंवा खाण्याला ऊंस नसला, तर तूं काय करशील ? तो लहान मुलगा ह्मणाला, मी बाजारांत जाऊन कपडे आणि ऊंस विकत आणीन. तीं विकत घेण्याला पैसा लागेल तो कोठून आणशील ? तो मी बाबाजवळून घेईन. हां, तर मग तुला आपलीं कामें स्वतां करतां येत नाहींत. जर बाबानें तुला अन्न, कपडे किंवा पैसे दिले नाहींत, तर तुला खावयाला अन्न किंवा आंगांत घालावयाला कपडे मिळावयाचे नाहींत. त्या लहान मुलानें विचा-

रलें, बाबाला, कोण पैसे देतो ? तो जाणता मुलगा ह्मणाला, बाबा सर्व दिवस काम करतो आणि त्या कामाबद्दल त्यास पैसे मिळतात.

इतक्यांत घराच्या कवाडाशीं त्यांचा बाप येऊन पोंचला. तो अगदीं दमल्यासारखा दिसत होता. कारण, त्या दिवशीं ऊष्मा फारच होत होता, आणि त्याला अगदीं सकाळपासून गिरणींमध्यें एकसारखें काम करावें लागलें होतें. तो लहान मुलगा लागलाच आपल्या बाबाकडे धांवत गेला; आणि त्यास विचारूं लागला कीं, बाबा, गिरणींतील तो धूर, तो चाकांचा कर्कश आवाज, यंत्रांची ती करकर आणि लोकांची ती गर्दी, ह्यांमध्यें सर्व दिवस घालविणें तुला कसें बरें वाटतें ? ह्या समोरच्या फुलझाडांमध्यें दररोज इकडे तिकडे गमतीनें फिरणें, किंवा एखाद्या झाडाच्या छाये- खालीं बसून चांगलीं चांगलीं पुस्तकें वाचणें, हें तुला अधिक सुखाचें वाटत नाहीं काय? तूंच दर रविवारीं मोठ्या आनंदानें हें सर्व करीत नाहींस काय ?

त्या बापानें लगेच त्या मुलास उचलून आपल्या जवळ घेतलें, आणि त्याच्या तोंडावरून हात फिरवून त्यास असें उत्तर दिलें कीं, होय, माझ्या मुला; गिर- णींत जाण्यापेक्षां बागांतील फुलझाडांमध्यें इकडे ति- कडे फिरणें किंवा झाडांच्या छायेखालीं बसून चांगलीं पुस्तकें वाचणें मला अधिक सुखाचें वाटतें; व मीं तसें नेहमीं केलेंही असतें. परंतु मी तसें करण्याचें मनांत आणून बागांत गेलों कीं, मला कांहीं आंतून टोंचूं ला-

गतें. बाबा, तुला कोण टोंचूं लागतें? गांधिलमाशा का? बाप ह्मणाला, मुला, गांधिलमाशांच्या टोंचणीपेक्षांही माझ्या पाठीमागें जी टोंचणी लागते तिची वेदना फार कठिण आहे. ती मला असें ह्मणूं लागते कीं, तूं गैर गोष्ट करीत आहेस; तूं जर असा येथें येऊन बसूं लागलास, तर तुझ्या कुटुंबाच्या पोषणाची सोय कशी होईल ? तूं कामास जाऊन पैसा मिळवशील, तरच तुझ्या कुटुंबांतील माणसांचा सुखानें चारितार्थ चालेल. बाबा, तुमच्या पाठीमागें अशी टोंचणी लावतें तें कोण? आमची विवेकशक्ति. ह्या विवेकशक्तीसारखा आपणांस दुसरा खरा मित्र मिळावयाचा नाहीं. ती शक्ति नेहमीं मला जें योग्य आहे तें करावें असें सांगत असते; आणि त्यामुळें फुलझाडांमध्यें बसण्यापेक्षां मला आपलें कर्तव्य करणें अधिक आवडतें. माझें कर्तव्य मला कां प्रिय वाटतें, ह्यास विवेकशक्तीशिवाय दुसरेंही एक कारण आहे. जीं माझीं आहेत त्यांच्याकरितां सर्व गोष्टींचा पुरवठा मी करणें हें अगदीं रास्त आहे, आणि ह्मणून मी तुमच्याकरितां खपतों. तुह्मी सर्व मला अत्यंत प्रिय असल्यामुळें तुह्मां सर्वांस सर्व गोष्टी भोगावयास मिळून सुखी पहाणें ह्यांत मला जास्त आनंद वाटतो; आणि ह्मणून तुह्मांकरितां श्रम करणें ह्यांतही मला सुखच वाटतें. ह्याप्रमाणें प्रीतीच्या योगानें आपलें कर्तव्य आपणांस सुखावह होतें.

बाबा, तर मग तूं आह्मांकरितां नेहमीं काम करून

आह्मांस जें लागेल तें देत जाशील काय, असें त्या लहान मुलानें आपल्या बापाला विचारलें. बाप ह्मणाला, नाहीं; मीं तसें केलें तर तुमचें अहित केल्यासारखें होईल. मी आणि तुमची आई कदाचित् मरून जाऊं, किंवा आजारी पडून तुमच्याकारितां काम करण्यास आणि तुमचें पालनपोषण करण्यास असमर्थ होऊं. सृष्टिक्रमाप्रमाणें तुमच्यापेक्षां आह्मी पुष्कळ आधीं मरून जाण्याचा संभव आहे. तेव्हां जर तुह्मी ह्या सर्व गोष्टींकरितां नेहमीं आमच्यावरच अवलंबून राहूं लागलांत, तर आह्मी गेल्याबरोबर तुमचें कसें होईल? ह्यास्तव आह्मी तुह्मांस आपला व इतरांचा संभाळ करण्यास आणि त्यांच्या उपयोगीं पडण्यास शिकविणें ह्मणजे तुमच्यावर ममता करणेंच आहे, व हीच गोष्ट तुमच्या अत्यंत हिताचीही आहे. कारण, तुह्मांस हें सर्व करतां आलें ह्मणजे आपण ह्या जगामध्यें एकटें व निराश्रित आहों, असें वाटण्याचा प्रसंग येणार नाहीं.

पशुपक्षी वगैरे मनुष्येतर प्राणी आपल्या लहान पिलांस आपलें अन्न मिळविण्याचें शिकवून तीं आपलें रक्षण करण्यासारखीं मोठीं झालीं ह्मणजे त्यांचें स्वतां पालनपोषण करण्याचें बंद करितात. ती मोठी मांजरी आपल्या पिलावर आतांच गुरगुरत होती, तें तूं ऐकिलें नाहींस काय? कांहीं दिवसांपूर्वी तें पिलूं जेव्हां लहान होतें, तेव्हां ती त्याच्यावर तशी गुरगुरत नसे. ती त्याचे लाड करी, त्याला आंगावर पाजी, आणि त्याला आपल्या शेंपटाबरोबर खागडण्यास शिकवी. ती गुरगु-

रून आपल्या पिलास असें सांगत होती कीं, तूं आतां आपलें पालनपोषण करण्यासारखें मोठें झालें आहेस; ह्याउपर मी तुझें कांहीं लागत नाहीं.

पक्षी आपल्या लहान पिलांस त्यांचे पंख उड-ण्यासारखे मजबूत झाले ह्मणजे उडण्यास शिकवितांना तूं पाहिलें नाहींस काय? त्या लहान पक्ष्यांस जोंपर्यंत दूर उडतां येत नाहीं, तोंपर्यंत ते मोठे पक्षी त्यांस चारा घालून त्यांना संभाळ करितात. परंतु तेच एकदां मोठे झाले, आणि त्यांस चांगलें लांब उडतां येऊन आपला चारा मिळविण्याचें त्यांच्या आंगीं सामर्थ्य आलें, ह्मणजे ते मोठे पक्षी त्यांची त्यानंतर काळजी घेत नाहींत. ह्याप्रमाणें मुलें लहान आहेत तोंपर्यंत त्यांचें पालनपोषण करून पुढें त्यांस आपला संभाळ करण्यास शिकविणें, हें आईबापांचें कर्तव्य आहे.

तो लहान मुलगा नंतर डोळ्यांत अश्रु आणून आ-पल्या बापास ह्मणाला, बाबा, आह्मी मोठे होऊन बाहेर जाऊं लागलों, व आम्हांस लागणाऱ्या सर्व वस्तु आमच्या आम्ही मिळवूं लागलों, म्हणजे तूं आमची काळजी वहाणार नाहींस काय? बाप म्हणाला, काळजी वाहणार नाहीं, असें कसें होईल? तुम्हां सर्वांविषयीं आमच्या मनांत जी प्रीति आहे, ती प्रीति, तुमचीं मनें मोठीं मोठीं होत गेलीं व तुमचे आमचे विचार एकमेकांपाशीं मिळूं लागले, म्हणजे जास्त होत जाईल. नंतर आमचें परस्परांशीं वर्तन मित्रांप्रमाणें रहात जाईल. ज्या प्रकारची आईची मुलांवर प्रीति

असते, त्या प्रकारची इतर प्राण्यांचीही आपल्या पिलांवर प्रीति असते. परंतु ह्या प्रीतीहून निराळी अशी एक श्रेष्ठ प्रतीची प्रीति आहे, ती सर्व आयुष्यभर टिकते आणि ती इतर प्राण्यांच्या आंगीं दिसून येत नाहीं. ती प्रीति म्हणजे मुलें जाणतीं होऊन आईबापांचा त्यांच्यावर व त्यांचा आईबापांवर विश्वास बसत चालला व उभयतांचे विचार एक होऊन परस्परांविषयीं त्यांच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न झाली, म्हणजे त्यांच्या दरम्यान दिसून येणारा स्नेहभाव, ही होय.

शिवाय, पशुपक्ष्यांप्रमाणें मानवी आईबापांस आपल्या मुलांवर आपला संभाळ करण्याचें काम लवकर संपवितां येत नाहीं. एखाद्या पक्ष्याच्या किंवा मांजरीच्या पिलापेक्षां एखाद्या मुलास आपलें पालनपोषण करण्यास शिकविण्यास जास्त काळ लागतो. तुमच्या मनास व शरीरास शिक्षण देऊन तीं घट्ट करावयाचीं असतात; तुह्मांस विचार करण्यास, बोलावयास, चालावयास, निजण्यास, सदाचारानें वागण्यास, आणि लोकांच्या उपयोगीं पडण्यास, शिकावयाचें असतें. ज्याप्रमाणें तुह्मांस इतरांनीं मदत केली आहे, त्याप्रमाणें तुह्मीं इतरांस कशी मदत करावी, हेंही तुम्हांस शिकावयाचें असतें.

तो मुलगा मोठ्या आश्चर्ययुक्त मुद्रेनें बापास विचारतो, बाबा, आह्मांस इतक्या गोष्टी शिकावयाच्या आहेत ना ? मला असें वाटलें होतें कीं, मीं आपले धडे केले,

व मला हिशेब करतां व लिहितां येऊं लागलें, ह्मणजे माझें सर्व शिकणें झालें. बाप ह्मणाला, मुला, तूं पाटीवर हिशेब करण्यास किंवा कागदावर पुस्त्या काढण्यास शिकण्यापूर्वी किती दिवस तरी कांहीं गोष्टी शिकूं लागला होतास. मुलें अगदीं लहानपणापासूनच इतर माणसें कशीं वागतात तें पाहून त्याप्रमाणें वागूं लागतात. तीं इतर मनुष्यांचे विचार पाहूनही त्या अनुरोधानें आपले विचार ठेवूं लागतात. मुलें इतरांच्या शिकविण्यापेक्षां स्वतः पाहूनच फार शिकतात, आणि ह्मणूनच त्यांचीं आईबापें त्यांस शिकवोत अगर न शिकवोत, तीं हटकून त्यांच्या वळणावर जातात. ह्यास्तव आपल्या मुलांनीं सदाचारानें वागावें व रास्त तेंच करावें, अशी आईबापांची इच्छा असेल, तर त्या आईबापांनींही नेहमीं सदाचारानें वागलें पाहिजे, व रास्त तेंच केलें पाहिजे. अशा प्रकारच्या शिक्षणास आह्मी उदाहरणपूर्वक शिक्षण असें ह्मणतों. नंतर तो मुलगा ह्मणतो, बाबा, तुह्मी कसे वागतां, हें पाहून जर त्याप्रमाणें आह्मी वागतों, तर आह्मी कसे वागतों, हें पाहून कदाचित् इतर माणसेंही आमच्याप्रमाणें वागूं लागतील. ह्यास्तव तूं जर आह्मांस सदाचारानें कसें वागावें व लोकांच्या उपयोगीं कसें पडावें हें शिकविलेंस, तर त्याच्या योगानें तुझे आमच्याशिवाय इतर पुष्कळ माणसांवरही उपकार होणार आहेत. बाप म्हणाला, होय, तें खरें. ज्यांचा जगामध्यें कांहीं उपयोग नाहीं, जीं आळशी, आपलपोटीं

आणि अज्ञान आहेत, जीं केवळ खायला काळ आणि भुईला भार आहेत, अशीं निरुपयोगीं माणसें मीं जर जगामध्यें पाठविलीं, तर मी आपल्या घरगुती लहान कुटुंबाच्या संबंधानें व मनुष्यजातिरूप महाकुटुंबाच्या संबंधानें आपलें कर्तव्य करण्यास अगदीं चुकलों, असें होणार आहे. ह्याप्रमाणें वडील माणसांनीं आपणांस मदत करावी, आपणांस शिकवावें, असा लहान मुलांचा त्यांच्यावर हक्क आहे; आणि सर्व माणसांचा प्रत्येक आईवर, प्रत्येक बापावर आणि प्रत्येक मुलावर हक्क आहे.

---

## मुलांचें पहिलें कर्तव्य.

मुलांस प्रत्येक वस्तूचा पुरवठा करणें, त्यांचा संभाळ करणें, आणि त्यांस शिकविणें, हें ज्याप्रमाणें आईबापांचे कर्तव्य आहे, त्याप्रमाणेंच मुलांचीहि कांहीं कर्तव्यें आहेत. परंतु मुल जगामध्यें येऊन थोडींच वर्षें झालीं असल्यामुळें त्याला जगाचा अनुभव इतका थोडा असतो कीं, त्याला स्वतां काय करावें, आणि काय करूं नये, हें समजत नाहीं; आणि म्हणून जीं जगामध्यें बरींच वर्षें राहिलीं आहेत, व ज्यांना बरेंवाईट कळतें, अशीं वडील माणसें, मुलांनीं कसें वागावें, हें त्यांस सांगण्यास त्यांच्या जवळ असतील तर तें त्यांस हितावह आहे.

ह्यास्तव मुलांचें पहिलें कर्तव्यकर्म ह्मटलें म्हणजे

वडील माणसांची आज्ञा पाळणें हें होय. ह्मणजे तीं जें सांगतील तें त्यानें आनंदानें आणि आणि खुषीनें करावें. मुलांना खाण्यास, खेळण्यास किंवा जें करणें त्यांना आवडतें असें कांहीं करण्यास सांगितलें कीं, तें तीं लागलेंच करितात. परंतु त्यांना व इतरांना सुखावह गोष्ट कोणती होईल, हें ज्यांना त्यांच्यापेक्षां जास्त समजतें. त्यांनीं, जें त्यांस आवडत नाहीं असें कांहीं करण्यास सांगितलें, तर तेंही त्यांनीं एकदम ऐकिलें पाहिजे.

एखादें मूल कदाचित् असें ह्मणेल कीं, मी वाचावयाला कां शिकावें? मला पुस्तकें वाचणें आवडत नाहीं. मला पतंग उडविणें व भोंवरा फिरविणें ह्यांतच गमत वाटते. पुढें कांहीं वर्षांनीं पतंग आणि भोंवरा ह्यांत आपणास कांहीं मौज वाटावयाची नाहीं, आणि सर्व खेळणीं सोडून पुस्तकांत जें सांगितलें आहे तें सर्व स्वतः वाचून आपली कर्मणूक करून घेणें, आपणास बरें वाटूं लागेल, हें त्यास कळत नाहीं. अक्षरें, कान्हे, वेलांट्या, अनुस्वार, मात्रा वगैरे काढण्याला शिकण्याचा त्रास मीं कां घ्यावा? मला लिहावयास शिकावयाचें नाहीं. हीं अक्षरें, हे कान्हें आणि ह्या वेलांट्या ह्यांमध्यें गुप्त रीतीनें किती उपयुक्त ज्ञान सांठविलेलें आहे? आणि जें आह्मी पहातों, करतों किंवा जें आमच्या मनांत येतें, तें कागदावर कांहीं लहानशा काळ्या खुणांनीं प्रदर्शित करण्याची आपणांस हल्लीं जी लेखनकला प्राप्त झाली आहे, ती पूर्णत्वास आणण्यास हजारों

विद्वान् लोक हजारों वर्षें खपत होते, हें त्या मुलांच्या ध्यानांत येत नाहीं. हें जर त्यांना माहीत असतें, तर तीं लिहिणें आणि वाचणें किती कंटाळवाणें आणि कठिण आहे असें ह्मणण्याच्या ऐवजीं पुढें लिहिल्याप्रमाणें ह्मणतीं;—जिच्या योगानें वर्तमान, भूत आणि भविष्य ह्या तिन्ही काळांतील सर्व ठिकाणच्या लोकांचे विचार मला जाणतां येतात, जिच्या योगानें शेंकडों कोशांवरील लोकांसही लहानसा कागदाचा तुकडा टपालांत टाकून मी काय करीत आहें आणि माझ्या मनांत काय आहे, हें कळवितां येतें, आणि जिच्या योगानें टपालांतून तसाच एक लहानसा तुकडा माझ्या हातीं येऊन मला दुसरे लोक काय करीत आहेत व त्यांच्या मनांत काय आहे तें समजतें, ती विलक्षण कला प्राप्त करून घेणें हल्लीं किती सुलभ झालें आहे, ह्याचें मला खरोखर मोठें आश्चर्य वाटतें.

ज्या क्षणभंगुर, अदृश्य, आणि अस्पृश्य, मनोभावांस आपण विचार असें ह्मणतों, त्यांस कायमची, चिरस्थायी आणि दृश्य चिन्हें देऊन ते लोकांस पुस्तकांमध्यें प्रदर्शित करतां येऊं लागावे, आणि ज्या विचारांचीं तीं चिन्हें दर्शकें होतीं तेच विचार त्यांकडे पाहिल्याबरोबर शेंकडों वर्षांनींही पहाणाराच्या मनांत यावे, ही गोष्ट खरोखर अत्यंत आश्चर्याची आहे. ह्याप्रमाणें सांप्रतच्या लोकांस गतकालच्या लोकांचें ज्ञान आणि विचार प्राप्त झाले आहेत, आणि त्यांचा ह्या पुस्तकांच्या साधनानें सर्व जगभर पसार झाला आहे.

मी जर अक्षरें आणि शब्द शिकलों, तर प्राचीन काळामध्यें महापंडितांनीं मोठ्या श्रमानें ज्या ज्ञानाचा सांठा करून ठेविला आहे तें सर्व ज्ञान मलाही प्राप्त करून घेतां येईल. ज्या मनुष्याला लिहितांवाचतां येत नाहीं, त्या मनुष्याचें मन जणूंकाय एखाद्या लहानशा अंधारकोठडीमध्यें जखडून टाकिलेल्या माणसासारखें सर्वतोपरी पंगु झालेलें असतें. ह्या विस्तीर्ण आणि अत्यंत चमत्कारिक भूमंडलावरील सर्व वस्तूंचें ज्ञान संपादन करून सांठवून ठेवण्यास मोठमोठ्या विद्वान लोकांस शेंकडों वर्षें लागलीं आहेत. परंतु तेंच ज्ञान मुलांस पुस्तकांमध्यें त्यांच्या धड्यांतून थोडथोडें दिलेलें असून, तें समजून संपादन करण्याचें काम हल्लीं अगदीं सुलभ झालें आहे. मुलें लहान असतांना जर ह्या मानासिक खाऊचा उपयोग करूं लागलीं, तर त्यांचीं मनें प्रगल्भ होऊन तीं जसजशीं मोठीं होत जातील तसतशीं तीं उच्च प्रतीचें जास्त ज्ञान संपादन करण्यास समर्थ होतील. ह्यास्तव, मुलानों, मला अन्न नको असें ह्मणणें जसें वेडेपणाचें आहे, तसेंच मला धडे नकोत असें ह्मणणें हेंही वेडेपणाचें आहे.

आपल्या स्वाधीन केलेल्या मुलांच्या कल्याणार्थ आपले सर्व श्रम चालले आहेत, ह्या विचारानें शिक्षकांस आपलें काम करतांना काय आनंद वाटत असेल तो वाटो; एरव्हीं मुलें आस्थेवाईक व आज्ञाधारक असलीं तरीही एकसारखें त्यांस घेऊन तासांच्या तास शिकवीत बसणें त्यांस खरोखर फार कंटाळवाणें

वाटलें पाहिजे. तशांत तीं मुलें आळशी आणि शिकण्याचा कंटाळा करणारीं असलीं ह्मणजे तर शिक्षकांचे हाल कांहीं पुसूंच नका. शिक्षक सकाळ संध्याकाळ तासांच्या तास त्या त्याच गोष्टी पुन्हां पुन्हां मुलांस शिकवीत असतांना त्यांच्या मनाची स्थिति काय होत असेल ह्याचा तुह्मींच विचार करा. यास्तव, मुलांनीं आपल्या शिक्षकांवर प्रेम ठेवून, त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागून, आणि त्यांच्या इच्छेप्रमाणें आपले धडे शिकून वें आपली सुधारणा करून त्यांस आनंद द्यावा; व तीं असें करतील, तरच शिक्षकांना केलेल्या श्रमांचें कांहीं तरी समाधान वाटेल.

धडे शिकतांनाच काय, परंतु सगळ्या दिवसभर मुलांवर कोणाची तरी देखरेख असणें अवश्य आहे. आपले कपडे वगैरे नीट आवरून न धरितां विस्तवाजवळ जाऊन, किंवा हातांत पेटते कागद किंवा काड्या नाचवून आपल्या कपड्यांस आग लावून घेऊन मुलें मरण पावल्याचीं उदाहरणें तुह्मीं कधीं ऐकिलीं नाहींत काय ? त्याचप्रमाणें तळ्याच्या अगदीं कांठावर खेळतांना आपणांस पाण्यामध्यें पाडून घेतल्याचीं, रस्त्यांमध्यें गाडीखालीं सांपडून चेंगरल्याचीं, आंबटचिंबट बोरें, करवंदें किंवा इतर अपायकारक पदार्थ खाऊन आपली प्रकृति बिघडून घेतल्याचीं, किंवा कशापासून इजा होण्याचा संभव आहे हें न समजून आपणांस व इतरांस नाना प्रकारच्या इजा करून घेतल्याचीं उदाहरणें तुमच्या कधीं कानीं आलेलीं नाहींत काय ?

मुलांनीं नेहमीं वडील माणसें सांगतील त्याप्रमाणें विनतक्रार वागावें. आपण असें कां वागावें, ह्याचें कारण त्यांस कधीं कधीं मागाहून कळून येईल; व कधीं कधीं कळून येणारही नाहीं. परंतु त्यांनीं, आपल्यापेक्षां जीं वडील आहेत व ज्यांना जास्त समजतें, अशा माणसांवर नेहमीं भरंवसा ठेवून त्यांच्या आज्ञा पाळीत जाव्या, आणि त्यांची अवज्ञा करून त्यांस कधीं त्रास देऊं नये.

---

## मुलाचें पहिलें कर्तव्य.

मुलांस वडील माणसांची आज्ञा विनतक्रार पाळण्याची संवय असली, ह्मणजे त्यांच्यावरील भयंकर अपघात कसे तावडतोब टाळले जातात, ह्याविषयीं आमच्या वाचनांत एक गोष्ट आली आहे, ती आह्मी येथें देतों. युरोपांतील प्रशिया देशामध्यें एका रेल्वेवरील नोकरानें दोन आगगाड्या मोठ्या वेगानें समोरासमोर येतांना पाहिल्या. त्या गाड्यांची टक्कर न होऊं देण्याकरितां रस्त्याचा सांधा चेपून, एक गाडी दुसऱ्या रस्त्यास लावण्याकरितां तो मोठ्या घाईनें तिकडे जात होता. इतक्यांत त्यानें आपला लहान मुलगा कांहीं अंतरावर थेट गाडीच्या रस्त्यामध्यें खेळतांना पाहिला. झटकन् धांवत जाऊन त्या मुलास रस्त्यांतून एकीकडे ओढून घेण्याला त्याला वेळ होता; परंतु त्यानें असें केलें असतें, तर

वेगानें येणाऱ्या त्या गाड्यांची टक्कर होऊन शेंकडों मनुष्यांचा प्राणघात झाला असता. तेव्हां आतां कसें करावें, ह्या विचारांत तो पडला. गाडी रस्त्याचा सांधा चेपून योग्य मार्गास लावण्याचें सोडून जर तो आपल्या मुलाकडे धांवला असता, तर तो आपलें अधिक महत्वाचें कर्तव्य करण्यास चुकला असता. शेवटीं त्यानें आपल्या मनाचा हिय्या करून गाडी योग्य मार्गास लावून देण्याकरितां तिकडेच जाण्याचा निश्चय केला. जातांना त्यानें आपल्या मुलास, मुला, एकदम खालीं पडून रहा, असें मोठ्यानें ओरडून सांगितलें. आणि गाडीच्या रस्त्याचा सांधा दाबून त्यानें गाडी सुरक्षितपणें दुसऱ्या मार्गास लावून दिली. मुलास बापाची आज्ञा बिनतक्रार पाळण्याची नेहमींची संवय होतीच. तो बापाच्या तोंडचे ते शब्द ऐकतांच दोन रेलांच्या मध्यें स्वस्थ पडून राहिला आणि त्याच्यावरून ती गाडी मोठ्या वेगानें गर्जना करीत गेली. गाडींतल्या उतारूंस आपल्या गाडीच्या जाण्यानें एका उदार मानवी प्राण्याच्या मनास केवढा मोठी काळजी उत्पन्न झाली होती, ह्याची कल्पनाही नव्हती. तो बाप लगेच आपला मुलगा पडून राहिला होता तिकडे धांवत गेला. त्याला आपला मुलगा जिवंत सांपडेल अशी बहुतेक आशा नव्हतीच. बहुधां मुलगा गाडीखालीं चेंगरून जाऊन प्रेत मात्र आपल्या हातीं लागणार, असेंच त्यास वाटत होतें. परंतु जेव्हां त्यास आपला मुलगा जिवंत असून त्यास कांहीं इजाही झालेली नाहीं

मराठी ग्रंथ संग्रहालय.



असें आढळून आलें, तेव्हां त्यास अत्यंत आनंद झाला, व त्यानें परमेश्वराचे आभार मानिले. पुढें हें त्या शूर बापाचें वर्तन प्रशिया देशच्या राजाच्या कानीं गेलें; व त्यानें त्यास दुसऱ्या दिवशीं बोलवावयास पाठवून ह्या उदार वर्तनाबद्दल दरबारामध्यें त्याचा सत्कार केला, व त्यास एक पदक बक्षीस दिलें.

मुलांस ज्या गोष्टी करण्याचा कंटाळा असतो त्या गोष्टी करण्याचें त्यांस कोणी भाग पाडल्यास त्यांस वाईट वाटत असेल हें खरें. परंतु त्या वेळीं आपल्या आईबापांनीं व इतर वडील माणसांनीं आपल्याकरितां रात्रंदिवस किती खस्ता खाल्ली असेल, त्यांनीं आपले लहानपणीं किती हट्ट पुरविले असतील, आपल्या आजारीपणामध्यें आपली कशी शुश्रूषा केली असेल, आपल्यास शिकविण्याकरितां किती त्रास सोसला असेल, आणि स्वतःच्या सुखाची पर्वा न करितां केवळ आपल्या सुखाकरितां किती कष्ट सोशिले असतील याचा त्यांनीं विचार करावा.

आईबापें ज्याप्रमाणें सांगतील त्याप्रमाणें मुलें वागलीं ह्मणजे त्यांचें कर्तव्य संपलें असें नाहीं. आईबापें कुटुंबाच्या सुखाकरितां व हिताकरितां जे नियम करितील तेही त्यांनीं अवश्य पाळिले पाहिजेत. ज्या घरामध्यें प्रत्येक मुलास इतरांच्या सुखाकडे लक्ष न देतां मनसोक्त वागण्याची परवानगी असते, त्या घराची स्थिति काय होईल ह्याची तुह्मांस कल्पना तरी आहे

काय? एखादें मुल रात्रीचे बारा वाजेपर्यंत जागत बसेल, दुसरें सकाळचे दहा अकरा वाजेपर्यंत अांथरू-णच सोडणार नाहीं; एक जेवण तयार झाल्या-बरोबर जेवावयास येणार नाहीं; दुसरें सर्व दिवसभर हें खा तें खा असेंच करीत बसेल; एक तोंड धुत-ल्याशिवाय व आंघोळ केल्याशिवाय घाणेरड्या हातांनीं तसेंच जेवावयास बसेल; दुसरें एकसारखें खेळत बसेल; एक आपलीं सर्व खेळणीं घरभर पसरून टाकील; दुसरें एकसारखें ओरडत व खिदळत बसेल; व एखादें कदाचित् असें ह्मणेल कीं, माझ्या वाचनाच्या वेळेस कोणी गडबड करतां कामा नये. असा सर्वच गोंधळ होईल.

ह्याप्रमाणें घरामध्यें मुलांचीं परस्पर भांडणें चालून असा कांहीं गोंधळ उडून जाईल कीं, तेथें सुख आणि शांति हीं कधींच वसावयाचीं नाहींत. ह्या मुलांपैकीं प्रत्येकास सर्वांच्या सुखाकरितां केलेले नियम पाळण्या-चें भाग पाडलें तर तीं खरोखर सुखी होतील. घरचा यजमान जर शहाणा असेल तर त्यानें निजण्याचे, जेव-णाचे, कामाचे आणि खेळाचे तास बांधून टाकावें. त्यानें मुलांस कधींही यथेच्छ वागूं न देतां प्रत्येक मुलानें स्वच्छ आणि व्यवस्थित असावें, आणि इतरांच्या सुखाकडे लक्ष देऊन आपलें सतत वर्तन ठेवावें, अशी त्यांच्यावर सक्ति केली पाहिजे. नियम पाळणें ह्मणजे मुलांवर कांहीं एक प्रकारचा दाब आहे असें नाहीं. कारण, जीं ने-हमीं व्यवस्थित रीतीनें वागतात, व ज्यांना

चांगल्या संवयी लागलेल्या आहेत, त्यांना योग्य रीतीनें वागण्याचें कधीं कठिण पडत नाहीं. तीं सहजींच तशीं वागूं लागतात. कोणत्याही गोष्टीची एकदां संवय लागली, ह्मणजे तो एक प्रकारचा अंगस्वभावच बनतो.

मुलांसच फक्त आज्ञा पाळावयाच्या असतात, असें नाहीं. पलटणींतील शिपायांनीं किंवा गलबतावरील खलाशांनीं आपल्या मुख्याच्या आज्ञा त्यांचें कारण समजल्याखेरीज पाळावयाच्या नाहींत, असें ह्मटलें तर केवढा घोटाळा व घात होणार आहे. देशांतील प्रत्येक माणूस जर असें ह्मणूं लागला कीं, मी आपल्या देशाचे कायदे पाळणार नाहीं, कारण ते मी स्वतां केलेले नाहींत, तर केवढा अनर्थ होणार आहे! मुलांनीं आईबापांची किंवा शिक्षकांची आज्ञा पाळणें हें न्यायाचे आणि हक्काचे कायदे पाळण्याच्या शिक्षणाचें बीजारोपणच आहे. ह्या न्यायाच्या आणि हक्काच्या कायद्यांशिवाय आपणांस राष्ट्रामध्यें किंवा आपल्या लहानशा घरामध्यें सुद्धां रहाणें धोक्याचें होईल. मुलांनीं आज्ञाधारक असणें ह्मणजे परमेश्वराचा आदिनियम जी व्यवस्था तिचा आदर करण्यास शिकणें आहे.

---

## आयुष्याचा पूर्वभाग.

मुलें कदाचित् असें ह्मणतील कीं, आमच्या हातून ह्मणण्यासारखें कांहीं उपयुक्त काम होण्यासारखें नसल्यामुळें आह्मीं आपला वेळ कसाही घालविला तरी

चालेल. परंतु एका अर्थीं जाणत्या मनुष्यापेक्षा मुलांच्याच वेळाची किंमत जास्त आहे. जर एखादा सुतार जवळ हत्यारें नसतांना आपला धंदा चालवूं लागला, तर त्याला तुह्मी काय ह्मणाल? पुढील कामाकरितां लागणारीं सर्व साधनें आह्मीं बाळपणामध्यें मिळविलीं पाहिजेत.

हीं साधनें ह्मणजे चांगल्या संवई लावून घेणें, सदाचारानें वागणें, आणि पुढील व्यवहारांस लागणारीं साधनें संपादणें हीं होत. लोकांनीं जगामध्यें एखादा निरुपयोगी मनुष्य पाहिला ह्मणजे ते त्याच्या संबंधानें कधीं कधीं असें ह्मणतात कीं, 'काय बिचारा! त्याला कधीं काम करण्याची संवय नाहीं; त्याला तें कधीं कोणी शिकविलेंच नाहीं; आतां तें त्याला कसें येणार!' त्यांच्या ह्या ह्मणण्याचा अर्थ असा कीं, त्याला लहानपणींच आळस जडला; व आतां तो अगदीं निरुपयोगी झाला आहे.

मनुष्याला एकदां आळसानें ग्रासिलें, ह्मणजे तो नुसता एकीकडे बसून राहत नाहीं, तर तो रिकामपणीं कांहीं खोड्या करूं लागतो. तुह्मीं अगदीं स्वस्थ बसाल, तर तुमचें लक्ष वाईटसाईट कामाकडे जाईलच जाईल. जर तुह्मीं आपल्या बागामध्यें चांगलीं फळझाडें व फुलझाडें लाविलीं नाहींत, तर त्यामध्यें रानझाडें उगवल्याशिवाय रहावयाचीं नाहींत. जर तुह्मीं आपला वेळ चांगल्या कामामध्यें घालविला नाहीं, तर सर्व दुष्कृत्यांचा जनक जो आळस तो पोट भरण्याकरतां दुष्कृत्यें

करण्यांत वेळाचा दुरुपयोग केल्याशिवाय रहावयाचा नाहीं. आळशी मुलें नेहमीं त्रासलेलीं असून मला तें नको, हें हवें, असें करीत असतात. तीं येतां जातां लहान जीवजंतूंस पीडा देत असतात, आणि त्यांच्यापेक्षां जीं लहान, व शक्तीनें कमी असतात त्यांना नेहमीं त्रास देतात. तीं नेहमीं काम तेवढें लोकांना करूं देतात; आणि योग्यता नसतांना नेहमीं चांगल्या चांगल्या वस्तू आपणांस मिळाव्या अशी अधाशीपणानें इच्छा करीत असतात.

मुलांना पुढील कामाकरितां ज्या गोष्टींची आणि ज्या साधनांची जरूर लागावयाची, तीं साधनें आणि त्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे वाचावयास, लिहावयास आणि हिशेब करण्यास शिकणें ह्या होत. आणि त्या सर्व लहानपणामध्यें जशा सहजीं प्राप्त होतात, तशा मोठेपणीं होत नाहींत. जाणत्या माणसाला जशी कोणतीही गोष्ट समजते, तशी लहान मुलाला समजत नाहीं., हें खरें; परंतु मऊ मेणाप्रमाणें त्याच्या मनावर तिचा चांगला ठसा उठतो; आणि तें आपल्या मनामध्यें पुष्कळ उपयुक्त गोष्टींचा, त्या समजल्याखेरीज, सांठा करून ठेवितें. मुलांस आंकड्यांचें प्रमाण आणि धर्म ह्यांची कल्पना येण्यास बरींच वर्षें लागतात हें खरें; परंतु त्यांना जाणत्या लोकांपेक्षां लेखें वगैरे गोष्टी अधिक लवकर पाठ होतात. इतिहासांतील शक व गोष्टी, आणि भूगोलांतील स्थलांचीं नावें हीं त्यांच्या ध्यानांत चांगलीं रहातात. परंतु तींच जाणतीं मनुष्यें

तेव्हांच विसरून जातात. त्याचप्रमाणें तीं मोठ्या मनुष्यांच्या रांठ बोटांपेक्षां आपल्या लवचिक बोटांनीं लिहावयासही अधिक सुलभ रीतीनें शिकतात.

मोठ्या मनुष्यांना लिहावयास आणि वाचावयास शिकण्याचें इतकें कठिण जातें कीं, ज्या आईबापांना हीं ज्ञानाचीं साधनें लहानपणीं प्राप्त झालेलीं नसतात, तीं आईबापें आपल्या मुलांस तीं प्राप्त करून देण्याकरितां पाहिजे त्या अडचणी सोसण्यास तयार होतात. परंतु मुलानों, तुमच्या मनामध्यें उपयुक्त गोष्टींचा आणि आंकड्यांचा सांठा असणें, हें जरी चांगलें आहे, तरी त्यांचा उपयोग करतां येणें हें अधिक चांगलें आहे, हें तुह्मी विसरतां कामा नये. पोपट पुष्कळ शुद्ध बोलतो आणि नानातऱ्हेचे आवाज काढितो. परंतु त्याला त्यांचा उपयोग करण्याचें सामर्थ्य नाहीं. तो पुन्हां पुन्हां तेच तेच आवाज आणि तेच तेच शब्द उच्चारील, आणि पिंजऱ्यामध्यें दाणापाणी खात तेथल्यातेथेंच आपले दिवस काढील. त्याचप्रमाणें मुलेंही लिहितील, वाचितील आणि यत्किंचित्‌ही ज्ञान झाल्याशिवाय पुस्तकाचीं पानेंच्या पानें तोंडपाठ ह्मणूं शकतील.

एक हरि नांवाचा मुलगा होता, त्याला कोणी एकानें सुंदर रंगांची पेटी बक्षीस दिली होती. त्या पेटीचा त्याला मोठा अभिमान वाटे, आणि तो पुन्हां पुन्हां ती हातांत घेऊन तिजकडे पहात बसे. तो त्या पेटींतील रंगांच्या सर्व वड्या नेहमीं बाहेर काढीत असे, आणि त्या रांगेनें लावून प्रत्यहीं मोजित असे. त्या अशा

मोजून झाल्या ह्मणजे पुन्हां त्या पेटींत घालून ठेवीत असे. त्याच्या मनांत ह्या वड्यांच्या साधनानें आपण चित्रें रंगविण्यास शिकावें, असें कधींही आलें नाहीं. पुढें त्या वड्या मोजण्याचा त्याला कंटाळा येऊं लागला आणि त्याची ती रंगाची पेटी कपाटांतल्या कपाटांतच राहूं लागली. तिच्यावर धुरळा बसून ती अगदीं वाईट झाली; आणि पुढें हरि मोठा झाल्यावर ज्या वेळीं त्याच्या सर्व खेळण्याचा आतां कांहीं उपयोग नाहीं ह्मणून व्यवस्था लावण्यांत आली त्या वेळीं त्या पेटीचीही व्यवस्था लावण्यांत आली.

तसाच दुसरा गोविंदा ह्या नांवाचा एक मुलगा होता. त्याला कोणी रंगाची पेटी बक्षिस दिलेली नव्हती. परंतु चित्रें रंगविण्यास शिकण्याची त्यास इतकी हौस होती कीं, त्याला खाऊकरितां ह्मणून जे पैसे मिळत असत त्या पैशांतून तो एकेक प्रकारची रंगाची वडी विकत घेऊन एक जाड्या कागदाची स्वतां पेटी करून तीमध्यें विकत घेतलेल्या सर्व वड्या घालून ठेवीत असे. त्याला नेहमीं झाडें, प्राणी, ढग आणि गलबतें ह्यांची चित्रें काढून त्यांस रंग देण्याचा फार नाद असे; आणि हळू हळू तो रंग देण्याच्या कामांत इतका कुशल झाला कीं, त्याला चितार्याच्या कामांत घातल्यास तो उत्तम चितारी होईल असें लोक ह्मणूं लागले.

आतां ह्या दोन मुलांपैकीं चांगला मुलगा कोणता? ज्याच्याजवळ रंगाच्या वड्या असून जो त्यांचा उपयोग करीत नसे तो, किंवा ज्याच्याजवळ वड्या

नसतांनाही ज्याची चित्रें रंगविण्यास शिकण्याची मोठी इच्छा होती तो? मुलें लहानपणीं ज्या गोष्टी शिकतात त्या सर्व गोष्टींच्या संबंधानें पाहूं गेलें तर असेंच आहे. तें ज्ञान हरीच्या रंगाच्या पेटीप्रमाणें निरुपयोगी ह्मणून एकीकडे टाकण्यांत येतें, किंवा त्याचा त्यांस सर्व आयुष्यभर उपयोग होऊन त्यापासून त्यांची चांगली भरभराट होते.

---

## आयुष्याचा पूर्वभाग.

ज्या कलांच्या आणि गुणांच्या योगानें आपले आयुष्याचे दिवस विशेष आनंदामध्यें आणि आरामामध्यें जातात, त्या कला आणि ते गुण शिकण्याची सुरुवात करण्यास आपलें बालपण हाच उत्तम काल होय. त्या कला ह्मणजे संगीत, चित्रकला वगैरे. ज्याप्रमाणें आह्मी जें कांहीं बोलतों तें कागदावर प्रदर्शित करण्याची एक चमत्कारिक लेखनकला आहे, त्याचप्रमाणें संगीतांतील स्वरांचें उच्चनीचत्व कागदावर प्रदर्शित करण्याची एक लेखनकला आहे. एका मनुष्याच्या मनामध्यें उत्पन्न झालेले स्वरसंवाद आणि रागमाधुर्य, बिंदु, रेषा इत्यादि संज्ञांच्या योगानें दुसऱ्याच्या मनामध्यें उत्पन्न करून देतां येतात. त्या संज्ञांच्या साहाय्यानें आपणांस ते स्वरसंवाद पुस्तकांतून वाचून दाखवितां येतात, किंवा गाऊन अथवा वाद्यांतून काढून दाखवितां येतात. पुस्तकांमध्यें संचित केलेल्या ज्ञानापासून होणाऱ्या आनंदाचा आस्वाद

घेण्याचें सामर्थ्य आंगीं येण्यापूर्वी ज्याप्रमाणें मूल वाचावयास शिकतें, त्याप्रमाणें संगीताचें मर्म आणि त्यापासून होणारा आनंद हीं कळूं लागण्यापूर्वी त्यानें पुस्तकांतून संगीत वाचावयास शिकावें.

आपणांस सतारीसारख्या वाद्यावर कट दाबून व आपलीं बोटें हालवून स्वर काढतां येत असतां पुस्तकांतील संज्ञा वाचून त्यांच्या अनुरोधानें त्या वाद्यांतून स्वर काढणें कंटाळवाणें वाटतें. परंतु कोणतेंही वाद्य उत्तम प्रकारें वाजवितां येण्यास मुलांनीं पुस्तकांतील संज्ञांच्या अनुरोधानेंच प्रथम तें वाद्य वाजविण्यास शिकलें पाहिजे; आणि त्या कलेमध्यें बंदेअल्लीचें किंवा दुसऱ्या एखाद्या अशाच प्रसिद्ध पुरुषाचें प्रावीण्य संपादन करण्याचा हाच खरा मार्ग आहे.

चित्रकलेच्या संबंधानें सुद्धां असेंच आहे. मूल प्रथमतः कागदांवर चित्रें काढूनच मोठेपणीं राजा रविवर्म्यासारख्यांच्या सर्व काल सर्वांस तल्लीन करून टाकणाऱ्या चित्रांतील मर्में जाणूं लागतें. हजारांमध्यें एखादाच एखाद्या कलेमध्यें अति निष्णात निपजतो. तथापि वाद्यांतून किंवा तोंडानें मधुर स्वर काढतां येणें, कागदावर सुबक चित्रें काढतां येणें, किंवा कोणत्याही प्रकारची एखादी मनोरम चीज तयार करतां येणें ह्मणजे लोकांस आनंदी करण्याचें व आपला फुरसतीचा वेळ आनंदांत घालविण्याचें एक चांगलें साधन आहे.

मुलानों, सर्व दिवसभर शुष्क खेळ खेळून तुह्मांस सुख व्हावयाचें नाहीं. लोकांस ज्यांचा उपयोग

होईल, अशीं कामें करण्यामध्यें किंवा तुह्मी मोठे झाल्यावर ज्यांच्या योगानें तुह्मांस लोकांच्या अधिक उपयोगीं पडतां येईल अशा गोष्टी करण्यामध्यें जर तुमचा वेळ जाईल, तरच तुह्मांस खरें सुख प्राप्त होण्याचा संभव आहे.

तुमचे आयुष्याचे दिवस ह्मणजे अति मौल्यवान् चिजा सांठवून ठेवण्याचे सुंदर करंडे आहेत, असें समजा. त्या करंड्यांमध्यें, जीं तुमच्यावर प्रीति करितात, त्यांनीं पुष्कळ मौल्यवान् वस्तू घालून ठेवलेल्या आहेत. आतां तुह्मीही त्यांमध्यें तशाच वस्तू घालण्याची तजवीज ठेवा. विशेषेंकरून त्यांमध्यें ज्ञानाचें आणि उपयुक्ततेचें बीज विपुलतेनें सांठवून ठेवा. त्या बीजाचे पुढें मजबूत आणि चांगल्या धजावाचे रोपे बनतील. अशा रीतीनें तुमचे दिवसरूपी करंडे भरलेले असले ह्मणजे तुमच्या स्मरणशक्तिरूप कोठारामध्यें उपयुक्त आणि मनोरम अशा असंख्य वस्तूंचा भरपूर सांठा होईल तुमचे हे दिवसरूपी करंडे जर रिकामे रहातील, तर त्यांचा गतकालामध्यें घडून आलेल्या टाकाऊ गोष्टींच्या राशीवर फेंकून देण्यापलीकडे दुसरा कांहीं उपयोग नाहीं.

---

## सदसद्विचारशक्तीच्या आज्ञा—सत्य.

मुलें ममताळु, आज्ञाधारक आणि उद्योगी असलीं, आणि त्यांना सन्मार्गास लावण्यास शहाणीं आईबापें

आणि सुज्ञ शिक्षक असले, ह्मणजे तीं घरीं किंवा शाळेंत कोठेंही असोत, त्यांना सुख झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं. तीं जसजशीं मोठीं होत जातात तसतसें त्यांना बरेंवाईट कळूं लागतें; आणि त्यांची सदसद्विचारशक्ति किंवा सद्वासनाही त्यांच्याबरोबर वाढत असते.

मुलें मोठीं होऊन त्यांस बरेंवाईट कळूं लागलें ह्मणजे आईबापांस मोठा आनंद होतो. मुलांची बुद्धि आणि सदसद्विचारशक्ति त्यांस बरें कोणतें व वाईट कोणतें हें कळण्यासारखी प्रौढ झाली ह्मणजे त्यांनीं हूं चूं केल्याशिवाय आपल्या आज्ञा पाळाव्या अशी आईबापांस इच्छा करण्याचें कारणच रहात नाहीं. आईबाप, पुत्रकन्या हीं परस्परांस मित्र आणि सवंगडी मानून आपसांत एकमेकांची सल्लामसलत घेऊं लागतात; आणि तीं सर्व जोंपर्यंत एका घरांत रहातात, तोंपर्यंत बरोबरीच्या नात्यानें वागून आणि एकत्र खपून परस्परांच्या उपयोगीं पडतात.

सदसद्विचारशक्तीचा आमच्या मनामध्यें प्रादुर्भाव होऊं लागला ह्मणजे ती पहिल्यानें आपणांस कोणती गोष्ट करावयास सांगते? ती आपणांस असें सांगते कीं, तुह्मीं नेहमीं खरें बोला, आणि आपलें वर्तन सतत प्रामाणिकपणाचें ठेवा.

सत्याशिवाय आमचा परस्परांवर भरवसा रहाणार नाहीं. आह्मी जर एकमेकांपाशीं खरें बोलणार नाहीं, तर आह्मांस एकत्र काम करून परस्परांस कोण-

त्याही प्रकारची मदत करतां येणार नाहीं; व अशा स्थितीमध्यें रहाण्यापेक्षां आपण एकीकडे एकटें रहाणें बरें. कारण, आमचे विचार शब्दांनीं प्रदर्शित करण्याचें जिच्या आंगीं विलक्षण सामर्थ्य आहे अशी जी भाषा तिचा उपयोग हा आहे कीं, जें आपल्या मनामध्यें येतें, किंवा जें आपणांस समजतें तें आपल्या अंतःकरणामध्यें कोंडलेलें न रहातां दुसऱ्यांस कळावें.

एका मनुष्याच्या मनांतले विचार दुसऱ्या मनुष्यास कळविण्याचें भाषा हें एक साधन आहे. आपणांस जर या जगामध्यें प्रत्येक वस्तु स्वतांच शोधून काढावयाची असती, तर आपलें सर्व आयुष्य कसें कष्टमय होऊन गेलें असतें? जर प्रत्येकास प्रत्येक गोष्टीचा प्रारंभ स्वतांच करावा लागता, व त्यास तिच्या संबंधानें दुसऱ्यापासून कांहीं एक शिकतां न येतें, तर याचा वेळ, श्रम आणि विचार किती फुकट जाता? परंतु हल्लीं ह्या भाषेच्या साधनानें एकास जें ज्ञान असतें तें दुसऱ्यास प्राप्त होतें, आणि प्रत्येकाच्या ज्ञानाचा सर्वांस उपयोग होतो.

अशी कल्पना करा कीं, तुमच्या घरांत एक घड्याळ आहे, तें तुह्मांस नेहमीं खोटा वेळ सांगतें. तुह्मांस तें घड्याळ खोटा वेळ सांगतें असें कळून आल्याबरोबरच तुह्मी त्या घड्याळाकडे पहाण्याचें सोडून एखाद्या शेजाऱ्याच्या घड्याळावरून वेळ पाहूं लागाल. परंतु तुमच्या घड्याळाप्रमाणें सर्वच घड्याळें जर खोटा व निरनिराळा वेळ दाखवूं लागलीं, तर तुमचा सर्व घो-

टाळा होणार नाहीं काय? घड्याळें खोटा वेळ दाखवूं लागलीं, ह्मणजे तीं निरनिराळा वेळ दाखवावयाचींच. कारण, सत्याचें स्वरूप एकच आहे; परंतु असत्याचीं स्वरूपें पुष्कळ आहेत. हीं सर्व खोटसाळ घड्याळें सूर्याच्या गतीवरून बरोबर लावलीं नाहींत, तर जगांतील व्यवस्था, नियमितपणा व वेळच्या वेळीं कामें करण्याच्या लोकांच्या संवयी नाहींशा होतील.

चुकलेल्या घड्याळाप्रमाणें मनुष्यें फसवावयास लागलीं, तर त्याचे परिणाम फारच हानिकारक होण्याचा संभव आहे. कारण, घड्याळांवरून आह्मांस वेळच समजावयाचा असतो, परंतु मनुष्यांकडून आह्मांस त्यापेक्षां महत्वाच्या पुष्कळ गोष्टी कळावयाच्या असतात. घरामध्यें सत्याची वसति नसेल तर तें घर राहण्यास योग्य नाहीं. कारण, सत्य सर्व इष्ट गोष्टींचें मूळ आहे. आणि असत्य हें सर्व अनिष्ट गोष्टींचें मूळ आहे. आह्मी लोकांना फसवितों, ह्याचें कारण तसें केल्यानें आह्मांस कांहीं लाभ होईल असें वाटतें, हें होय. परंतु असत्यापासून आपली होणारी हानि होणाऱ्या लाभापेक्षां फारच मोठी असते.

एके दिवशीं एक बाई आपल्या बारा वर्षांच्या मुलास बरोबर घेऊन आगगाडीच्या स्टेशनावर गेली. ती त्या मुलास एके गांवीं विद्याभ्यासास पाठवीत होती. ती विधवा असून फार गरीब होती, आणि तिला आपल्या मुलाचे गाडीच्या उताराचे पैसे जमविण्यास मोठे प्रयास पडले होते.

तीं मायलेकरें गाडीच्या स्टेशनाचा रस्ता चालत असतांना आई मुलास ह्मणते, मुला, तुझा बारावा वाढदिवस काल झाला, तो उद्यां झाला असता, तर किती बरें झालें असतें! कारण, तसें झालें असतें ह्मणजे तुला आज अर्ध्या भाड्यानें जातां आलें असतें; आणि मला तुला खाऊकरितां आठ आणे तुझ्याबरोबर देतां आले असते. परंतु आतां तुला भरभाडें दिलें पाहिजे, आणि तें दिलें ह्मणजे मग माझ्याजवळ तुझ्या बरोबर देण्याला दोन आणेही राहणार नाहींत.

काय ? त्या माझ्या नव्या पिशवीमध्यें ठेवण्याला तूं दोन आणे सुद्धां नाहीं देणार ? आई, मला शाळेंतील मुलगे काय ह्मणतील! मुलाचे हे शब्द ऐकून आईनें दुःखाचा सुस्कारा टाकिला. तिनें आपण कसे तरी हाल काढून त्याला नव्या पिशवींत ठेवण्याकरितां दोन आण्याचे पैसे दिले असते, परंतु तिच्या पाठीमागें घरीं आणखी पोरांचें लटांबर होतेंच. तीं उभयतां तिकिटें घेण्याच्या जागेजवळ येऊन पोहोंचलीं. मुलगा वयाच्या मानानें दिसण्यांत लहानच दिसे. तिकिटमास्तरानें त्या मुलाकडे पाहून ह्मटलें, काय, ह्याचें अर्धें तिकिटचना ? टाका आठ आण्यांचे पैसे.

ती आई तिकिटमास्तराचे हे शब्द ऐकून मनामध्ये जरा कांचरली. त्या मुलानें तिच्या मनांत काय आलें तें तत्काल जाणलें. तिनें नुसतें होय ह्मटलें असतें, किंवा ती मुकींच बोलली नसती. तर तिचे

आठ आणे पदरांत पडून तिच्याजवळ आपल्या मुलाला देण्यास कांहीं पैसे राहिले असते; परंतु ती एकदां पाहिल्यानें कांचरली तेवढीच. ती लागलीच तिकिटमास्तराला ह्मणाली, नाहीं; ह्या मुलाचें वय बारा वर्षांच्या वर आहे. असें ह्मणून तिनें त्याच्यापुढें मेजावर एक रुपया टाकिला. तिकिट घेऊन ती तें मुलाच्या हातांत देतांना ह्मणाली, बाळा, 'हें तिकिट घे'; तें तुला आपल्या पिशवीमध्यें सत्य घालून ठेवण्यास सांगत आहे. खोटें बोलून आठ आणे वांचविण्यापेक्षां आपण भरतिकिट घेतलें हेंच बरें.

त्या मुलानें गाडींत बसतांना प्रेमानें आईच्या कंबरेस मिठी मारली. तो आईचें बोलणें बरोबर आहे हें जाणत होता; परंतु तिचें ह्मणणें अगदीं कसें रास्त होतें, हें रेल्वेचा एक कामगार तिकिटें पाहण्याकरितां येईपर्यंत त्याच्या लक्षांत आलें नाहीं. त्या मुलाजवळ जर लबाडीचें तिकिट असतें, तर त्याच्यानें त्या कामदाराकडे पाहवलें असतें काय? परंतु आतां त्यानें भरतिकिट घेतलें असल्यामुळें त्याला कोणाची भीति नव्हती. त्या कामगारानें तें तिकिट पाहून 'ठीक आहे' असें ह्मटलें व खाटदिशीं गाडीच्या डब्याचा दरवाजा लावून घेतला. त्या 'ठीक आहे' ह्या शब्दांचा त्याच्या अंतःकरणामध्यें प्रतिध्वनि झाल्यासारखा झाला; व शेवटीं जेव्हां तो गाडींतून उतरला आणि आपलें तिकिट त्यानें दिलें, तेव्हां त्याला आपल्या रित्या पिशवीचा मोठा अभिमान वाटला.

जेव्हां जेव्हां पुढें त्याचें मन खोटें बोलण्याकडे वळे, तेव्हां तेव्हां त्याच्या मनांत आईचा तो 'नाहीं' हा शब्द पुढें येऊन उभा रहात असे; आणि तो त्याला कधीं खोटें बोलूं देत नसे. तो मुलगा शाळेमध्यें पुष्कळ गोष्टी शिकला. परंतु त्या रित्या पिशवीपासून जसा त्याला अत्यंत उपयुक्त बोध मिळाला तसा बोध त्याला दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपासून मिळाला नाहीं.

आपण एखादें शरम वाटण्यासारखें किंवा ज्याच्याकरितां आपणांस शिक्षा होईल असें कृत्य केलें, ह्मणजे कधीं कधीं आपल्या मनाची प्रवृत्ति खोटें बोलण्याकडे होत असते. परंतु ज्या गोष्टी आपण लपवूं पहात असतों त्या बहुतेक गोष्टींपेक्षां खोटें बोलणें हें फार वाईट आहे. शाळेंतील मुलांना सुद्धां त्यांच्यावर कोणीं खोटें बोलण्याचा आरोप आणिला ह्मणजे आपला मोठा अपमान केलासें वाटतें. कारण त्यांना असें वाटतें कीं, आपणांवर खोटें बोलण्याचा आरोप येणें ह्मणजे लोकांनीं आपणांवर अगदीं नीच प्रतीच्या भित्रेपणाचा आरोप करण्यासारखें आहे. शूर पुरुष असत्याचा तिरस्कार करितो. सरळ मनुष्याला कधीं खोटें बोलण्याचें कारणच पडत नाहीं. जीं मनुष्यें चांगली प्रेमळ आहेत तीं खोटें बोलून आपणांस लोकांच्या अविश्वासास कधींही पात्र करून घेणार नाहींत.

# सदसद्विचारशक्तीच्या आज्ञा.

## प्रामाणिकपणा व न्यायबुद्धि.

सदसद्विचारशक्ति दुसरें आह्मांस काय शिकविते? ती आह्मांस असें शिकविते कीं, आह्मीं प्रत्येक गोष्टी-मध्यें प्रामाणिकपणानें व न्यायानें वागावें. प्रामाणिक-पणा सत्याचें जुळें भावंड आहे. सत्य ह्मणजे घडलेली कोणतीही गोष्ट जशी घडली असेल तशी वास्तविक सांगणें. प्रामाणिकपणा ह्मणजे बोलल्याप्रमाणें आचरण करणें.

"हें रास्त नाहीं," असें एक मूल दुसऱ्या मुलाला ह्मणतांना तुह्मीं कधीं कधीं ऐकतां. त्यांतील "रास्त नाहीं" ह्या शब्दांचा अर्थ काय? त्यांचा अर्थ असा कीं, त्यांपैकीं एकानें जें कांहीं दुसऱ्याचें होतें तें घेतलें आहे. घेतलेली वस्तु बांकावरील जागा, खेळाची पाळी, एखादें पुस्तक, खेळणें, किंवा खोबऱ्याचा तुकडा किंवा अ-शीच एखादी दुसरी कांहीं वस्तु असेल; परंतु ती वस्तु घेणें रास्त नव्हतें, आणि मुलें ती घेणें गैर होतें हें समजतात. ज्या मुलानें ती वस्तु घेतली असेल तें मूल शरमतें, किंवा चिडतें; ज्यापासून ती घेण्यांत आली असेल, तें रागावतें; व तें गैरशिस्त किंवा अप्रा-माणिकपणाचें क्षुल्लक कृत्य होण्यापूर्वीं तीं जशीं एकत्र आनंदानें वागत असत तशीं पुढें वागत नाहींत.

कोणतेंही गैर कृत्य होऊन गेलें ह्मणजे मनें बिघ-

डून वेबनाव सुरू होतोच होतो; व ह्मणून लहान मुलांनींही परस्परांशीं प्रामाणिकपणानेंच वागलें पाहिजे. पुस्तकें आणि खेळणीं हींच मुलांचीं जिनगी होय. मुलांना जी वस्तु त्यांची स्वतांची असेल ती दुसऱ्यास अगदीं किंवा वापरण्याकरितां देणें यांत मोठा आनंद वाटतो. परंतु एका मुलानें दुसऱ्या मुलापासून त्याचीं वस्तु त्याच्या परवानगीशिवाय घेतली, तर त्यांना तो आनंद व्हावयाचा नाहीं. मुलांचा जर एकमेकांवर भरवसा नसेल, तर तीं परस्परांशीं मोकळ्या अंतःकरणानें कधीं वागावयाचीं नाहींत. त्यांचीं मनें परस्परांविषयीं संशयी होतील. ज्या घरांतील मुलांची स्थिति अशा प्रकारची आहे, त्या घरांतील कुटुंब सुखी आहे, असें ह्मणतां येईल काय ?

एखाद्या मुलाचें स्वताचें घर नसलें, तरी तें मूल आपल्या प्रामाणिकपणानें आपणास पाहिजेत तितकीं घरें करून घेईल; आणि त्याला जगामध्यें अगदीं एकटेंसें राहण्याचें कधीं भाग पडावयाचें नाहीं. एका फळफळावळ विकणाऱ्या दुकानदारानें आपल्या दुकानावर फळें विकण्याकरितां एक मुलगा ठेविला होता. त्या मुलाची आई आणि बाप लहानपणीं मरून गेलीं असल्यामुळें तो अगदीं पोरका आणि निराश्रित होता. तो एखाद्या पुलाच्या कमानीखालीं किंवा अशाच एखाद्या आच्छादित जागेमध्यें निजत असे. तो प्रत्यहीं सकाळीं उठल्याबरोबर आपल्या दुकानावर येऊन बसत असे. एके दिवशीं एका गिऱ्हाइकानें त्याच्या

दुकानांतून दोन आणे किंमतीचीं फळें विकत घेतलीं, आणि त्यानें त्यांबद्दल त्यास चुकून चवलीच्या ऐवजीं पावली दिली. तेव्हां तो मुलगा लागलाच त्या गिऱ्हाइकास ह्मणाला, तूं मला दोन आणे जास्त दिलेस, हे घे आपले; असें ह्मणून आलेले जास्त दोन आणे त्याच्या आंगावर फेंकून दिले. तो फळें विकत घेणारा मनुष्य आपल्याशीं ह्मणाला, हा मुलगा प्रामाणिक आहे, आतां मला पुन्हां कधीं फळें विकत घ्यावयाचीं झालीं, तर मी ह्याचेच दुकानीं घेईन.

दुसऱ्या एका दिवशीं एक बाई त्याचे दुकानीं द्राक्षें घेण्यास आली. ती त्यास ह्मणाली, त्या समोरच्या दुकानापेक्षां ह्या दुकानीं माल अधिक खऱ्या वजनानें मिळतो असें ऐकितें. तो मुलगा ह्मणाला, मी तुला बरोबर एक शेर द्राक्षें देत आहें; व तीं वजन करून देतांना त्यानें तिला तागडीचीं पारडीं कशीं अगदीं समतोल आहेत, हें दाखविलें. बाई ह्मणाली, तर मग तो समोरचा दुकानदार मला नेहमीं फसवीत असतो. ह्यापुढें मला फळें विकत घ्यावयाचीं झालीं ह्मणजे मी तुझ्याकडेच येईन. इतकें ह्मणून ती बाई त्या मुलाच्या वागणुकीचें मनामध्यें आश्चर्य करीत घरीं गेली.

ह्याप्रमाणें त्या मुलानें बहुतेक गिऱ्हाइकें आपलींशीं करून घेतलीं. त्याचा धनी आपल्या दुकानाची चलती पाहून फार खुष झाला. गिऱ्हाइकें त्याच्याशीं मोठ्या मित्रत्वानें वागूं लागलीं; व त्यांपैकीं एकानें त्यास एका मोठ्या दुकानामध्यें नोकरीस लावून दिलें. तेथें त्याची

जेवणाखाणाची व निजण्याबसण्याचीही चांगली सोय झाली. तो मुलगा प्रामाणिक असल्यामुळें त्या दुकानाचा धनी त्यास नेहमीं उधारीच्या वसुलाकरितां बाहेर पाठवीत असे; आणि पुढें तो दुकानांतील सर्व पैशाची व्यवस्थाही त्याच्यावरच सोंपवूं लागला. तो मुलगा मोठा झाल्यानंतर त्याचा सर्व संसार मोठ्या थाटानें चालूं लागला. त्याचें लग्न होऊन त्याला मुलेंबाळें झालीं, व त्यांसह त्याचे दिवस आनंदांत जाऊं लागून त्याची लोकांमध्यें प्रतिष्ठाही वाढली.

जें कांहीं दुसऱ्याचें असेल तें कधीं आपण घेतलें नाहीं, ह्मणजे आपण प्रामाणिकपणानें वागलों असें नाहीं. कोशामध्यें प्रामाणिकपणा हा शब्द काढून पहा; त्यामध्यें प्रामाणिकपणा आणि मान ह्यांचा अर्थ एकच दिलेला आहे. त्या दोन्ही शब्दांचा अर्थ न्यायानें आणि खरेपणानें वागणें, असा आहे. जगांतील संमाननीय गृहस्थ ह्मटले ह्मणजे जे नेहमीं न्यायानें आणि खरेपणानें वागतात ते होत. जेव्हां एखादा मनुष्य माझ्या शब्दांवर भरवसा ठेवा, असें ह्मणतो, तेव्हां त्याच्या ह्मणण्याचा अर्थ असा कीं, मी कधीं खोटें व अप्रामाणिकपणाचें काम करणार नाहीं.

जो गरिब मनुष्य दुसऱ्याची पैही घेत नाहीं, किंवा खोटें अगर हलकट काम करीत नाहीं, तोच मनुष्य जरी बोलण्यामध्यें तुटस असला, किंवा त्याचा पोषाख टाकटिकीचा नसला, तरी तो खरा संमाननीय गृहस्थ होय.

एखाद्याच्या अंगीं प्रामाणिकपणा असला ह्मणजे त्याची जगामध्यें योग्यता इतकी वाढते कीं, त्याजकडे पाहून सर्वांस असें वाटूं लागतें कीं, खरोखर प्रामाणिकपणा ही एक जगामध्यें अद्वितीय चीज आहे.

तर मग ज्या मनोवृत्तींच्या आणि कर्तव्यांच्या योगानें आह्मी आपल्या घरच्या कुटुंबामध्यें एकमेकांच्या उपयोगीं पडून आनंदानें एकत्र ठिकाणीं दिवस काढतों, आणि ज्यांच्या योगानें समाजरूपी महाकुटुंबामध्यें सर्वांच्या उपयोगीं पडण्यास आणि आपले आयुष्याचे दिवस आनंदानें काढण्यास समर्थ होतों, त्या मनोवृत्ती आणि तीं कर्तव्यें कोणतीं? तीं कर्तव्यें आणि त्या मनोवृत्ती ह्मटल्या ह्मणजे प्रीति, आज्ञाधारकत्व, उद्योगशीलता, सत्य, आणि प्रामाणिकपणा ह्या होत.

तथापि कित्येक कुटुंबांमध्यें ह्या सर्व मनोवृत्ती आणि कर्तव्यें ह्यांची वसति विपुल असूनही एका गोष्टीची उणीव असते; आणि तीमुळें आयुष्यांतील सुखाचा बराच बिघाड होतो. ती गोष्ट कोणती ह्याचा आतां विचार करूं.

---

## आदरबुद्धि.

एखाद्या यंत्राचीं चक्रें आपल्या आसाभोंवतीं गरगर फिरत असतांना कशीं घरघर वाजत असतात, तें तह्मी कधीं ऐकिलें नाहीं काय? यंत्र पाहूं गेलें तर दुरुस्त स्थितींत असतें, आणि त्याचें कामही सुरळीतपणें

प्रार्थना ग्रंथ संग्रहालय.



चाललेलें असतें. परंतु चाकाची घरघर बंद होण्यास त्यांना थोडेसें तेल लाविलें पाहिजे. त्याचप्रमाणें चांगले, प्रामाणिक, आपल्या कामाविषयीं व कर्तव्याविषयीं दक्ष, असे लोक एकत्र रहातांना तुमच्या पहाण्यांत येतात; परंतु त्यांचें बोलणेंचालणें इतक्या दांडगाईचें व असभ्यतेचें असतें कीं, त्यांच्यामध्यें वारंवार भांडणें आणि धुसफुस चालते. ह्यांचा सहवास प्रेमळ व परस्परांस सुखकर असा होऊन, तो सुरळीतपणें चालण्यास त्यांस सभ्यता आणि आदरबुद्धि ह्या दोन तेलांची आवश्यकता आहे. दांडगाई, आणि त्यांत मुलांची दांडगाई, ह्मणजे कांहीं अपराध नाहीं, असें कोणास वाटेल; परंतु तसें नाहीं. डांस हा अति लहान जीव आहे. परंतु तोही चावला असतां आंगास आग सुटतेच.

एखादें मुल, त्यास कांहीं विचारलें असतां, कांहीं जबाब देत नाहीं; एखादें, आमचें ह्मणणें न ऐकतां, आमच्याकडे पाठ करून उभें रहातें; एखादें, आह्मीं स्वस्थ अभ्यासामध्यें निमग्न असतां, आमच्यापुढें जांभया देत रहातें, किंवा शीळ घालतें; एखादें रस्त्यामध्यें आपणांस धक्का देऊन जातें, किंवा एकीकडे होऊन दुसऱ्यास जाण्यास सोयीचा मार्ग देत नाहीं; एखादें खडाखड दरवाजे वाजवीत बसतें; एखादें जेवणाचे वेळेस इतर मुलांस कांहीं न देतां आपणच सर्व खाऊं लागतें; एखादें कोणी पाहुणा किंवा मित्र आपल्या घरीं आला, तर त्याचें आगतस्वागत करण्याचें किंवा त्याच्याशीं आनंदानें बोलण्याचें सो-

डून त्याच्याकडे एकसारखें उगीच रेंखून पहात असतें; आणि एखादें स्वतांस जास्त समजतें ह्मणून नव्हे, तर खोडी लागल्यामुळें दुसऱ्यानें कांहीं ह्मटलें तर तसें नाहीं, असें एकदम ह्मणत असतें. मुलांच्या ह्या सर्व अप्रयोजक वागणुकींचा इतरांस राग येऊन मोठा त्रासही होतो. ह्या खोड्या जर मुलांच्या हाडीं खिळून गेल्या, तर त्यांच्या योगानें त्यांचा स्वभाव कडवा होतो, आणि त्यांच्या मनोवृत्तीही त्यांच्या बाह्य चालचर्येप्रमाणें दांडग्या आणि उच्छृंखल होऊन जातात.

ज्या मनुष्याची वागणूक दांडगी आहे, त्याच्या थाऱ्यास उभें राहूं नये, असें वाटतें. त्याला पाहिल्याबरोबर पहाणारास त्याचा मोठा तिटकारा येतो. बरें, ज्या मनुष्याचें वर्तन प्रेमळ आणि सभ्य आहे, त्या मनुष्याकडे आपणांस मुद्दाम जावेंसें वाटतें. ह्मणजे तो मनुष्य आपणांला आकर्षूनच घेतो. ह्याप्रमाणें दांडगाईपासून चांगल्या लोकांची संगति आणि सहवास आपणांस सुटूं लागतो; आणि शेवटीं जणूं काय आपण जगामध्यें अगदीं एकटे आहों, अशी आपली स्थिति होते. ह्याच्या उलट, आपल्या आंगामध्यें सभ्यता आणि विनय हे गुण असले ह्मणजे आमची तेव्हांच चांगल्या लोकांबरोबर संगति जुळूं लागते.

आधीं दांडगाईचें आणि अनादराचें वर्तन कोणाबरोबर ठेवलें तरी तें वाईटच; परंतु त्यांत मुलांनीं आपल्या आईबापांबरोबर तशा प्रकारचें वर्तन ठेवणें, हें तर फारच वाईट. आईबापांस मान देत जा, ही सर्व

धर्मशास्त्रांची पहिली आज्ञा आहे, असें ह्मटलें तरी चालेल. आपल्यापेक्षां जे अधिक शहाणे आणि समंजस आहेत, त्यांच्याविषयीं आपल्या मनामध्यें आदरबुद्धि असणें व त्यांस मान देणें, ह्या दोन गोष्टींवरच आमचीं सर्व भावी सुखें अवलंबून असतात. मुल कितीं जरी हुषार असलें, तरी त्याच्यानें त्या वयामध्यें आपल्या आईबापांची बरोबरी करवावयाची नाहीं. जें ज्ञान पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्राप्त व्हावयाचें, तें ज्ञान लहानपणीं मुलांच्या मनांत सांठवून ठेवतां यावयाचें नाहीं. मुलाची समजूत व ज्ञान हीं जसजशीं वाढत जातात, तसतसें त्यास, आपल्यापेक्षां ज्यांचें शहाणपण व ज्ञान अधिक आहे त्यांस आपण मान देत गेलें पाहिजे, हें कळूं लागतें.

लोकांच्या मनांतून उतरून जाण्यासारखें जर आपल्या हातून कांहीं झालें नसेल, तर त्यांनीं आपणांस मान द्यावा असा आपला हक्क आहे, असें आपणां सर्वांस वाटत नाहीं काय? अगदीं लहान मुलाला सुद्धां जर कोणीं वाईट रीतीनें वागविलें, तर त्याचा त्यास राग येत नाहीं काय? फार कशाला, नेहमीं आपल्या पाठीमागून फिरणाऱ्या एखाद्या कुत्र्याला किंवा मांजराला दटावून रागानें एकीकडे लोटून दिलें, तर त्याचें त्याला सुद्धां वाईट वाटतें. कारण, जी जी वस्तु सजीव असून जिला संवेदनशक्ति आहे, ती ती प्रत्येक वस्तु आपल्या भूतदयेस आणि अंशतः आपल्या आदरबुद्धीस पात्र आहे, मग ती वस्तु एखादा मानवी

प्राणी असो, किंवा ईश्वरनिर्मित पदार्थांपैकीं ज्याचें अस्तित्व आपल्या तर्कापलीकडचें आहे असा एखादा विलक्षण व सुंदर मनुष्येतर प्राणी असो. जो मनुष्य सजीव वस्तूंशीं मार्दवानें वागून त्या ज्या मानानें निर्बल असतील त्या मानानें त्यांस आपल्या दांडगाईच्या वर्तनानें न दुखविण्याविषयीं विशेष काळजी घेतो तोच मनुष्य खरा सज्जन होय. मोठ्या माणसांमध्यें आणि लहान मुलांमध्यें अति नीच आणि अति दांडगे असे कोण? ज्यांना सुंदर वस्तु कोणती हें बुद्धीच्या जडपणामुळें आणि अज्ञानामुळें कळत नाहीं, आणि ज्यांचीं मनें इतकीं पतित झालीं आहेत कीं, ज्यांना मोठें कोणतें व चांगलें कोणतें हें कळत नाहीं ते. एखादा मुलगा पतंग आपले पंख पसरीत असतां ते ओढून त्यांचे तुकडे तुकडे करतो; एखादा रस्त्यांतून जाणाऱ्या लहान उद्योगी जीवजंतूंस आपल्या पायांनीं तुडवून मारून टाकितो; एखादा झाडाझुडपांमध्यें मधुर स्वरानें गात असलेल्या नाजुक पक्ष्यांवर धोंडा फेकितो; आणि एखादा झाडावर फुललेलीं आणि वाऱ्यानें देठांवर मोठ्या तोऱ्यानें हालणारीं सुकुमार फुलें तोडून तीं कुसकरून टाकितो. ह्या सर्व मुलांना ह्या वरील वस्तूंचें सौंदर्य जाणण्याचें ज्ञान किंवा त्यांच्या अस्तित्वाची अपूर्वाई समजण्याची बुद्धि नसते. त्यांची वृत्ति, ज्यास कशांत कांहीं मौज किंवा गंमत वाटत नाहीं, अशा एखाद्या अति नीच प्रतीच्या रानटी मनुष्याप्रमाणें असते.

तें पहा, दोन पुरुष एका रमणीय देवालयामध्यें शिरत आहेत. तेथें मोठमोठ्या सिद्ध आणि साधु पुरुषांच्या पादुका स्थापन केलेल्या आहेत. सभामंडपामध्यें एका प्रेमळ बोवाचें हरिकीर्तन चाललें आहे. टाळ, मृदंग, वीणा, इत्यादि वाद्यांचा मधुर स्वर एकवटून गेला आहे. त्या दोन पुरुषांपैकीं एक पुरुष श्रोतृजनांमध्यें मोठ्या अदबीनें येऊन बसला. तो तेथें कोणाजवळ बोलल्याचालल्याशिवाय अखेरपर्यंत शांतपणें कीर्तन श्रवण करीत राहिला. हें त्याचें सभ्यपणाचें व थोरपणाचें वर्तन पाहून तेथलि लोकांस मोठा आनंद झाला.

दुसरा पुरुष सभामंडपामध्यें शिरला तो कांहीं वेळ खिशामध्यें हात घालून इकडे तिकडे मोठ्या डौलानें फिरत राहिला. ह्याला धक्का दे, त्याला धक्का दे, ह्याशीं बोल, त्याशीं बोल, असें करून त्यानें त्या सभामंडपामध्यें अगदीं एकच गडबड करून सोडली. तेथें चाललेल्या मधुर गायनवादनाच्या योगानें आपलें मनोरंजन करून घेण्याचें किंवा हरदासबोवानें चालविलेलें वेदान्तप्रतिपादन समजण्याचें त्याच्या आंगीं ज्ञान नव्हतें. तो तसाच रेंगळत व गडबड करीत कांहीं वेळ इकडे तिकडे फिरला; व कीर्तन पुरें होण्यापूर्वीच कंटाळून तेथून निघून गेला. त्याच्या जाण्यानें सर्व लोकांस मोठा आनंद झाला. त्याच्या अज्ञानाचा आणि फाजिल वर्तनाचा सर्व लोकांस कंटाळा आला. पहिला पुरुष शहाणपणाच्या आणि अ-

दवीच्या वर्तनानें सर्वांस हवासा झाला; व दुसरा पुरुष अज्ञानामुळें आणि दांडगाईच्या वर्तनानें सर्वांस नकोसा झाला.

तसेच ते समोरून दोन मुलगे येत आहेत, ते पहा. ते मुलगे अगदीं लहान नाहींत; ते जें कांहीं वाचतात किंवा ऐकतात तें समजण्यासारखे मोठे आहेत. त्यांपैकीं एक असा आहे कीं, तो कधीं कोणत्याही गोष्टीचा विचार करीत नाहीं, किंवा त्याला कोणत्याही गोष्टीचें कांहींच वाटत नाहीं. त्याला कोणीं श्लोक वाचावयास सांगितलें, तर तो त्याचा अर्थ मनांत आणल्याशिवाय एखाद्या पोपटाप्रमाणें भराभर ह्मणून टाकतो; व तो एकदां ह्मणून झाला ह्मणजे आपलें काम झालें, असें वाटून त्याला आनंद होतो. कोलंबसानें अज्ञात समुद्रामधून नवीन महाद्वीप शोधून काढण्याकरितां कसें जलपर्यटन केलें, हें तो शाळेमध्यें पंतोजीच्या धाकानें पुस्तकांतून वाचतो. परंतु तें एकदां वाचून केव्हां पुरें होईल असें त्याला झालेलें असतें. खाणीमध्यें काम करणाऱ्या गरीब मजूर लोकांच्या सुरक्षिततेकरितां सर हंफ्रे डेव्ही साहेबांनीं शोधून काढलेल्या सुरक्षित दिव्याच्या रचनेच्या संबंधानें तो पुस्तकामध्यें वाचीत असतो. परंतु त्या दिव्याची रचना कोणत्या प्रकारची आहे, हें समजावून घेण्यापूर्वी त्या पुस्तकांतील दुसरा एखादा मनोरंजक धडा वाचण्याची त्याला अगदीं घाई झालेली असते. एक उदार डाक्टर एका दवाखान्यास-

मोंवतालच्या गटारांची व मोऱ्यांची व्यवस्था बरोबर नसल्यामुळें तेथील हवा दूषित होऊन रोग्यांच्या आरोग्यास अपायकारक होते, अशा संशयावरून तीं गटारें व मोऱ्या उखडून त्या साफ करण्याच्या उद्योगास लागला. परंतु उखडलेल्या गटारांतून व मोऱ्यांतून एकदम दूषित हवेचा भपकारा बाहेर येऊन, त्या डाक्टराचा तेथल्या तेथें अंत झाला अशी खबर तो लोकांच्या तोंडून ऐकतो, परंतु त्याचें त्याला कांहीं वाटत नाहीं. कारण लोकांस काय होतें किंवा त्यांची स्थिति कशी आहे, ह्याविषयीं तो बिलकूल विचार करीत नाहीं.

त्यांपैकीं दुसरा मुलगा असा आहे कीं, तो जें कांहीं वाचतो किंवा ऐकतो त्याचा पूर्णपणें विचार करतो. वाचलेली किंवा ऐकलेली गोष्ट त्याच्या मनांत घोळत असते. त्यानें एखादा श्लोक ह्मटला तर तो त्यांतील सर्व अर्थ समजावून घेऊन ह्मणतो, आणि त्यांत सांगितलेला उपदेश आपल्या मनामध्यें बाळगून ठेवितो. तो पुस्तकामध्यें जेव्हां कोलंबसाच्या संबंधाची गोष्ट वाचतो, तेव्हां त्या शूर पुरुषानें नवीन महाद्वीप शोधून काढण्याकरितां केवढें मोठें साहस केलें, ह्याचें त्याला मोठें आश्चर्य वाटतें, आणि त्याला त्या साहसामध्यें जीं संकटें व ज्या अडचणी आल्या, त्यांचें निवारण करण्याच्या कामीं आपल्या हातून कांहीं मदत झाली असती तर बरें झालें असतें, असें त्याच्या मनांत येतें. तो सर हंफ्रे

डेव्ही साहेबांच्या सुरक्षित दिव्यांचें वर्णन वाचीत अ-
सतां, त्यांची रचना समजावून घेऊन त्यापासून खोल
खाणीमध्यें खणणाऱ्या लोकांस सुरक्षित रीतीनें कसा
उजेड प्राप्त होतो, ह्याची माहिती करून घेतल्याशि-
वाय कधींही पुढें जात नाहीं. त्याचप्रमाणें दवाखा-
न्यांतील अनाथ रोग्यांच्या सोईकारितां आणि सुखा-
कारितां काळजी वहाणाऱ्या त्या उदार डाक्टराचा
दूषित हवेच्या भपकाऱ्यानें अंत झालेला ऐकून त्या-
च्या डोळ्यांतून एकसारख्या खळखळ अश्रुधारा वाहूं
लागल्याशिवाय रहात नाहींत.

ह्या दोन मुलांपैकीं कोणता मुलगा मोठेपणीं चां-
गला, ममताळू आणि उदार होण्याचा संभव आहे?

ह्या भूतलावरील अति क्षुद्र प्राण्याविषयीं कळवळा
असणें, ईश्वरनिर्मित किंवा मनुष्यनिर्मित प्रत्येक पदा-
र्थाविषयीं कौतुक वाटणें, आणि जे चांगले, शहाणे
आणि उदार आहेत, त्यांच्याविषयीं आदरबुद्धि
असणें ह्या सर्व आपल्या मनामध्यें चांगल्या व-
स्तूंचा दाता आणि सर्व रमणीय वस्तूंचें आदिस्थान
जो ईश्वर त्याच्याविषयीं पूज्यभाव किंवा खरी धर्मबुद्धि
उत्पन्न करणाऱ्या पायऱ्याच आहेत. ह्यावरून इतकें
उघड होतें कीं, मानवी सौजन्याची पहिली शर्त अशी
कीं, आपल्याजवळ आपणांस जिच्यावर प्रीति करतां
येईल अशी एखादी वस्तु असणें; आणि दुसरी शर्त
अशी कीं, आपल्याजवळ ज्याच्याविषयीं आ-
पणांस आदरबुद्धि आहे, असें कांहीं असणें.

## स्वाभिमान.

जगामध्यें असा एक मानवी प्राणी आहे कीं, तो कदाचित् अति सुज्ञ किंवा उत्तम नसेल, तरी त्याला आह्मीं विशेषेंकरून मान दिला पाहिजे. हा प्राणी आपल्या स्वतांशिवाय दुसरा कोणी नव्हे. एखाद्यानें कांहीं गैर किंवा नीच गोष्ट केली तर त्याला " तुझी तुला लाज वाटली पाहिजे " असें कोणी ह्मणतांना तुह्मी ऐकिलें नाहीं काय ? आणि असें ह्मणणें ह्मणजे त्या मनुष्याचे दोन भाग कल्पून एका भागास दुसऱ्या भागाची लाज बाळगण्यास सांगण्याप्रमाणेंच नव्हे काय ?

ह्याप्रमाणें आमचे दोन भाग केले जातात. आमच्या स्वभावाचे नीच आणि उच्च असे दोन भाग करितां येतात. नीच भागामध्यें पशुतुल्यवृत्तींचा समावेश होतो. ह्या पशुतुल्यवृत्ती आपणांस क्षुधा, तृषा निद्रा, आणि सर्व ऐहिक सुखांची इच्छा तृप्त करून घेण्यास लावितात. आमच्या श्रेष्ठ स्वभावामध्यें आत्मिक वृत्तींचा समावेश होतो; आणि त्या आपणांस लोकांवर प्रीति करावी, त्यांविषयीं काळजी वाहवी, त्यांच्यावर उपकार करावे, व नेहमीं सदाचारानें वागावें असा उपदेश करीत असतात.

आमचा हा नीच किंवा खालच्या प्रतीचा स्वभाव मुळचाच वाईट आहे असें नाहीं. प्राण्यांना क्षुत्पिपासादि शारीरिक प्रवृत्ती, आणि स्वसुखेच्छा ह्या असतातच; आणि ह्या आह्मांलाही असल्या पाहिजेत.

परंतु ह्या पशुतुल्य वृत्ती जर आमच्या आत्मिक वृत्तींस भारी होऊं लागल्या, आह्मी जर खाण्यावर इतकी प्रीति ठेवूं लागलों कीं, त्याच्याशिवाय आह्मांस दुसरें कांहीं सुचूंच नये, जर आह्मी निद्रेवर इतकी प्रीति ठेवूं लागलों कीं, निद्रा घेऊन घेऊन, आह्मी अगदीं आळसाचे पुतळे बनलों, आणि आह्मांस जें आवडत असेल तें प्राप्त करून घेण्याविषयीं आह्मी जर इतके उत्सुक होऊं लागलों कीं, आह्मी इतरांबरोबर सौजन्यानें आणि न्यायानें वागण्याचें सोडून गैरइमानानें वागूं लागलों, तर मात्र आमच्या उच्च किंवा वरच्या प्रतीच्या स्वभावाचा नीच किंवा खालच्या प्रतीच्या स्वभावानें अगदीं पाडाव केला आहे असें होतें; आणि त्याबद्दल आमची आह्मांस खरोखर लज्जा वाटली पाहिजे.

ह्यास्तव आपल्या सदसद्विचारशक्तीच्या आणि श्रेष्ठ मनोवृत्तींच्या धोरणानें आपले आयुष्याचे दिवस सत्कृत्यांमध्यें घालवून आपल्या नीच किंवा खालच्या प्रतीच्या स्वभावाच्या किंवा स्वार्थपर मनोवृत्तींच्या तडाक्यांत न सांपडणें, ही गोष्ट आपणांस अत्यंत हितावह आहे. प्रत्येक गोष्ट करतांना सदसद्विचारशक्तीच्या आज्ञांप्रमाणें वागणें ह्मणजे आपल्या आंगीं स्वाभिमान असणें होय.

एक दिवस दोन मुलगे एका दुकानावरून चालले होते. त्या दुकानामध्यें सुंदर पिंवळे धमक पेरू विकण्याकरितां मांडलेले होते. दुकानावर राखण कर-

ण्यास कोणी नव्हतें. त्यांतील एक मुलगा दुसऱ्यास ह्मणतो, त्या पेरूंपैकीं तूं एक पेरू कां घेत नाहींस? तूं पेरू घ्यावयास लागलास तर तुला कोणी पाहील ही धास्ती नको, कारण तेथें कोणी नाहीं. तो मुलगा उत्तर करतो तेथें कोणी नाहीं कां? तेथें एकजण आहे. मीच तेथें आहें; आणि मी अशी गोष्ट करीत आहें, हे माझें मलाच पहावयाचें नाहीं का? जो मुलगा हें ह्मणाला तो फार लहान आणि गरीब होता; परंतु जगांतील सर्व संपत्तीपेक्षां अधिक चांगलें असें कांहीं त्याच्याजवळ होतें. मनुष्यास जगांतील सर्व संपत्ति प्राप्त झाली आणि त्याचा आत्मा जर नष्ट झाला तर त्याचा काय उपयोग?

जेव्हां एखादें मूल कांहीं वाईट कृत्य करतें आणि मला त्याबद्दल कांहीं वाटत नाहीं असें ह्मणतें, तेव्हां त्याच्या ह्मणण्याचा अर्थ असा कीं, मीं मूर्खपणानें वाईट गोष्ट केली, व पुढेंही तशीच करणार. आपल्या हातून वाईट गोष्ट झाली असतां आपणांस जर वाईट वाटलें, तर त्याचा अर्थ असा कीं, आतां आह्मांस पूर्वीपेक्षां जास्त समजतें; आणि जास्त समजूं लागल्याबद्दल कोणासही लज्जा वाटण्याचें कारण नाहीं. वाईट कृत्य करून मनाला त्याच्यासंबंधानें कांहीं वाटत नाहीं असें ह्मणणारे, किंवा ज्यांच्या आंगीं स्वाभिमान नाहीं असे लोक कांहीं थोडे थोडके नाहींत. तुरुंग, दारूचे पिठे, जुगार खेळण्याचीं घरें, हीं सर्व अशा लोकांनीं भरलेलीं आहेत. ते तेथें बऱ्या-

वाईट गोष्टींचा कांहींएक विधिनिषेध न बाळगितां मनमोक्त रीतीनें वागून आपणांस व आपणांवर अवलंबून असणाऱ्या लोकांस दुःखामध्यें घालून घेत असतात.

जो मनुष्य दुसऱ्या एखाद्याचा पैसा किंवा दुसरी कांहीं वस्तु चोरतो, जो मनुष्य यथेच्छ मद्यपान करून रस्त्यामध्यें झोंके खात एखाद्या वेड्या मनुष्याप्रमाणें फिरतो, किंवा जो मनुष्य कपटानें किंवा लबाडीनें दुसऱ्यास बुडवून आपलें हित साधूं पहातो, त्याच्या आंगीं स्वाभिमान आहे, असें ह्मणतां येईल काय? जे लोक आपलीं आंगें स्वच्छ ठेवीत नाहींत, आपले लत्तेकपडे नीटनेटके राखीत नाहींत, व ज्यांचें वर्तन घाणेरडें आणि बेशिस्त असतें, अशा लोकांना स्वाभिमान ह्मणजे काय हें कळतें असें कोणी तरी ह्मणेल काय? अगदीं लहान मुलही असें ह्मणेल कीं, ह्या लोकांची आणि स्वाभिमानाची बिलकूल ओळखही नाहीं.

मुलांनो, तुह्मी अद्यापि लहान आहां. सदसद्विचारशक्ति आणि आपल्या श्रेष्ठ मनोवृत्ती ह्यांस ज्या गोष्टी मान्य होतील, अशाच गोष्टी मनामध्यें आणीत गेल्यानें व करीत गेल्यानें आपलें आपणांला समाधान वाटून जो आनंद होतो तो तुह्मांस कळावयाचा नाहीं. तुमच्यावर ह्या जागामध्यें पुष्कळ संकटें आणि कठिण प्रसंग येण्याचा संभव आहे; परंतु तुह्मी सदाचारानें वागून लोकांवर उपकार करीत गेल्यास तुह्मांस त्यांची भीति वाळगण्याचें कारण नाहीं. आपली ह्या जगाम-

ध्यें स्थिति कोणत्याही प्रकारची असो, आपण जर सरळ, प्रामाणिक, आणि चांगल्या रीतीनें वागत गेलों, तर आपल्या मनाला जी शांति प्राप्त होते, ती शांति जगांतील कोणत्याही सुखानें प्राप्त व्हावयाची नाहीं, किंवा दुःखानें जावयाची नाहीं.

---

## मनुष्यजातिरूपी कुटुंब.

जर आपणांस जन्मल्यापासून मरेपर्यंत आपल्या घरांतच रहावयाचें असतें, आणि आपलीं सर्व कर्तव्यें, ज्यांची आपल्यावर प्रीति आहे अशा मनुष्यांच्या सुखकर सहवासामध्यें करावयाचीं असतीं, तर आपणांस हें जग एक अत्यंत आनंदाचें आणि रमणीय स्थान आहे असें वाटलें असतें. तथापि अशा स्थितीमध्यें रहाणें आपल्यापैकीं कोणालाही आवडणार नाहीं. ज्या मनुष्यांविषयीं आह्मी काळजी वहातों, व ज्या पदार्थांपासून आपणांस ह्या जगामध्यें सुख होतें अशीं माणसें व असे पदार्थ ह्यांचा जर आमच्या घराच्या चार भिंतींच्या आंतच समावेश झाला असता, तर आपणांस अगदीं स्वतांचें घरही तुरुंगाप्रमाणें वाटलें असतें. कारण, आई, बाप, भाऊ, बहिणी एवढेंच आपलें कुटुंब नाहीं, तर सर्व मनुष्यजाति हेंही आपलें कुटुंब आहे. ह्या मनुष्यजातिरूपी महा कुटुंबांतील माणसांशीं आपला कसा काय संबंध असतो ह्याचा आतां विचार करूं.

आह्मां बहुतेकांस शेजारी, मित्र व कांहीं जवळचीं

नात्याचीं व ओळखीचीं माणसें असतातच, त्यांच्या घरीं आपणांस पाहिजे त्या वेळीं जाण्याची परवानगी असते, आणि खुद्द स्वतांच्या सुखदुःखापेक्षांही त्यांच्या सुखदुःखाविषयीं आपण जास्त काळजी बाळगितों. जीं माणसें आमच्यापासून शेंकडों कोशांवर दूर आहेत त्यांच्याकडून आपणांस हम्मेश पत्रें येत असतात; आणि तीं अगदीं जवळ असलेल्या माणसांप्रमाणें आमच्या मनांतून कधींही जात नाहींत. जरी आह्मी घरीं रहात असलों, आणि ज्या देशामध्यें किंवा ज्या शहरामध्यें किंवा खेड्यांत आपण रहातों त्याच्या पलीकडे कधीं फारसे जात नसलों, तरी आमचीं मनें जीं ठिकाणें आपण पाहिलीं नाहींत अशा ठिकाणीं राहणाऱ्या मनुष्यांकडे एकसारखीं लागलेलीं असतात.

ज्यांच्यावर आमची प्रीति आहे अशांकडे आमचे विचार जाण्यास अंतराचा प्रतिबंध होत नाहीं. आपण कितीही दूर असलों, तरी आपल्या मनांत एकदां जन्मभूमीचे विचार आले ह्मणजे आपणांस तत्क्षणींच घरीं आहों असें वाटूं लागतें. आपल्या ह्या इहलोकींची स्थिति अशी आहे कीं, जगाच्या ह्या सर्व मनुष्यांनीं परस्परांची काळजी वाहून परस्परांकरितां श्रम केले पाहिजेत.

उदाहरणार्थ आपण जें अन्न नेहमीं खातों तें आपणांस कसें प्राप्त होतें ह्याचा आपण क्षणभर विचार करूं. आपणांस तें अन्न प्राप्त करून देण्याकरितां

संपूर्ण जगभर हजारों लोक खपत आहेत. पितळी-मध्यें पीठ मळून तव्यावर भाकरी भाजली ह्मणजे झालें, असें आपणांस वाटतें; परंतु ह्या भाकरीचें पीठ घरांत येऊन पडेपर्यंत असंख्य लोकांचे श्रम खर्च झालेले आहेत. पहिल्यानें शेतकरी शेतांत धान्य पेरितो; परंतु त्याला आपला नांगर व इतर सर्व शेतकीचीं हत्यारें मिळविण्यास सुताराची व लोहाराची जरूर लागते; बरें एकदां धान्य पिकून तयार झालें ह्मणजे तें दळून त्याचें पीठ करण्याकरितां जात्याची जरूर आहेच. हें जातें मिळविण्याकरितां आपणांस दगडाचें काम करणारे बेलदार व टाकीवाले ह्यांच्याकडे गेलें पाहिजे. पीठ दळून तयार झालें ह्मणजे त्याची भाकरी बनविण्यास आपणांस सर्पण, चूल, पितळी, तवा इत्यादि पदार्थांची जरूर आहेच. हे सर्व पदार्थ तयार होण्यास तरी अशाच प्रकारें किती तरी लोकांचे श्रम खर्च झालेले आहेत. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला ह्मणजे नुस्ती भाकर मिळण्यास आपणांस किती लोकांचें साहाय्य लागतें हें आपल्या चांगल्या लक्षांत येईल. हें नुसतें भाकरीच्या संबंधानें झालें. आपणांस लागणाऱ्या दुसऱ्या प्रत्येक गोष्टीच्या संबंधानें सुद्धां असेंच आहे.

कदाचित् तुह्मी असें ह्मणाल कीं, भाकरी मिळविण्यास इतके श्रम पाहिजेत कशाला? स्वतां धान्य पिकवून त्याचें पीठ करून भाकर तयार करितां येणार नाहीं काय? थोड्याच लोकांकरितां भाकर त-

यार करावयाची असती, तर कदाचित् कांहींना ही गोष्ट साधली असती. परंतु कोट्यावधि लोकांस भाकरीची जरूर आहे; व ती त्यांस अगदीं थोडक्या खर्चांत व थोड्या श्रमानें प्राप्त झाली पाहिजे, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. भाकरीकरितां लागणारे सर्व श्रम घरोघर होत गेले असतां ती आपणांस जेवढ्या किंमतीस मिळेल, तिजपेक्षां निरनिराळ्या धंद्यांच्या लोकांमध्यें जो श्रमविभाग चालतो, व जीं यंत्रें वापरण्यांत येतात त्यांच्या योगानें ती आपणांस फारच कमी किंमतीस मिळते. अशा रीतीनें भाकर स्वस्त पडते, हें ह्मणणें कित्येकांस चमत्कारिक वाटेल. परंतु खरा प्रकार अगदीं तसाच आहे. तेथें आमचा इलाज नाहीं.

नुसत्या भाकरीला जर इतक्या लोकांचे श्रम लागतात, तर आपल्या पक्कान्नांमध्यें व चहामध्यें घालण्याकरितां लागणारी साखर मिळविण्यास किती दगदग व श्रम पडत असतील ह्याचा विचार वाचकांनींच करावा. धान्य प्रत्येक देशामध्यें उत्पन्न करितां येतें. परंतु साखरेची गोष्ट तशी नाहीं. ती कांहीं नेमक्या देशांमध्यें उत्पन्न होते; व ती तयार करण्याची दगदगही मोठीच आहे. आपल्या अन्नवस्त्राच्या प्रत्येक गोष्टीच्या संबंधानें असेंच आहे. आपणांस स्वदेशांतील व परदेशांतील लोकांचें जें साहाय्य मिळत आहे, तें जर बंद झालें, तर आमची स्थिति वस्त्रहीन रानटी लोकांपेक्षां सुद्धां अधिक वाईट होईल.

आपल्या सुखाकरितां आणि सोयीकरितां आपणांस दुसऱ्या देशांतून पुष्कळ वस्तू आणाव्या लागतात; आणि आमच्यापासून दूर आहेत अशा लोकांविषयीं सुद्धां आह्मांस प्रेम आणि कळवळा असल्यामुळें त्या वस्तू आणविण्याकरितां, आपली खुशाली कळविण्याकरितां, किंवा आपणां स्वतांस तिकडे नेण्याकरितां सांप्रत शेंकडों नवीन युक्ती निघाल्या आहेत. रस्ते, गलबतें, आगगाड्या, तारायंत्रें वगैरे सर्व गोष्टी, आपले व्यापाराचे जिन्नस, पत्रें, निरोप, पुस्तकें, वर्तमानपत्रें जलमार्गानें आणि खुष्कीच्या मार्गानें, हवेंतून आणि जमिनींतून नेण्याकरितां तयार केलेल्या आहेत. तर्त आपली स्थिति अशी आहे कीं, आपणांस पाहिजे त्या ठिकाणीं जातां येण्यास आणि आपलीं सर्व कामें एकत्र रीतीनें चालवितां येण्यास अंतराची किंवा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची अडचण येत नाहीं.

एखाद्या निरभ्र दिवशीं जर तुह्मांस विमानांत बसून आपला हा सर्व हिंदुस्थान देश पाहतां आला असता, आणि जें सर्व कांहीं चाललें आहे तें एकदम दिसण्यासारखी जर तुमची नजर तीक्ष्ण असती, तर जिकडे तिकडे कोट्यावधि लोकांचें पर्यटन चाललें आहे, त्यापैकीं कित्येक एखाद्या विस्तीर्ण जाळ्यामध्यें देशभर पसरणाऱ्या लोखंडी रस्त्यांवरून आगगाड्यांतून चालले आहेत, कित्येक गाड्यांतून, घोड्यांवरून किंवा पायीं प्रवास करीत आहेत, आणि

मोठमोठ्या शहरांतून लोकांचे थव्याच्या थवे मुंग्यांप्रमाणें धांदलीनें जात येत आहेत, असें तुमच्या दृष्टीस पडेल.

हे सर्व लोक कोठें चालले आहेत ह्याचा जर तुह्मी विचार कराल, तर त्यांपैकीं कांहीं आपल्या इष्टमित्रांस किंवा आप्तवर्गास भेटण्यास चालले आहेत; कांहीं आपल्या घरीं चालले आहेत; कांहीं शेतें, गिरण्या किंवा कचेऱ्या यांमध्यें काम करण्याकरितां जात आहेत; ह्मणजे ते सर्व ज्यांच्याशीं ते प्रीति, कर्तव्य, हितसंबंध, किंवा अपरिहार्यता इत्यादि गोष्टींनीं जोडलेले आहेत, त्यांच्याकडे चालले आहेत असें तुह्मांस आढळून येईल.

बरें, ह्या आगगाड्या मनुष्यांखेरीज दुसरें काय घेऊन चालल्या आहेत? त्या नेहमीं लक्षावधि पत्रें नेत आणीत आहेत. एखाद्या दूरच्या माणसाकडून आलेलें पत्र घेऊन जेथें मधून मधून टपालाचा शिपाई जात नाहीं असें लहानसहान खेड्यापाड्यामध्यें सुद्धां तुह्मांस एकही घर सांपडावयाचें नाहीं.

हीं सर्व पत्रें फोडून जर तुह्मांस वाचतां आलीं असतीं, तर त्यांपैकीं कित्येकांमध्यें कुशलवृत्त कळविलें आहे, कित्येकांमध्यें कुशलवृत्त जाणून घेण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे, कित्येकांमध्यें नुसता व्यापारधंद्याचा मजकूर लिहिलेला आहे, आणि कित्येकांमध्यें कांहीं माहिती दिलेली आहे, किंवा कांहीं माहिती विचारलेली आहे, असें तुह्मांस कळून येईल.

ह्याप्रमाणें विमानारूढ होऊन उच्च प्रदेशाप्रत गेल्यावर तुह्मांस असें आढळून येईल कीं, आह्मां सर्वांचें सतत भ्रमण चाललें असून आह्मी सर्व प्रीति व अपरिहार्यता ह्या दोन अवश्य पाशांनीं एकत्र बद्ध झालेले आहों.

ज्याप्रमाणें आमच्या देशांतील लोखंडी व साधे रस्ते ह्यांच्या योगानें देशांतल्या देशांत दळणवळण चाललें आहे, त्याप्रमाणें जगाच्या सुधारलेल्या भागांतील लोखंडी व साधे रस्ते आणि जलमार्ग ह्यांच्या योगानें त्या भागांचें परस्परांशीं दळणवळण चाललें आहे, व अशा रीतीनें लोकांचे आचारविचार बदलून संपूर्ण जगाची सुधारणा होत आहे. सारांश, हा सर्व प्रकार आपल्या शरिरांत चाललेल्या रुधिराभिसरणाप्रमाणें आहे.

तर मग एके ठिकाणीं झालेल्या बऱ्या वाईट गोष्टींचा परिणाम दुसऱ्या ठिकाणीं कसा घडून येतो हें समजण्यास तुह्मांस आतां कठिण पडूं नये. एखाद्या ठिकाणीं कांहीं नवीन उपयुक्त कल्पना निघाली, तर तिचा लाभ संपूर्ण जगास मिळतो. एका देशांतील लोक उद्योगी, सरळ आणि शांतिप्रिय असले, तर ते आपल्या ह्या गुणांच्या योगानें इतर देशांतीलही सर्व गोष्टी सुरळीतपणानें चालण्यास साधनीभूत होतात. फार तर काय, एकाही चांगल्या मनुष्याच्या सुस्वभावाचा परिणाम जगाच्या दूरदूरच्या भागांवरही घडून येतो.

ह्यावरून तुमच्या हेंही लक्षांत आलें पाहिजे कीं, जगांतील सर्व दळणवळण सुयंत्र रीतीनें चालण्यास परस्परांस लोकांनीं मनापासून मदत केली पाहिजे; आणि आपलीं सर्व वचनें पाळून सर्व कामें वेळच्यावेळीं केलीं पाहिजेत. पत्रद्वारा पाठविलेल्या प्रीतिसंदेशांस जर प्रीतिपूर्वक उत्तरें येत गेलीं नाहींत, तर पुष्कळांच्या अंतःकरणास दुःख होण्याचा संभव आहे. माझें अमुक काम कर किंवा मला अमुक माहिती कळीव, अशा मजकुराचीं जीं पत्रें पाठविण्यांत येतात, त्यांस जर उत्तरें मिळत गेलीं नाहींत, तर निराशेनें असंख्य लोकांचीं मनें तळमळत रहातील. वेळच्यावेळीं इमानें-इतबारें काम करणारे लोक न मिळाल्यामुळें जर लोखंडी रस्त्यांवरून आगगाड्या चालण्याचें व समुद्रावरून आगबोटी चालण्याचें काम बंद झालें तर सर्व गोंधळ उडून नियमितपणीं चालत असलेला व्यापारधंदा बंद पडेल आणि आपल्या वेळाची आणि सुखाची मोठी हानि होईल. अतिशय पर्जन्य पडला तर आमच्या आगगाड्याच बंद रहातील, किंवा समुद्रावर वादळें उठलीं तर आमच्या आगबोटी व गलबतेंच बुडून जातील; परंतु लोकांना जर परस्परांचा कळवळा नसला, किंवा त्यांचा जर एकमेकांवर भरंवसा नसला, किंवा ते जर वेळच्या वेळीं एकमेकांस मनापासन मदत करण्यास तयार नसले, तर त्याच्या योगानें अतिवृष्टि आणि वादळें ह्यांच्यापेक्षांही जगांतील सर्व व्यवहारांस व लोककल्याणास धक्का पोंचण्याचा जास्त संभव आहे.

ह्यावरून 'आह्मी' ह्या शब्दामध्यें केवळ आह्मी किंवा आमचें कुटुंब किंवा आमचे मित्र इतक्यांचाच समावेश होऊन रहात नाहीं, असें जें ह्मणतात तें अगदीं खरें आहे, हें तुमच्या लक्षांत येईल. आह्मी ज्याप्रमाणें आपल्या घरच्या लहान कुटुंबांतील एक मनुष्य आहों, त्याप्रमाणें मनुष्यजातिरूपी महा कुटुंबांतीलही एक मनुष्य आहों. मनुष्यजातिरूपी कुटुंबांतील प्रत्येकजण ज्या मानानें सदसद्विचारशक्तीच्या आज्ञा किंवा नियम पाळीत असेल त्या मानानें त्या कुटुंबाचें हित होण्याचा संभव आहे.

---

## सामाजिक कर्तव्य.

ज्या घरांतील सर्व मनुष्यें आपलें कर्तव्य करितात आणि परस्परांशीं प्रीतीनें वागतात त घर अत्यंत सुखी होय. जगद्रूपी महा कुटुंबाच्या संबंधानें सुद्धां अशीच गोष्ट आहे.

परंतु आह्मांस सर्व मनुष्यजातीवर प्रीति करितां येईल काय ? नाहीं. जीं मनुष्यें आमच्या नेहमीं जवळ रहातात व ह्मणून आह्मांस जीं प्रियही वाटतात, त्यांच्यावर ज्याप्रमाणें आह्मी प्रीति करतों त्याप्रमाणें आह्मांस सर्व मनुष्यजातीवर प्रीति करितां येणार नाहीं. परंतु सर्व मनुष्यजातीविषयीं आमच्या आगीं सद्बुद्धि आणि कळवळा असूं शकेल. जर एखाद्या दूरच्या प्रदेशामध्यें दुष्काळ पडला, तर

दुष्काळपीडित लोकांच्या विपत्तीच्या निवारणार्थ आपण धान्य पाठविण्याची किंवा द्रव्यद्वारा मदत करण्याची त्वरा करितों. त्याचप्रमाणें एखाद्या लांबच्य देशामध्यें अग्निप्रलय किंवा जलप्रलय झाला, तर त्यामध्यें सांपडलेल्या अनाथ लोकांस आपल्या सामर्थ्यानुरूप मदत करण्यास आह्मीं तयार असतों. तसेंच स्वदेशांतील गरीब आणि अभागी लोकांस निरनिराळ्या तऱ्हेनें मदत करण्यास आपण नेहमीं झटत असतों.

आह्मीं ह्यापेक्षांही महत्वाचीं कामें करितों. संपूर्ण जगतावरील उद्योग, धंदा, व्यापार, विद्या, वगैरे ज्या गोष्टी एकंदर लोकांच्या हितास साधनीभूत होतात त्यांच्या प्रसारार्थ आह्मी सतत उद्योग चालवीत आहों. ह्याप्रमाणें आह्मी आपल्या जातिबांधवांशीं त्यांची ओळख नसतांनाही बंधुत्वाच्या नात्यानें वागून त्यांच्याविषयीं कळवळा प्रदर्शित करीत असतों. ज्या वृत्तींच्या आणि ज्यां कर्तव्यांच्या योगानें आह्मां सर्वांचा एकत्र संबंध जडून समाज बनतो, त्या वृत्तींस आणि त्या कर्तव्यांस सामाजिक वृत्ती आणि सामाजिक कर्तव्यें ह्मणतात. जे लोक सारख्या गरजा आणि सारखे हितसंबंध ह्याच्या योगानें एकत्र जोडले जातात, त्या लोकांच्या समूहास समाज ही संज्ञा आहे. समाज ह्या शब्दाचा अत्यंत व्यापक अर्थ घेतला तर त्यामध्यें सर्व सुशिक्षित मनुष्यजातीचा समावेश होतो. त्यामध्यें आमचा आप्तवर्ग, इष्टमित्र, देशबांधव आणि जगतां-

तील ज्या लोकांच्या मानासिक शक्ती, वृत्ती आणि गरजा आमच्यासारख्या आहेत ते सर्व लोक ह्यांचा अंतर्भाव होतो. सामाजिक होणें ह्मणजे प्रत्येक मनुष्याविषयीं हितबुद्धि धारण करणें. एकटें रहाण्यापेक्षां दुसऱ्याच्या समागमामध्यें रहाणें अधिक आवडणें, आणि दुसऱ्यास मदत करावी, त्यांच्याबरोबर काम करावें आणि त्यांस शक्त्यनुसार सुखी करावें अशी इच्छा मनामध्यें असणें, हें होय.

लहानपणीं ज्या वृत्ती धारण करून किंवा जीं कर्तव्यें करून आपण गृहसुख संपादितों व घरच्या माणसांच्या उपयोगीं पडतों, त्याच वृत्ती धारण करून आणि तींच कर्तव्यें करून आपल्या हातून समाजरूपी संपूर्ण जगाचें सुख कसें साध्य होतें, व आपण सर्व मनुष्यांच्या हितास कसे साधनीभूत होतों, ह्याचा आतां विचार करूं.

कांहीं तरी उद्योग करणें, किंवा एखादी उपयुक्त गोष्ट करण्याचा नाद असणें, ही संवयं चांगली, असें आह्मीं पूर्वीच सांगितलें आहे. ह्या जगामध्यें प्रत्येकास कांहीं तरी काम करावयाचें असतेंच. आणि ह्मणून आह्मांस सर्व आयुष्यभर निरपेक्षबुद्धीनें काम करण्याची संवय असणें, आणि जें काम आपणांस व इतरांस हितकर होईल तें काम करण्याची सदा गोडी असणें अत्यंत इष्ट आहे, हें सांगावयास नकोच.

प्रसिद्ध इंग्लिश ग्रंथकार डा. जानसन असें ह्मणतो कीं, आळस हा एक सर्व सद्गुणांस गिळून टाक-

णारा मृतसमुद्र असून मनुष्यानें आपणाकरितां स्वतां तयार केलेलें थडगें आहे. परंतु ह्या जगांतील प्रत्येक मनुष्यास हा जिवंत मृत्यु टाळून पाहिजे तितकें काम करण्याची सवड मिळण्याचा संभव आहे. कारण, आह्मांस इतक्या निरनिराळ्या वस्तूंची गरज लागते कीं, त्या सर्व वस्तू मिळविण्यास आह्मी सतत श्रम करीत गेलों तरी ते पुरेसे होणार नाहींत.

मनुष्येतर प्राण्यांच्या शक्ती आणि गरजा नियमित असतात. ते एकच प्रकारचें काम पुन्हां पुन्हां करीत असतात; आणि ते आपापलीं कामें सतत उत्तमपणें तडीस नेतात, हें जरी खरें आहे, तरी त्यांनीं कधीं एखादी नवीन कल्पना शोधून काढिली, किंवा त्यांनीं आपल्या कामामध्यें कांहीं फेरफार किंवा सुधारणा केली असें आढळून येत नाहीं. सुतारपक्षी हल्लीं जशीं आपलीं घरटीं बांधतात तशींच हजारों वर्षांच्यापूर्वीं बांधीत असत. इतर पक्षीही आपलीं जशीं हल्लीं घरटीं बांधतात तशींच पूर्वींही बांधीत असत; आणि कोळीही आपलीं विलक्षण जाळीं जशीं हल्लीं बांधतात तशींच पूर्वींही बांधीत असत. त्या सर्वांनीं आपली काम करण्याची पद्धत सुधारली असल्याचें दिसून येत नाहीं. त्यांना स्वतांकरितां आणि आपल्या पिलांकरितां फक्त अन्न आणि रहाण्यास जागा ह्यांची जरूरी असते. ह्या दोन गोष्टी त्यांस प्राप्त झाल्या ह्मणजे त्यांस तिसऱ्या गोष्टीची जरूरी नसते, आणि ह्मणून त्यांना आपली काम

करण्याची ठरीव पद्धति सुधारण्याची जरूरीही नसते.

जंगली स्थितीमध्यें असणाऱ्या अशा कांहीं मनुष्यांच्या जाती आहेत, कीं त्यांच्या आंगीं पशुपक्ष्यांप्रमाणें एखादी नवीन गोष्ट शिकण्याचें किंवा आपली स्थिति सुधारण्याचें सामर्थ्य नसतें. ह्या लोकांस रानटी ह्मणजे रानामध्यें रहाणारे अशी संज्ञा आहे. ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, मलाया द्वीपकल्प, हिंदुस्थानचे कांहीं डोंगराळ प्रदेश, वगैरे ठिकाणीं ह्या रानटी लोकांचे कांहीं विलक्षण मासले आहेत. त्या सर्वांची आयुष्यक्रमणाची रीति बहुतेक एकसारखीच आहे. ते कधीं एके ठिकाणीं घर करून रहात नाहींत; व त्यांना वस्त्रप्रावरणाची कधीं जरूरही लागत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. ते रानफळें, कंदमुळें, व हातीं सांपडेल त्या प्राण्याचें मांस खाऊन आपली उपजीविका करितात. कृमिकीटकसुद्धां त्यांच्या तडाक्यांतून सुटत नाहींत. रानामध्यें पारध करणें आणि आसपासच्या लोकांस लुटून त्रास देणें हें त्यांचें मुख्य कर्तव्य होय.

ह्या रानटी लोकांची आयुष्यक्रमणाची रीति प्राचीन काळीं जशी होती तशीच हल्लींही आहे; तीमध्यें यत्किंचित्‌ही फरक झाला असल्याचें दिसून येत नाहीं. हजारों वर्षांपूर्वी त्यांचे पूर्वज ज्याप्रमाणें कालक्रमण करीत असत त्याचप्रमाणें ते हल्लीं करीत आहेत. ह्याचें एक कारण असें आहे कीं, रानटी

लोक हे जन्मतःच आळशी असतात. जमिनीची लागवड करणें ह्मणजे त्यांना मोठें कठिण काम वाटतें; व ह्मणून त्यांना आपल्यास पुरेसा दाणा स्वतांचीं शेतें असूनही काढतां येत नाहीं. कधीं अन्नाची व त्यांची गांठ पडेल तेव्हां पडेल, अशी त्यांची स्थिति असते; व एकदां गांठ पडली ह्मणजे ओ येई तोंपर्यंत ते खाऊन घेतात.

ह्याप्रमाणें त्यांची नियमित वेळीं खाण्यापिण्याची सोय नसल्यामुळें त्यांच्या आंगीं बहुधां सुशिक्षित लोकांची ताकद रहात नाहीं; व त्यांच्या हातून सुशिक्षित लोकांप्रमाणें उद्योगही होत नाहींत. हे रानटी लोक नेहमीं अर्धपोटी असतात. त्यांपैकीं बहुतेक मोठ्या श्रमाचीं कामें आपल्या बायकांकडून करवितात. त्यांनीं कधीं काम केलें तर तें आपल्या मर्जीप्रमाणें करावयाचें; ते एकच बाण तयार करण्यामध्यें किंवा एखाद्या धोंड्यास भोंक पाडण्यामध्यें वर्षांच्या वर्षें घालवितात.

त्या रानटी लोकांची स्थिति कधीं सुधारत नाहीं ह्यास दुसरें एक कारण आहे. त्यांना समाज ह्मणजे काय ह्याची कल्पनाही नसते. आपलें झालें ह्मणजे झालें अशी त्यांची स्थिति असते. मलायाद्वीपकल्पांतील लोकांची अशी गोष्ट सांगतात कीं, त्यांपैकीं प्रत्येकजण अशा रीतीनें रहातो कीं, त्याला आपल्याशिवाय जगामध्यें दुसरें कोणी आहे ह्याची जणूं काय कल्पनाच नसते. त्याचप्रमाणें बोर्निओ बेटांतील लो-

कांच्या संबंधानें असें सांगतात कीं, ते लोक कधींही एकमेकांच्या सहवासामध्यें रहात नाहींत; आणि त्यांचीं मुलें पशुपक्ष्यांप्रमाणें आपली उपजीविका करण्यास समर्थ झालीं ह्मणजे लागलींच त्यांपासून निराळीं राहूं लागतात; आणि नंतर परस्परांविषयीं बिलकूल काळजी वहात नाहींत. ह्या बेटांतील लोकांस एकत्र मिळून काम करण्याची कधींच संवय नसल्यामुळें प्रत्येक मनुष्यास आपली झोपडी बांधणें, अन्न मिळविणें, वन्य पशूंपासून आपलें संरक्षण करणें, इत्यादि सर्व गोष्टी स्वतां कराव्या लागतात; आणि त्याच्या आंगीं थोडीच ताकद असल्यामुळें त्यानें आपलें प्राणरक्षण केलें ह्मणजे मोठें शतकृत्य केलें असें होऊन जातें. आपली रहाण्याची जंगली जागा, आपली वापरण्याचीं जंगली वस्त्रप्रावरणें, किंवा आपली काम करण्याचीं जंगली हत्यारें सुधारण्याचीं त्याच्याजवळ साधनें नसतात.

"एक ना धड आणि भाराभर चिंध्या" ही ह्मण तुह्मांस माहीत आहेच. आह्मी एखाद्या गोष्टीकडे आपलें पूर्ण लक्ष दिलें नाहीं तर आमच्या हातून ती गोष्ट उत्तम प्रकारें कधींही व्हावयाची नाहीं. प्रत्येकजण जर स्वतांकरितां सुताराचें, शिंप्याचें किंवा रोटीवाल्याचें काम करूं लागला, तर तो ह्या धंद्यांपैकीं कोणत्याही धंद्यांत चांगला प्रवीण व्हावयाचा नाहीं. सुशिक्षित लोकांच्या आयुष्यक्रमणाच्या रीतीमध्यें रानटी लोकांच्या आयुष्यक्रमणाच्या रीतीपेक्षां एक

विशेष गोष्ट आहे ती ही कीं, त्यांचीं सर्व कामें श्रमविभागानें चालतात. श्रमविभाग ह्मणजे मनुष्यजातीनें सुतार, लोहार, कोष्टी वगैरे लोकांचे निरनिराळे धंदे आपसांमध्यें वांटून घेणें.

प्रत्येक मनुष्यानें होईल तितकें करून आपला धंदा उत्तम प्रकारें करण्यास शिकणें हें त्यास हितावह आहे. कारण तो जसजशी आपल्या धंद्यामध्यें जास्त प्रवीणता मिळवीत जाईल, तसतसा त्या धंद्यावर त्याला जास्त पैसा मिळत जाईल. चांगले पदार्थ तयार होऊन ते स्वस्त मिळूं लागले ह्मणजे देशाचाही मोठा फायदा होतो. जगांतील लोकांचें दिवसेंदिवस हरएक गोष्टीमध्यें पुढें पाऊल पडत चाललें असून त्यांची स्थिति सुशिक्षित होत चालली आहे, ह्यास श्रमविभागाशिवाय वित्तसंपादन आणि अदलाबदल ह्या दुसऱ्या दोन गोष्टी कशा साधनीभूत झाल्या आहेत ह्याचा विचार हळू हळू पुढें करूं.

---

## सामाजिक गरजा.

आपले प्राण आणि वित्त हीं सुरक्षित असल्याशिवाय कोणतीही सामाजिक संस्था चालावयाची नाहीं. अगदीं रानटी लोकांमध्यें सुद्धां वित्ताच्या संबंधाचे हक्क असून त्यांच्या रक्षणार्थ कायदे असतात. आस्ट्रिया देशांतील रानटी लोक क्रिमिकीटक, कंदमुळें व झाडांचा चीक हीं जशीं मिळतील तशीं

खाऊन आपली उपजीविका करितात खरी; परंतु त्यांच्यामध्यें सुद्धां प्रत्येकास आपलें अन्न मिळविण्याकरितां जमिनीचा हिस्सा पाडून दिलेला असतो; आणि जर एखाद्या मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याच्या जमिनीवर अतिक्रमण केलें, तर त्याला कडक शिक्षा देण्यांत येते; कारण त्या रानटी लोकांना सुद्धां असें आढळून आलें कीं, जर प्रत्येकास अन्न मिळविण्याकरितां पाहिजे तिकडे जाण्याची परवानगी असली, तर आपल्यामध्यें नेहमीं भांडणें, कज्जे सुरू होतील, आणि कोणालाही सुख व्हावयाचें नाहीं. ह्यास्तव प्रत्येक मनुष्यास त्याच्यापुरता जमिनीचा हिस्सा पाडून दिलेला असणें, हें एकंदर सर्व लोकांस चांगलें असें त्यांस वाटलें.

परंतु अन्न आणि निर्वाहाचे इतर पदार्थ मिळविण्याकरितां पुष्कळ लोकांनीं एकत्र खाण्याची आवश्यकता असली ह्मणजे जमीन समाईक ठेऊन तिचें उत्पन्न वांटून घेतलें पाहिजे. अमेरिका खंडांतील एसकिमो नांवाचे लोक देवमाशासारखे मोठमोठे मासे आणि आस्वलासारखीं मोठमोठीं जनावरें ह्यांजवर आपला निर्वाह चालवितात. परंतु ते मासे किंवा तीं जनावरें कोणाही एकट्या मनुष्यास पकडतां येणार नाहींत. ह्यास्तव हे मासे आणि हीं जनावरें एक समाईक मिळकत आहे, असें ते समजतात. ते देशाचा कांहीं भाग कांहीं लोकांना समाईक असा नेमून देतात, आणि त्या भागाच्या हद्दींत धरलेला प्रत्येक प्राणी आपसांमध्यें वांटून घेतात. उत्तर अमेरिकें-

तील इंडियन लोकांची गोष्टसुद्धां अशीच आहे. ते जंगलें किंवा भयाण अरण्यें ह्यांमध्यें पारध करून आपला चरितार्थ चालवितात. त्यांच्यामध्यें पारधी-ची जमीन समाईक असते; आणि जो पारध मिळेल ती ते आपसांमध्यें वांटून घेतात. आह्मां हिंदु लोकांमध्यें सुद्धां प्राचीन काळीं कांहीं अशाच प्रकारची चाल होती. ह्या देशामध्येंही पूर्वी लोक एकत्र मिळून शेतकी करीत असत, आणि वर्षाच्या अखेरीस उत्पन्न वांटून घेत असत.

समाईक उत्पन्नाचा जर रास्त रीतीनें विभाग होत गेला, आणि एकंदर लोकांच्या केलेल्या काय-द्यांस जर प्रत्येक मनुष्य मान देत गेला, तरच लोकांस शांतता आणि सुख प्राप्त होण्याचा संभव आहे, ही गोष्ट सहजीं प्रत्येकाच्या लक्षांत येण्या-सारखी आहे.

प्राण आणि वित्त हीं सुरक्षित असल्याशिवाय लोकांमध्यें सुशिक्षणाचा प्रसार किंवा कोणत्याही प्रकारची सुधारणा व्हावयाची नाहीं. सुशिक्षित होणें ह्मणजे विद्याभूषित होऊन एकत्र राहणें. पशू किंवा रानटी लोक ह्यांच्याप्रमाणें आहार, निद्रा इत्यादि गोष्टींच्या संबंधाचे सर्व व्यवहार आपणांस यथास्थितपणें चालवितां आले ह्मणजे सर्व झालें असें नाहीं. आमचें आचरण चार लोकांस पसंत पडे अशा प्रकारचें असलें पाहिजे; आमच्या हातून उपयुक्त कामें झालीं पाहिजेत; आह्मी आपल्या

मानसिक शक्ती सुधारीत गेलें पाहिजे; आणि कला, शास्त्रें, व नवीन कल्पना ह्यांचा शोध लावून संपूर्ण जगाची स्थिति उत्तरोत्तर चांगली होत जाऊन लोकांच्या सुखाची अभिवृद्धि होत जाईल अशा प्रकारचें आमचें वर्तन असलें पाहिजे.

परंतु हें सर्व होण्यास समाजाची व्यवस्था सुरळीतपणें चालून कायद्याचा अंमल यथास्थितपणें होत गेला पाहिजे. असें असेल तरच आह्मांस शांततेमध्यें रहावयास मिळून आमच्या श्रमांचें फल आह्मांस प्राप्त होण्याचा, आणि जें वास्तविक रीतीनें आपलें आहे त्याचा इतरांकडून अपहार न होतां सुरक्षित राहण्याचा संभव आहे. आमच्या घरामध्यें कोणीही मनुष्य पाहिजे तेव्हां शिरून पाहिजे ती वस्तु एकदम घेऊन जातो आणि कायद्याकडून किंवा पोलिसांकडून त्याचा बंदोबस्त होत नाहीं, अशी जर स्थिति असेल, तर आह्मीं आपल्या घरामध्यें अन्न, वस्त्र, पैसा आणि इतर वस्तू ह्यांचा सांठा करून ठेवूं काय? आह्मी आपल्या मालमत्तेचें रक्षण करण्यास झटूं; परंतु दांडगे आणि लबाड लोक हे निर्बल आणि साध्या मनुष्यांचें कांहीं चालूं द्यावयाचे नाहींत, व कोणाचीच मालमत्ता सुरक्षित रहावयाची नाहीं. आपण तयार केलेले जिन्नस आपल्या ताब्यांत सुरक्षित राहतील असा जर भरवसा नसेल, तर कोणाचेंही लक्ष कोणतेही पदार्थ उत्पन्न करण्याकडे लागावयाचें नाहीं. परंतु आपलें तेवढें आपल्या ताब्यांत राहतें, ह्मणजे आपल्या मा-

ळमत्तेस इतरांकडून धोका पोहोंचण्याचा संभव नाहीं, अशी लोकांची खात्री झाल्याबरोबर देशामध्यें सर्व प्रकारचे पदार्थ उत्पन्न होऊं लागतात, आणि व्यापार-धंदा वाढून कलाकौशल्याचा उत्कर्ष होऊं लागतो.

वित्तसंपादन आणि श्रमविभाग ह्यांच्या योगानें समाजामध्यें आणखी एका व्यवहाराची आवश्यकता उत्पन्न होत असते. तो व्यवहार कोणता ह्मणाल तर अदलाबदल. हा व्यवहार समाजाच्या सुशिक्षित स्थितीमध्यें चालू असलाच पाहिजे. जर एखाद्या मनुष्यास तयार केलेल्या वस्तूंच्या मोबदल्यानें आणखी ज्या वस्तूंची जरूर आहे त्या मिळवितां येत नसतील, तर तो त्या वस्तू आपल्या जरूरीपेक्षां कधीं जास्त तयार करावयाचा नाहीं. तांबटास आपण तयार केलेलीं भांडीं देऊन धान्य, वस्त्रप्रावरण, किंवा किराणे जिन्नस मिळविण्याची सोय नसेल तर तो आपल्या दुकानाच्या फळ्या भांड्यांनीं कधीं भरून काढावयाचा नाहीं. तांबटानें तयार केलेल्या भांड्यांची इतर लोकांस जरूरी असते, आणि ते आपण तयार केलेल्या पदार्थांची अदलाबदल करून त्याचीं भांडीं घेण्यास तयार असतात. सुधारलेल्या देशामध्यें ही अदलाबदल पैशाच्या द्वारा चालते; परंतु ज्या देशामध्यें पैसा नाहीं अशा देशामध्यें पदार्थांचीच अदलाबदल चालते. आफ्रिकेंतील नीग्रो लोकांबरोबर युरोपियन लोकांचा व्यापार चालतो तो अशाच प्रकारें चालतो. युरोपियन लोक त्यांस कांचेचे मणी, हातरुमाल किंवा

ज्या वस्तू त्यांस विशेष आवडतात त्या देऊन त्यांच्यापासून हस्तिदंत, सुवर्णमिश्रित माती किंवा असेच कांहीं मौल्यवान् पदार्थ घेत असतात.

जे लोक बुद्धिवान आणि उद्योगी असतात त्यांच्यामध्यें हरएक गोष्टींची सुधारणा भराभर होत जाते. ते जगांतील आपली स्थिति शेंकडों नवीन नवीन कल्पना काढून सुधारीत असतात. ते सृष्टींतील सर्व पदार्थांचीं गूढें जाणून घेतात, आणि त्यांच्या योगानें आपला अनेक प्रकारें फायदा करून घेतात. ते पृथ्वीच्या पोटांतील खाणींतून कोळसे व धातू काढितात; माती, दगड ह्यांच्या योगानें घरें बनवितात; जंगलांतील वृक्षांचीं गलबतें करतात; पशूंस पाळून व शिकवून त्यांच्यापासून शक्तीचीं कामें करून घेतात; व आप्, तेज, वायु इत्यादि पंचमहाभूतांस आपल्या अगदीं ताब्यांत आणून त्यांपासून पाहिजे ती सेवा करून घेतात. ह्याप्रमाणें मनुष्यें आपल्या सृष्टिरूपी आदिमातेपासून आपणांस पाहिजे त्या सर्व वस्तू पैदा करून घेत असतात.

ह्या आपल्या विस्तीर्ण हिंदुस्थान देशाची लोकसंख्या गेल्या खानेसुमारीच्या वेळीं सुमारें अठ्ठावीस साडेअठ्ठावीस कोटी भरली. इतक्या लोकांपैकीं प्रत्येकास कांहीं तरी धंदा शिकावयाचा आहे. प्रतिष्ठित धंदे चालविणारांस शाळेमध्यें किंवा घरीं लेखनवाचन अंकगणित, शास्त्र, भूगोल, इतिहास वगैरे आपल्या धंद्यांचें ज्ञान संपादन करण्याचीं साधनें शिकून झाल्यानंतर

आपापल्या धंद्याच्या संबंधानें जरूर तें ज्ञान संपादन करण्यास बराच काळ खर्च करावा लागतो. व्यापारी, कारागीर, शेतकरी, व मजूर ह्या सर्वांस आपापल्या धंद्यांच्या संबंधानें कांहीं दिवस शिक्षण घ्यावें लागतें, किंवा उमेदवारी करावी लागते. ज्याला आपल्या आवडीप्रमाणें व शक्तीप्रमाणें धंदा मिळतो, व ज्याला आपल्या धंद्याचें काम आटपून ज्या इतर गोष्टींमध्यें त्याचा भर आहे अशा गोष्टी करण्यास फुरसत सांपडते, तो मनुष्य खरोखर सुखी समजला पाहिजे.

ह्यास्तव मुलांचा ज्या कामाकडे स्वाभाविक कल असेल तींच कामें करण्यास त्यांस शिकविणें हें उत्तम होय. ज्याला तालसुराची गोडी नाहीं अशा मनुष्यास गाणें शिकविणें, ज्याला बांधकामाचें कांहीं धोरण नाहीं अशाला सुतार करणें, ज्याला आकार व रंग ह्यांची ओळख राहत नाहीं अशास चितारी बनविणें, ज्याला विद्येची अभिरुचि नाहीं व ज्याची बुद्धि जड आहे अशास शिक्षकाचा धंदा करण्यास लावणें, किंवा जो शरिरानें अशक्त आहे त्यानें हमाली चालविण्याचें मनांत आणणें ह्मणजे मोठी चूक होणार आहे. परंतु आपणांस जें काम आवडतें तेंच काम करण्याचें नेहमींच साधेल असा नेम नाहीं, आणि ह्मणून मुळींच काम न करण्यापेक्षां जें काम आपणांस आवडत नाहीं तेंही करणें बरें, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये.

मराठी ग्रंथ संग्रहालय



## इमानेइतबारें काम करण्याची संवय.

देशामध्यें जे असंख्य लोक काम करण्यामध्यें गुंतलेले असतात, त्यांपैकीं कांहीं धनी असतात, ह्मणजे त्यांना स्वतां काम करून दुसऱ्यापासून काम घ्यावयाचें असतें आणि काम करण्यास लागणारीं सर्व साधनें आणि पैसा ह्यांचा पुरवठा करावयाचा असतो. ह्या धन्यांपेक्षां त्यांच्या हाताखालीं काम करणाऱ्या लोकांची संख्या फारच मोठी असते. हे लोक धन्यांकरितां श्रम करून आपल्या श्रमांबद्दल रोजमुरा मिळवितात. शिवाय कांहीं स्वतंत्र धंदेवाले लोक आहेत; ते स्वतांच्या जबाबदारीवरच काम करीत असतात. हे धनी, त्यांच्या हाताखालचे कामगार किंवा हे स्वतंत्र धंदेवाले लोक, ह्यांना आपापलें काम करण्याचें कितीही चांगलें साधलेलें असो, किंवा त्यांना आपापलें काम कितीही चांगलें समजो, तरी ते एकत्र खपून त्यांचा आह्मांस व्हावा तसा उपयोग होण्यास त्यांपैकीं प्रत्येकाच्या आंगीं एक गुण असणें अगदीं अवश्य आहे: हा गुण कोणता ह्मणाल तर प्रामाणिकपणा.

धनी एखादा मजूर किंवा चाकर कामावर ठेवतांना त्याच्या संबंधानें पहिल्यानें प्रश्न विचारतो ते हे: तो प्रामाणिक आहे काय? त्याच्या हातीं मालमिळकत किंवा पैसा अडका देण्यास हरकत नाहींना? ज्यास त्रास देऊन आणि पुष्कळ पैसा खर्च करून ज्या वस्तू मी मिळविल्या आहेत त्यांचा तो अपहार करणार नाहींना? जो मनुष्य कामावर रहातो तो

आपल्या मनाला पुढील प्रश्न करीत असतो: हा धनी प्रामाणिक आहेना? तो माझ्या कामाबद्दल मला योग्य रोजमुरा देईलना? तो माझे श्रम आणि वेळ फुकट घेणार नाहींना?

ज्या मनुष्यास एखाद्या व्यापाऱ्यापासून कांहीं जिन्नस विकत घ्यावयाचा असतो, तो मनुष्य आपल्या मनाला असे प्रश्न करीत असतो कीं, हा व्यापारी प्रामाणिक आहेना? तो मला जो जिन्नस देईल तो खऱ्या मापानें आणि वजनानें देईलना? आणि तो जसा मासला दाखवितो, तसाच त्याचा माल असेलना? इकडे व्यापारी आपल्या मनामध्यें असें ह्मणत असतो कीं, हें गिऱ्हाईक प्रामाणिक आहेना? तें माझ्या मालाचे पैसे तावडतोब जेव्हांचे तेव्हां देईलना?

आजारी किंवा ज्याला कांहीं जखम झाली आहे, असा मनुष्य नेहमीं असें विचारतो कीं, माझा वैद्य माझ्याबरोबर प्रामाणिकपणानें वागेलना? तो माझी काय ती योग्य परीक्षा करून व रोगाविषयीं आपली खात्री करून घेऊन, मला योग्य औषध द्यावयाचें तें देईलना? इकडे वैद्य अशा संशयांत असतो कीं, जर मी ह्याच्या दुखण्यांत चांगलें मन घालून ह्याला योग्य औषध देऊन बरें केलें, तर तो मला माझ्या कसबाबद्दल, श्रमाबद्दल आणि औषधाबद्दल योग्य पैसा देईलना?

ज्या लोकांना एखाद्या कामामध्यें वकील करावयाचा असतो ते लोक प्रथमतः त्याच्यासंबंधानें असें

विचारितात कीं, स्वतांच्या फायद्याकरितां विनाकारण कज्जा लांबवून तो माझे पैसे खराब करणार नाहींना? वकील कुळाचें वकीलपत्र घेण्यापूर्वीं असें पहात असतो कीं, मी जर ह्याचा कज्जा चालविला, तर माझी मेहनत फुकट जाणार नाहींना?

ह्याप्रमाणें ज्या कामांमध्यें लोक परस्परांकरितां एकत्र खपत असतात, त्या सर्व कामांमध्यें ते ज्या मानानें प्रामाणिकपणानें वागतील किंवा आपलीं वचनें पाळतील, त्या मानानें तीं कामें नीटपणें तडीस जाण्याचा संभव आहे.

सर सॅम्युएल बेकर नांवाचा एक इंग्लिश गृहस्थ आफ्रिका खंडांतील गुलामांचा व्यापार बंद करण्याकरितां आणि तेथील नीग्रो लोकांची स्थिति सुधारण्याकरितां तिकडे गेला होता. त्यानें प्रथमतः त्यांच्यापासून हस्तिदंत घेऊन त्यांस इंग्लंडांत उत्पन्न झालेले पदार्थ देण्याचा क्रम सुरू केला, व अशा रीतीनें त्यांस व्यापार कसा करावा हें थोडथोडें शिकविलें. तो तेथें रहात असतां त्याच्या असें अनुभवास आलें कीं, त्या लोकांस खोटें बोलण्याची व लबाडी करण्याची संवय असल्यामुळें त्यांच्याबरोबर व्यापार करण्याची बिलकूल सोय नाहीं. त्यांना आपला शब्द पाळणें ह्मणजे काय हें मुळींच माहीत नव्हतें. त्यांना एखाद्या वस्तूची जरूर लागली तर ते ती बेधडक चोरून मिळवीत असत. तिची किंमत देऊन ती विकत घेणें हें त्यांस मुळीं माहीतच नव्हतें. जे

परकी लोक त्यांच्या देशामध्यें येत असत, त्यांच्याबरोबर ते कधीं स्नेहभावानें वागत नसत. त्यांना लुटणें, व त्यांचा खून करणें ह्यांतच त्यास मोठी मौज वाटत असे.

अशा लोकांस त्यांच्या त्या निकृष्ट स्थितींतून बाहेर काढणें अगदींच अशक्य होतें. ते लोक अगदीं रानटी स्थितीमध्यें होते, व त्या स्थितींत राहणें त्यांना आवडत असे. तथापि त्यांपैकीं कांहीं लोक प्रामाणिक आणि ममताळू असत. ते आपल्या देशांत उत्पन्न होणारीं फळें, जनावरांचीं कातडीं आणि हस्तिदंत वगैरे पदार्थ इंग्लिश लोकांस देऊन त्यांच्याऐवजीं त्यांपासून त्यांच्या देशांत उत्पन्न होणारे चैनीचे व सुखाचे पदार्थ घेत असत; व अशा रीतीनें त्यांच्यावरोबर थोडाबहुत व्यापार चालवितां येणें शक्य झालें होतें. अलीकडे इंग्लिश लोकांच्या सहवासानें व्यापारादि गोष्टींमध्यें त्यांची स्थिति सुधारत चालली आहे.

आत्मसुखेच्छा आणि समाजसुखेच्छा यांच्यामध्यें वस्तुतः भेद किंवा विरोध नाहीं. जो मनुष्य एखादा योग्य धंदा किंवा व्यापार पत्करून आपलें काम मेहनतीनें व इमानेइतबारें करितो, तो मनुष्य दोन मोठीं सामाजिक कर्तव्यें करितो. तो आपलें व आपल्या कुटुंबाचें पोट भरतो, आणि समाजाच्या सुखास व कल्याणास साधनभूत होतो. ज्या सृष्टिक्रमास अनुसरून आह्मी वागतों, त्यामध्यें जो मनुष्य आपलें भूयिष्ठ हित साधतो, तो आपल्या

त्याच कृत्यानें सर्व समाजाचेंही भूयिष्ठ हित साधतो, अशी व्यवस्था आहे, ही गोष्ट अति उत्तम नव्हे काय ? मिताहार, स्वच्छता इत्यादि गोष्टींच्या नियमांस अनुसरून आणि आपले शक्तींचा सतत योग्य उपयोग करून आपलें शरीर आणि मन सुस्थितीमध्यें ठेवणें, आपल्या सभोंवतालच्या लोकांबरोबर स्नेहानें वागणें, आणि आपलें नेहमींचें काम लक्षपूर्वक आणि प्रामाणिकपणानें करणें, यांतच प्रत्येक मनुष्याचें भूयिष्ठ हित आहे.

देशांतील सर्व लोकांनीं अशा रीतीनें वागणें ही गोष्ट अत्यंत इष्ट आहे. शेतें, गिरण्या, खाणी, दुकानें, कचेऱ्या, आणि शाळा यांमध्यें आज हजारों लोक काम करीत आहेत; परंतु त्यांपैकीं एकाच्याही मनांत तो जेव्हां वेळच्या वेळीं आपले कामावर जात असतो, तेव्हां आपल्या समाजाचें किंवा देशाचें हित साधावें असें नसतें; तथापि तो त्या रीतीनें वागून आपले देशाचेंच काय, पण इतर सर्व देशांचेंही हित साधीत असतो, याविषयीं कांहीं शंका नाहीं. यावरून आपलें स्वतःच्या संबंधाचें कर्तव्य करूनच आपण मनुष्यजातिरूपी महाकुटुंबाच्या संबंधाचेंही कर्तव्य कसें साधीत असतों, ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत आली पाहिजे.

जगामध्यें असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांना विशेष श्रमाचें काम करावयाचें नसतें. त्यांचें काम ह्मटलें ह्मणजे स्वतःच्या कुटुंबापुरतेंच असतें. परंतु

जें जें आपणांस करावयाचें तें तें आपण करीत गेलों ह्मणजे आपल्या प्रत्येक कृतीचा समाजास कांहीं तरी उपयोग झाल्याशिवाय रहावयाचा नाहीं. आई मुलांचें संगोपन करून त्यांस नेहमीं सुखांत व आनंदांत ठेवीत असते. परंतु ती आपल्या ह्या कृतीनें समाजाचें मोठें हित साधीत असते. कारण, देशामध्यें सुखी कुटुंबें असणें आणि त्यांतील मुलांचा उत्तम प्रकारें सांभाळ होऊन तीं चांगल्या मार्गांत असणें यासारखें समाजास हितावह असें दुसरें कांहीं नाहीं. चांगल्या रीतीनें वागून लोकांच्या उपयोगीं पडणारें, किंवा सभोंवतालच्या कुऱ्यामांजरावर, पशुपक्ष्यांवर, किंवा कृमिकीटकांवर प्रीति करणारें प्रत्येक मूल हें जग अधिक आनंदी आणि सुखी करण्याच्या कामीं मदत करीत असतें असें समजावें.

---

## आह्मीं समाजासाठीं काय केलें पाहिजे.

ज्या लोकांना काम करण्याची बिलकूल जरूरी नाहीं, त्यांच्या संबंधानें तुह्मी कदाचित् असें विचाराल कीं, अशा लोकांना आह्मी मोठे लोक ह्मणत नाहीं काय? व ज्या लोकांना सारा दिवस खपावें लागतें त्यांपेक्षां त्यांची स्थिति अधिक चांगली व ते अधिक दैववान् होत, असें आह्मी समजत नाहीं काय?

ह्याला उत्तर एवढेंच कीं, खऱ्या मोठ्या मनुष्याला

जें काम केलेंच पाहिजे तें काम करण्याची कधीं लज्जा वाटत नाहीं. जे मनुष्य फक्त नांवानें मोठे असतात ते मात्र कधीं काम करीत नाहींत. मनुष्यानें आपला स्वयंपाक स्वतः केला, आपलीं भांडीं स्वतां घासलीं, किंवा आपलें अंथरूण स्वतां घातलें, म्हणजे त्याच्या मोठेपणास बट्टा येतो असें नाहीं. जो मनुष्य दुसऱ्यांस काम करण्यास लावतो, व त्यांच्या यत्किंचितही उपयोगी न पडतां केवळ स्वतां खाऊन पिऊन चैन करितो, तो मनुष्य केवढाही श्रीमंत असला किंवा त्याचें वैभव केवढेंही मोठें असलें, तरी तो फक्त नांवाचा मोठा मनुष्य होय.

सुधारलेल्या देशांमध्यें सर्व धंदे श्रमविभागाच्या तत्त्वावर चालत असल्यामुळें प्रत्येक मनुष्यास आपलें अन्न स्वतां शिजविण्याचें किंवा आपलीं भांडीं स्वतां घासण्याचें भाग पडत नाहीं. ज्या मनुष्याजवळ पैसा आहे, त्यानें हीं कामें स्वतां न करितां तीं करण्याचा ज्याचा धंदा आहे त्याच्याकडून तीं करविलीं व त्याबद्दल त्यास पैसा दिला, तर त्याचा त्याला व एकंदर समाजाला जास्त उपयोग होतो. परंतु आह्मीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, आपणांस यथास्थित अन्नवस्त्र मिळून आनंदामध्यें व ऐषआरामामध्यें राहण्यासारखी आपली स्थिति असली, तरी समाजांतील सुखें आपण जास्त प्रमाणानें उपभोगीत असल्यामुळें आपणांस त्याबद्दल त्या समाजास योग्य मोबदला दिला पाहिजे.

एखादा गृहस्थ घरचा मोठा श्रीमंत असेल, परंतु त्याच्या घरचें किंवा बाहेरच्या जमीनजुमल्याचें काम पाहण्यास कोणी नसेल, तर त्याला निव्वळ उदरनिर्वाहाचे पदार्थही मिळावयाचे नाहींत. त्याच्या नोकरांना आणि मजुरांना हें काम मिळतें हा त्यांचा मोठा फायदा आहे. कारण त्याच्या योगानें त्यांचा उदरनिर्वाह चालतो. जें काम श्रीमंत मनुष्याच्या हातून होत नाहीं, किंवा जें काम करण्याची त्याची इच्छा नाहीं, तें काम करण्याचें ज्यांना भाग आहे किंवा जे तें काम खुषीनें करितात असे गरीब लोक ह्या जगामध्यें आहेत ही गोष्ट तरी श्रीमंत लोकांच्या फायद्याचीच आहे. हे श्रीमंत लोक, गरीब लोक जें काम करितात त्याबद्दल त्यांस मजुरी देतात आणि अशा रीतीनें त्यांस मजुरी देऊन किंवा त्यांनीं केलेले पदार्थ विकत घेऊन, त्यांस ते आपला व आपले कुटुंबाचा निर्वाह करण्यास समर्थ करितात.

ह्या जगामध्यें श्रम केल्याखेरीज श्रीमंत लोकांस चैन मारण्यास सांपडते त्याबद्दल त्यांनीं काम करणाऱ्या लोकांकरितां वरील गोष्टी केल्या ह्मणजे ते आपल्या कर्जांतून मुक्त झाले असें नाहीं. गरीब लोक काबाडकष्ट करितात, ह्मणूनच श्रीमंत लोकांना फुरसत मिळते; आणि त्या फुरसतीमध्यें ते विद्या संपादन करून आपलीं मनें ज्ञानानें प्रगल्भ करितात, आणि कला व शास्त्रीय विषयांची आपणांस गोडी लावून घेतात. गरीब लोकांनासुद्धां जरूर तीं साधनें आणि

पैसा मिळाला, तर तेही ह्या सर्व गोष्टी मोठ्या आनंदानें करतील.

ह्याप्रमाणें श्रीमंत लोकांजवळ पैसा आणि विद्या संपादन करण्याचीं साधनें असल्यामुळें गरीब लोकांपेक्षां त्यांचें समाजामध्यें सहजीं जास्त वजन असतें. ह्यास्तव ज्या लोकांच्या मदतीनें त्यांस हें वजन प्राप्त होतें त्या लोकांच्या हिताकरितां आपलें वजन खर्च करणें हें श्रीमंत लोकांचें कर्तव्य आहे.

खरा मोठा मनुष्य आपल्या चाकर लोकांबरोबरही बरोबरीच्या लोकांप्रमाणें प्रीतीनें, सभ्यतेनें आणि आदरबुद्धीनें वागेल. तो त्यांचें शरीर आणि मन ह्यांची सुस्थिति बिघडे इतकें काम करण्यास त्यांस कधींही लावावयाचा नाहीं, तो त्यांना विश्रांति घेण्याकरितां आणि करमणूक करण्याकरितां मधून मधून सुटी देत जाईल, आणि आपण सदाचारानें व नेमस्तपणानें वागून त्यांस आपल्या वर्तनाच्या योगानें सुशिक्षणाचें प्रत्यक्ष उदाहरण घालून देईल.

त्याचे जे लोक घराबाहेर खपत असतात, व ज्यांच्या श्रमांपासून तो आपला फायदा करून घेतो, अशा सर्वांस होतां होईल तितकें सुख देण्यास तो चुकावयाचा नाहीं. त्यांपैकीं जे अतिशय गरीब आणि खालच्या प्रतीचें काम करणारे लोक असतील, त्यांच्यावर मुकादम लोकांकडून कधींही जुलूम होत नाहीं, अशी तो तजवीज ठेवील; जे लोक स्वभावानें चांगले आणि उद्योगी असतील, त्यांस तो आळशी,

व्यसनी, अविचारी आणि आपल्या कृतींनीं आपणांवर संकटें आणि दुखणीं आणून घेणाऱ्या लोकांपेक्षां संकटाच्या व दुखण्याबाण्याच्या प्रसंगीं अधिक ममतेनें वागवून उत्तेजन देत जाईल; आणि सर्वांच्या मुलांस विद्या प्राप्त करून देण्याच्या कामीं तो आपल्याकडून कधींही कसर करणार नाहीं.

श्रीमंत मनुष्यास गरीब मनुष्यापेक्षां समाजाचा उपयोग जास्त होतो. त्याची संपत्ति जितकी अधिक असेल, तितका त्याला ती त्याच्या ताब्यामध्यें सुरक्षित राहण्यास कायद्याचा अधिक उपयोग होतो; आणि या गोष्टीचा मोबदला ह्मणून त्यानें सर्व लोकांस हितावह आणि न्याय्य असे कायदे प्राप्त करून देण्याविषयीं सतत उद्योग चालविला पाहिजे.

श्रीमंत मनुष्याला पाहिजे तिकडे चैनीनें प्रवास करितां येतो आणि पाहिजे तितका वेळ व पाहिजे तितका पैसा आपल्या मनोरंजनाकरितां खर्च करितां येतो. याप्रमाणें समाजापासून प्राप्त होणारीं सर्व सुखें भोगण्याचीं साधनें त्याच्याजवळ इतरांपेक्षां जास्त असतात, आणि ह्मणून इतरांपेक्षां त्याला समाजाचा जास्त उपयोग होतो, हें उघड आहे. यास्तव श्रीमंत मनुष्यानें व्याख्यानें देऊन किंवा गायनसमाज, पदार्थसंग्रहालयें, पुस्तकालयें आणि खेळखानें यांची स्थापना करून गरीब लोकांस आपली करमणूक आणि सुधारणा करून घेण्याचीं साधनें सुलभ करून ठेविलीं पाहिजेत, हें उघड आहे. देशामध्यें जे उद्योग-

धंदे किंवा कारखाने चालतात त्यांचाही श्रीमंत मनुष्यासच जास्त उपयोग होतो. कारण, त्यांमध्यें उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचा पुष्कळ खप त्याच्याकडे होत असतो. यास्तव त्यानें आपल्या शास्त्रीय ज्ञानाच्या योगानें देशांतील उद्योग व कारखानें यांत सुधारणा करून उत्पन्न होणारा माल सर्व लोकांस अधिक चांगला आणि अधिक स्वस्त मिळे अशी तजवीज करणें हें त्याचें कर्तव्य आहे, हें उघड आहे.

परंतु जर श्रीमंत मनुष्य आपल्या फुरसतीचा आणि साधनांचा आपलें मन सुधारण्याच्या आणि लोकांचें बरें करण्याच्या कामीं उपयोग करणार नाहीं, आणि आपलें सर्व आयुष्य चैनबाजीमध्यें आणि विषयसुखामध्यें घालवील, तर तो आपलें कर्तव्य करण्यास विसरतो, इतकेंच नव्हे, तर आपल्या सर्व जन्माचें मातेरें करून घेतो. अशा मनुष्याच्या हातून समाजाचें जें हित झालें पाहिजे, तें होत नाहीं. तो आपल्या दुर्वर्तनाचा लोकांस कित्ता देऊन आपलें व त्यांचें सर्वस्वी नुकसान करितो. मनुष्य जितका अधिक श्रीमंत आणि अधिक वजनदार असेल, तितका त्याच्या दुर्वर्तनाचा समाजावर जास्त वाईट परिणाम होण्याचा संभव आहे. यावरून इतकें उघड होतें कीं, मनुष्य जितका अधिक श्रीमंत असेल, तितकें त्याचें या जगांतील काम अधिक जबाबदारीचें असतें.

# आह्मीं समाजाकरितां काय केलें पाहिजे.

प्रत्येक मनुष्याचें पहिलें कर्तव्य ह्मटलें ह्मणजे खुद्द स्वतांला व स्वतांच्या कुटुंबाला लागणाऱ्या पदार्थांचा पुरवठा करणें हें होय. परंतु एखादा मनुष्य जन्मतांच श्रीमंत असला ह्मणजे त्याला आपलें स्वतांचें किंवा कुटुंबाचें कसें चालेल ही काळजी नसते; व ह्मणून त्यानें मनुष्यजातिरूपी महाकुटुंबाकरितां अलबत इतरांपेक्षां विशेष परिश्रम केले पाहिजेत; आणि ज्याप्रमाणें एखाद्या नेहमीं पोटाकरितां खपणाऱ्या मनुष्यास आपलें काम प्रामाणिकपणानें आणि खरेपणानें करावें लागतें, त्याप्रमाणें त्यानेंही आपलें काम प्रामाणिकपणानें आणि खरेपणानें केलें पाहिजे.

मनुष्य राजा असो किंवा पार्लमेन्ट सभेसारख्या सभेचा सभासद असो; सेनापति असो किंवा एखाद्या प्रांताचा सुभेदार असो; न्यायाधीश असो किंवा वकील असो; एखादा महामहोपाध्याय असो, ग्रंथकर्ता असो, किंवा वक्ता असो; तो आपलें काम नेकीनें आणि सचोटीनें करतो अशी त्याच्याविषयीं जर खात्री देतां येत नाहीं, तर त्याचा कांहीं एक उपयोग नाहीं.

इंग्लंडामध्यें राजास राज्याभिषेक करितांना त्याच्या डोक्यावर मुकुट ठेवण्यापूर्वीं मुख्य धर्माधिकारी त्याच्या-

कडून अशी शपथ घेववीत असतो कीं, मी आपल्या प्रजेशीं खरेपणानें आणि प्रामाणिकपणानें वागेन. तो धर्माधिकारी राजास असा प्रश्न करतो कीं, तूं कायदा, न्याय आणि दया ह्या तिन्ही गोष्टींस अनुसरून यथाबुद्धि सर्व न्याय करीत जाशील? त्यावर राजा असें उत्तर देतो कीं, होय. ज्या मानानें राजा आपलें हें वचन पाळीत असेल, त्या मानानें प्रजेनेंही त्याजबरोबर आपलें वर्तन स्वामिभक्तीनें ठेविलें पाहिजे. प्रजेला राजाबरोबर स्वामीभक्तीनें वागण्याविषयीं इंग्लंडामध्यें जी शपथ घ्यावी लागते ती अशी असते:—मी खऱ्या अंतःकरणापासून शपथ घेऊन असें सांगतों कीं, मी आपल्या राजाबरोबर नेहमीं प्रामाणिकपणानें आणि निष्कपट स्वामिभक्तीनें वागेन. जेव्हां एखाद्याकडे एखाद्या मुलास धंदा शिकविण्याकारितां ठेवितात, तेव्हां त्या मुलाला असा लेख लिहून द्यावा लागता कीं, मी आपला धंदा शिकेन; धन्याची प्रामाणिकपणानें नोकरी बजावीन; त्याच्या गुप्त गोष्टी फोडणार नाहीं; त्याच्या योग्य आज्ञा सदैव पाळीन; आणि माझी शिकण्याची मुदत संपेपर्यंत प्रत्येक गोष्टीच्या संबंधानें खऱ्या शिकाऊ मनुष्याप्रमाणें आपल्या धन्याबरोबर प्रामाणिकपणाचें वर्तन ठेवीन. त्याचप्रमाणें तो धनी आपल्याकडून लेखी असें वचन देत असतो कीं, मी ह्या शिकाऊ मनुष्यास त्याची शिकण्याची मुदत भरेपर्यंत स्वतां किंवा दुसऱ्याकडून उत्तम प्रकारचें शिक्षण देण्याची तजवीज करीन. ह्याप्रमाणें

राजापासून तों शिकाऊ मुलापर्यंत प्रत्येक मनुष्य जें काम करतो किंवा जो धंदा चालवितो, त्या प्रत्येक कामाच्या किंवा धंद्याच्या संबंधानें चाललें आहे. कामाच्या संबंधानें पहिली गोष्ट ह्मटली ह्मणजे तें काम करण्याचें आपल्या आंगीं सामर्थ्य असलें पाहिजे, आणि दुसरें तें काम प्रामाणिकपणें करण्याची आपल्या आंगीं निष्ठा असली पाहिजे.

मनुष्य गरीब असो, किंवा श्रीमंत असो, त्यानें समाजाविषयीं नेहमीं सद्बुद्धि धारण करून सर्व लोकांस उपयोगीं पडण्यासारखीं कृत्यें करीत गेलें पाहिजे. उदाहरणार्थ, असें पहा कीं, आमच्या शेजारीं जे लोक रहातात, ते प्रामाणिक, ममताळू, स्वच्छ आणि व्यवस्थित असले ह्मणजे आपणांस बरें वाटतें; आणि ह्मणून आपण स्वतांही प्रामाणिक, ममताळू, स्वच्छ आणि व्यवस्थित असें आपलें वर्तन ठेवून आपल्या सभोंवतालच्या लोकांसही बरें वाटेसें केलें पाहिजे.

देशामध्यें जे कायदे सुरू असतात, त्यांच्या योगानें अगदीं गरीब मनुष्यालाही झालेलें नुकसान भरून मिळतें, आणि लोक त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला मदत करण्यास आणि त्याच्याविषयीं कळवळा बाळगण्यास तयार असतात. जो दारूबाज मनुष्य रस्त्यामध्यें झोंके खात जात असतो, आणि आपल्या कुटुंबांतील माणसांवर विपत्ति आणितो, तो मनुष्य, ज्या समाजाच्या योगानें त्याजला सुरक्षित, प्रशस्त, आणि

ऐसपैस असे रस्ते मिळतात, व प्रत्येक मनुष्याला आपल्या घरीं सर्व सुखांचा यथेच्छ उपयोग घेतां येतो, त्या समाजास योग्य मोबदला देतो असें ह्मणतां येईल काय? जो मनुष्य आपल्या मुलांना चोरी करावयाला किंवा भिक्षा मागावयाला शिकवितो, तो मनुष्य. जो समाज त्याचें आणि त्याच्या मुलांचें चोरीपासून रक्षण करतो, त्या समाजाच्या उपयोगीं पडतो असें ह्मणतां येईल काय? समाजामध्यें आपणांस असेच पुष्कळ लोक आढळून येतात कीं, जे गरीबही नाहींत व श्रीमंतही नाहींत, परंतु ज्यांना ह्या जगांतील सुखाचीं किंवा चैनीचीं साधनें विशेष श्रम पडल्याशिवाय किंवा अगदीं थोड्या श्रमानें प्राप्त होतात. हे लोक, ज्या वर्गाला मध्यम प्रतीचा वर्ग असें नांव आहे त्या वर्गांतले होत. कारखान्यांचे मालक, व्यापारी, उदमी, व ज्यांची घरची थोडीबहुत जमीन आहे, असे सर्व लोक ह्या वर्गामध्यें येतात; आणि ते बहुतकरून बुद्धिवान, सुशिक्षित आणि शांततेच्छु असे असतात.

इंग्लंडामध्यें इतर देशांपेक्षां ह्या मध्यम प्रतीच्या लोकांचा भरणा विशेष आहे. त्याचें कारण असें आहे कीं, इंग्लंडांतील लोक एकंदरीनें शांततेच्छु असल्यामुळें तेथें व्यापार, धंदा, विद्या, कला, इत्यादि गोष्टींचें एकसारखें पुढें पाऊल पडत चाललें आहे. ज्या देशांतील लोकांना नेहमीं शेजारच्या लोकांबरोबर लढाई करावी व आपल्या देशांतील लोकांस सुखी आणि

मद्गुणी करण्यापेक्षां आपलें राज्य आणि सत्ता वाढवावी असें वाटत असतें, त्या देशामध्यें हा प्रकार अगदीं निराळा असतो. देशामध्यें मध्यम प्रतीच्या लोकांची संख्या विशेष असणें हें त्या देशाच्या सुशिक्षिततेचें उत्तम ज्ञापक होय. कारण ज्या देशामध्यें कायदे न्यायाचे आहेत, मालमत्तेला सुरक्षितता आहे, आणि लोकांना आपले धंदे सुरळीतपणें चालवितां येतात, त्या देशामध्येंच हा मध्यम प्रतीच्या लोकांचा वर्ग असण्याचा संभव आहे.

कांहीं देशांमध्यें लष्करी लोकांचा एक वर्ग असतो. ह्या वर्गांतील लोकांचा खाण्यापिण्याचा आणि कपड्यांचा खर्च कांहीं विशेष असतो. ते ह्या दोन गोष्टींमध्यें देशाला कांहीं मोबदला दिल्याशिवाय सर्व संपत्तीचा फडशा उडवितात. कधीं लढाईचा प्रसंग आला ह्मणजे देशांतील शेतकरी आणि इतर धंदे चालविणारे उद्योगी लोक ह्यांसही ह्या लष्करी वर्गांत सामील व्हावें लागतें. ह्यास्तव लढाईसारखी देशाच्या कल्याणास आणि भरभराटीस आपायकारक अशी दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या कुटुंबामध्यें एकच मनुष्य भांडखोर असला तरी तो सर्व कुटुंबाच्या शांततेचा बिघाड करण्यास पुरे होतो, त्याचप्रमाणें एखाद्या खंडामध्यें एकच राष्ट्र जरी भांडखोर असलें, तरी त सर्व खंडाच्या शांततेचा बिघाड करण्यास पुरे होतें.

ज्या देशामध्यें लोक प्रामाणिक आणि सरळ

आहेत, व कलागत उपस्थित करून शेजारच्या देशांतील लोकांबरोबर कधींही लढाईचा प्रसंग आणीत नाहींत, त्याच देशामध्यें ह्या मध्यम प्रतीच्या वर्गाचें अस्तित्व शक्य आहे. ह्यास्तव विशेषेंकरून ह्या वर्गांतील लोकांनींच आपलें वर्तन सरळ आणि प्रामाणिकपणाचें ठेवण्यास सतत झटलें पाहिजे.

ह्याप्रमाणें समाजापासून ज्या कांहीं बऱ्या वाईट गोष्टींचा लाभ झाला असेल त्याचा मोबदला देण्यास प्रत्येकानें तयार असलें पाहिजे. हा नियम सर्वांस सारखा लागू आहे.

---

## मनुष्येतर जे प्राणी आपल्या उपयोगीं पडतात त्यांच्यासाठीं आपण काय केलें पाहिजे ?

जगामध्यें असे पुष्कळ प्राणी आहेत कीं, ज्यांचा मानवी समाजामध्यें अंतर्भाव होत नाहीं. तथापि ते आमच्यामध्येंच रहात असतात, आणि त्यांच्यापासून आह्मांस आमच्या सुखाचे आणि निर्वाहाचे इतके पदार्थ मिळत असतात कीं, त्या प्राण्यांशिवाय आमची या जगामध्यें वसति किंबहुना शक्यच नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. ह्याप्रमाणें ज्या प्राण्यांचे आमच्यावर कांहीं विलक्षण प्रकारचे उपकार होत आहेत, ते प्राणी कोणते ह्याचा आतां आपण विचार करूं.

आपल्या मानेवर नांगराचें जूं घेऊन शेतामध्यें काम करणारा, व नाकामध्यें खुशाल वेसण घालून घेऊन व गाड्यांच्या जोखडांस आपली मान देऊन आह्मांस आमच्या ओझ्यांसह खडकाळ रस्त्यांवरून पाहिजे तिकडे वाहून नेणारा आमचा बंदानोकर बैल आमच्याकरितां किती कष्ट करीत असतो, हें आह्मी नेहमीं पहातच आहों. त्याचप्रमाणें तोंडामध्यें खुषीनें लगाम घेऊन आह्मांस आपल्या पाठीवरून किंवा गाड्यांतून दूरदूरच्या अंतरावर घेऊन जाणारा आमचा उमदा मित्र घोडा आमचें केवढें मोठें काम बजावीत असतो, ह्याचाही अनुभव आह्मांस घडोघडीं येत आहेच. बैल आणि घोडा हे दोन प्राणी अति प्राचीन काळापासून आमच्या इतके उपयोगीं पडत आले आहेत कीं, त्यांच्या मदतीशिवाय आह्मांस सांप्रतची सुधारलेली स्थिति प्राप्त झाली असती कीं काय, ह्याची शंकाच आहे.

बैल आणि घोडे जें काम करतात तें सर्व जर मनुष्यांना करावें लागलें असतें, ह्मणजे त्यांचीं ओझीं जर त्यानांच वाहून न्यावीं लागलीं असतीं, आणि त्यांच्यानें जितकें चालवलें असतें त्याच्या पलीकडे जर तीं कधींच गेलीं नसतीं, तर त्यांची पूर्वींची रानटी स्थिति आजला तशीच कायम असती; त्यांचें दूरच्या लोकांबरोबर दळणवळण सुरू झालें नसतें; अन्नवस्त्र आणि घरदार बांधण्याचें सामान त्यांना जमिनीवरून हल्लींप्रमाणें पाहिजे तितकें इकडे तिकडे नेतां आलें

नसतें; त्यांना ज्या वस्तूंची नेहमीं गरज लागते, त्यांपैकीं फारच थोड्या वस्तू त्यांस प्राप्त झाल्या असत्या; व त्यांच्या मानसिक शक्तींचाही विकास फारच थोडा झाला असता.

पूर्वी जें काम काम बैल व घोडे करीत असत, तें आतां लोखंडी रस्ते होऊन आगगाड्यांनीं होऊं लागलें आहे, ही गोष्ट खरी. परंतु आपणांस जर बैलघोड्यांची मदत नसती, तर लोखंडी रस्तेच आ-जला अस्तित्वांत आले नसते. मनुष्यांनीं शास्त्रीय ज्ञान संपादिलें नसतें, तर लोखंडी रस्त्यांची युक्तिच निघाली नसती. घोडे आणि बैल जीं मोठमोठ्या श्रमांचीं आणि काबाडकष्टांचीं कामें करितात, तीं करण्यामध्येंच जर मनुष्यांची सर्व शक्ति खर्च झाली असती, तर त्यांच्यानें शास्त्रीय ज्ञान संपादन कर-ण्याचें काम कधींच झालें नसतें.

एखाद्या मोठ्या भरवस्तीच्या शहरांतील रस्त्या-मध्यें जर तुह्मी घटका अर्धा घटका उभे रहाल, आणि बैलांच्या व घोड्यांच्या गाड्या तितक्या वेळांत किती जातात व येतात ह्याची जर तुह्मी गणती कराल, तर घोड्यांनीं व बैलांनीं काम करावयाचें नाहीं असें ह्मटलें तर आपला सर्व कामधंदा कसा बसेल व आपण किती सुखास अंतरूं ह्याची तुह्मांला थोडीशी कल्पना करितां येईल.

ओझीं वाहून नेणारीं आणखी दुसरीं जनावरें आहेत, त्यांच्यासंबंधानें सुद्धां असेंच आहे. गाढव

हें शक्तीनें घोड्याबैलाप्रमाणेंच आहे; परंतु तें त्यांच्यापेक्षां अधिक सहनशील असून कामही अधिक नेटानें करितें. घोड्याबैलांपेक्षां गाढवास बाळगण्याचा खर्च फारच थोडा येतो, आणि ह्मणून गरीब लोकांस त्याचा फारच उपयोग होतो. तें मोठमोठ्या श्रमांचीं कामें करितें; परंतु त्याबद्दल त्याला शाबासकी न मिळतां बहुधां टोलेच खावे लागतात. तें जरी ह्याप्रमाणें फार कामीं पडत असतें, तरी त्याच्या खाण्यापिण्याचे व राहण्याच्या जागेचे हालच असतात. गाढवाचें सावत्र भावंड खेचर ह्याचीही गोष्ट अशीच आहे. डोंगराळ देशांत श्रीमंत आणि गरीब लोकांना त्यांचा सारखाच उपयोग होतो. उंट व हत्ती ह्यांचाही मनुष्यास वारंवार उपयोग होतो. जेथें साध्या गाड्या किंवा आगगाड्या चालत नाहींत, अशा रेतीच्या मैदानांत मोठमोठीं ओझीं नेण्याच्या कामीं आपणांस त्यांचा मोठा उपयोग होतो.

ह्याप्रमाणें ह्या सर्व प्राण्यांचे आह्मांवर नेहमीं जे उपकार होत आहेत, त्यांची आमच्यानें कधींही फेड व्हावयाची नाहीं. कारण, ज्याप्रमाणें आपण मजुरी करणारास केलेल्या कामाबद्दल मजुरी देतों, त्याप्रमाणें ह्या प्राण्यांना आपणांस पैसेही देतां येत नाहींत. मजुरांना मजुरीचे जे पैसे मिळतात, त्यांतील आपला खर्च बेतानें चालवून कांहीं तरी पैसा मागें टाकण्याची व आपल्या आंगीं काम करण्याची ताकद नाहींशी झाल्यावर त्या पैशावर कांहीं दिवस

तरी काढण्याची सवड असते. परंतु ह्या प्राण्यांना तसें करतां येत नाहीं. शिवाय त्यांना आह्मीं कधीं मेजवानी देण्याचें किंवा त्यांची कोणत्या तरी रीतीनें कर्मणूक करण्याचें मनांत आणिलें, तर तेंही आमच्या हातून होण्यासारखें नाहीं. कारण, आह्मांला ज्या गोष्टींपासून आनंद होतो त्या गोष्टींपासून त्यांना आनंद होईलच असें नाहीं. त्यांच्या उपकारांची फेड करावयाची ह्मणजे त्यांना कोणत्या कोणत्या गोष्टी मानवतात, व त्यांना कोणत्या गोष्टींपासून सुख होण्याचा संभव आहे, हें पाहूनच आह्मांस जें करावयाचें तें केलें पाहिजे. ज्याप्रमाणें आह्मांला चांगलें अन्न आणि तें मनमुराद पाहिजे, त्याचप्रमाणें तें त्यांनाही पाहिजे. तीं दिवसभर काम करून थकून आलीं ह्मणजे दुसऱ्या दिवशीं काम करण्यास ताजीं तवानीं होण्यास त्यांना विश्रांति, रात्रीचें चांगलें खाणें, आणि रहाण्यास चांगला थारा मिळाला पाहिजे. त्यांच्यावर जीं ओझीं लादावयाचीं, तींहीं त्यांना सहजीं नेतां येण्यासारखीं असलीं पाहिजेत. त्यांचीं जोखडें त्यांची मान घसपटून त्यांना त्रास होण्यासारखीं असतां कामा नयेत. त्यांचें पाऊल जलद उठावें ह्मणून नुसता त्यांना चाबुकानें इशारा करावा; फडाफड तडाके देण्याचें कारण नाहीं. ज्याप्रमाणें आह्मीं सौम्य व लाडक्या उपायांनीं आपल्या मुलांना शिक्षण देतों, त्याप्रमाणें त्यांनाही दिलें पाहिजे. आपण जर एकदां त्यांचें काम त्यांना समजेसें

केलें, तर पुढें आपणास त्यांस चाबूक लावण्याचें सहसा कारण पडावयाचें नाहीं. ह्या सर्व गोष्टी मनामध्यें घेऊन आह्मीं त्यांची व्यवस्था ठेविली, तरच आह्मीं त्यांचे अंशमात्रें तरी उतराई होऊं.

बैल, घोडे व गाढवें हीं जनावरें फार ममताळू आणि मनमिळाऊही असतात. धन्यानें आपणांपाशीं बोलावें, आपल्याला गोंजरावें, आपले लाड करावे, असें त्यांना फार वाटत असतें. लोक त्यांना वारंवार निर्दयतेनें वागवितात तसें न वागवितां जर ममतेनें वागवीत गेले, तर तीं आपलें काम अधिक खुषीनें करून आपल्या जास्त उपयोगीं पडतील. जो मनुष्य आपल्यावर उपकार करणाऱ्या व आपल्यासाठीं खपणाऱ्या मित्रास निर्दयतेनें वागवितो, तो मनुष्य अत्यंत नीच नव्हे काय ?

ज्याला पोटभर खावयासही मिळत नाहीं असें एखादें गाढव आपल्या शक्तीपलीकडचें ओझें मोठ्या जिकिरीनें नेत असतांना त्यास त्याचा धनी चाबकानें मारीत आहे असें पाहिल्यानें कोणाच्या मनास दुःख होणार नाहीं ? त्याचप्रमाणें चार चाकांच्या सुशोभित गाड्यांमध्यें श्रीमंत लोक आपल्या पत्नींसह मोठ्या थाटानें चालले असतां त्या गाड्यांच्या सुंदर घोड्यांचे तोंडाशीं जर जेरबंदाच्या आणि लगामीच्या चापानें दम कोंडला गेल्यामुळें फेंस आलेला पाहून कोणाचें अंतःकरण दुःखानें विदीर्ण होणार नाहीं ? त्या गाढवाचा धनी आणि तीं गाडींतलीं श्रीमंत

स्त्रीपुरुषें खरोखर फार निर्दय आणि कृतघ्न आहेत असें जो ही वरील स्थिति पाहील त्यास वाटल्याशिवाय रहावयाचें नाहीं.

मनुष्येतर जे प्राणी हजारों तऱ्हांनीं आपल्या उपयोगीं पडत आहेत, त्यांची जर आपण योग्य काळजी घेतली, आणि त्यांना जर सतत ममतेनें वागविलें, तर त्यांचे आमच्यावर जे उपकार होतात त्यांची अंशमात्रें तरी आमच्या हातून फेड होण्याचा संभव आहे. आह्मीं ह्या प्राण्यांस कितीही ममतेनें आणि काळजीनें वागविलें, तरी त्याचे आमच्यावर जे नेहमीं उपकार होत असतात त्यांपैकीं दहाव्या हिश्शाचीही फेड आमच्या हातून व्हावयाची नाहीं, हें जरी खरें आहे, तरी त्यांतल्या त्यांत आपल्या हातून जें होण्यासारखें आहे तें करून त्या प्राण्यास सुख देण्याविषयीं नेहमीं प्रयत्न करणें हें आमचें कर्तव्य आहे, हें उघड आहे. परंतु ह्या कर्तव्याच्या संबंधानें आह्मी नेहमीं इतके बेफिकीर असतों कीं, आमचें ह्या प्राण्यांच्या संबंधानें नेहमींचें वर्तन पाहिलें तर हे प्राणी आमच्या उपयोगीं पडत असतात हें आमच्या कधीं मनांत तरी येत असेल काय ? ह्याविषयीं एखाद्याला शंकाच उत्पन्न व्हावयाची. जे प्राणी आमच्या सतत उपयोगीं पडतात, त्यांच्यासंबंधानें आमचें वर्तन अशा प्रकारचें असणें ह्मणजे हा आमचा मोठा कृतघ्नपणा नव्हे काय ? व हें कृतघ्नपणाचें आपलें वर्तन सुधारून त्या प्राण्यांस नेहमीं

ममतेनें वागविणें हें आमचें एक अत्यंत महत्त्वाचें कर्तव्य नाहीं काय ?

कुत्रीं, मांजरें, वगैरे जे प्राणी नेहमीं आमच्यामध्यें मिसळून राहतात, त्यांजलाही ममतेनें वागवून ते नेहमीं सुखामध्यें राहतील अशी आह्मीं तजवीज केली पाहिजे. हे प्राणी नेहमीं आमच्याशीं मित्रत्वानें वागून लडिवाळपणा करीत असतात, हें आह्मी पहातों, व अशा प्राण्यांना विनाकारण त्रास देणें ह्यासारखा खचितच दुसरा निर्दयपणा नाहीं. कुत्र्याशीं आपण जर कांहीं बोललों, तर तें तो समजतो, आणि तो आमच्या घरीं खुशाल पहारा करीत बसून त्याच्यानें होण्यासारखी आमची पाहिजे ती नोकरी करण्यास तयार असतो. आह्मी जर त्याला गोंजारून थोपटलें, तर तो आनंदानें आपली शेपटी हालवून नाचूं लागतो; आह्मी जिकडे जाऊं तिकडे आमच्याबरोबर येण्यास तो तयार असतो; व ज्या प्राण्यांपासून किंवा ज्या वस्तूंपासून आह्मांस इजा होण्याचा संभव आहे असें त्यास वाटतें, त्या प्राण्यांवर किंवा त्या वस्तूंवर तो नेहमीं भुंकत सुटतो.

मांजराचीही गोष्ट साधारणपणें अशीच आहे. त्याला घरामध्यें काय चाललें आहे तें सर्व समजतें. त्याला जर हळू हळू थोपटूं लागलें, तर तें आनंदानें गुरगुरूं लागतें; आणि त्याला दूध वगैरे कांहीं हवेंसें वाटलें, तर तें आमच्या पायांमध्यें घोटाळूं लागून,

अंगाशीं डोकें चोळूं लागतें. त्याचीं लहान गोजि-रवाणीं पिलेंही आपसांमध्यें लहान मुलांप्रमाणें धुडकूस घालून आपल्या गमतीच्या नाचण्यावागडण्यानें आ-मचीं मनें सतत रमवीत असतात.

कुत्रीं, मांजरें आणि अशा प्रकारचे दुसरे प्राणी आमच्याबरोबर नेहमीं मित्रत्वानें वागण्यास तयार असतात. आह्मीं मात्र आपल्याकडून त्यांच्याबरोबर मित्रत्वानें वागण्यास तयार असलें पाहिजे. लहान लहान पक्षी, ससे, खारी आणि उंदीर हे सर्व प्राणी, आह्मीं जर त्यांस भेवडाविलें नाहीं, तर सतत आम-च्यामध्यें मोठ्या आनंदानें मिसळतील. परंतु आ-ह्मींच आपल्या उपजत दुष्ट बुद्धीच्या योगानें त्यांस नानाप्रकारांनीं त्रास देऊन आमच्यापासून दूर रहाण्यास भाग पाडितों. आमची ही उपजत दुष्ट बुद्धि इत-क्या नीच प्रतीची आहे कीं, ती, हे निरुपद्रवी प्राणी आनंदानें कालक्रमण करीत आहेत, हें आह्मांस खपूं देत नाहीं.

मानवी प्राण्यांमध्यें दिसून येणाऱ्या ह्या उपजत द्वेषबुद्धीचें स्वरूप द्वाड आणि उनाड पोरांच्या स्व-भावामध्यें विशेष भयंकर रीतीनें दिसून येतें. जर एखादा लहानसा प्राणी इकडे तिकडे उडतांना किंवा धांवतांना ह्या पोरांच्या नजरेस पडला, तर ते त्या-च्यावर धोंडे फेकून प्रसंगीं त्यास ठार मारावयासही चुकावयाचे नाहींत. त्यांच्या हातून जी गोष्ट घडून येत ती ते मुद्दाम समजून उमजून करतात असें

नाहीं; ती त्यांच्या गैरसमजुतीमुळें व अविचारानें त्यांच्याकडून सहजीं होऊन जाते.

एकदां कांहीं उनाड मुलगे एका तळ्याच्या पाळीवर गमतीनें खेळत होते. तेथें त्यांचा असा उद्योग चालला होता कीं, जे कांहीं सरडे किंवा चोपया इकडे तिकडे जातांना त्यांच्या नजरेस पडत, त्यांना ते बेधडक धोंडा घालून ठार मारीत. हा सर्व प्रकार एका जाणत्या मनुष्यानें पाहिला. तेव्हां त्यानें लगेच तेथें जाऊन तो चाललेला दुष्ट प्रकार बंद करावयाचें मतांत आणिलें. एक मुलगा वरील जातींच्या प्राण्यांपैकीं एकावर धोंडा घालण्याच्या बेतांत होता, इतक्यांत त्या गृहस्थानें त्या निरुपद्रवी प्राण्यावर आपला हात ठेवून असें ह्मटलें कीं, ह्या बिचाऱ्या प्राण्याला तुह्मी कां मारावें? त्यानें तुह्मांस कोणत्याही प्रकारची इजा दिलेली नाहीं. त्याला तुह्मी जगूं दिलें तर तुमचें काय जाईल? त्या गृहस्थाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच तो मुलगा त्याच्या तोंडाकडे पाहूं लागला, आणि त्याच्या मनांत कांहीं नवीन विचार आलासें दिसलें. तो मुलगा त्या गृहस्थाला ह्मणाला, अहो, तुह्मी ह्मणतां तें खरें; त्या प्राण्याला आह्मी विनाकारण कां मारावें? त्यानें आमचें कांहीं नुकसान केलेलें नाहीं; त्याला जगूं देणें हेंच उचित आहे. इतर मुलांस सुद्धां ही गोष्ट कबूल झाली; आणि त्यांनींही मोठ्या आनंदानें

ओरडून असें ह्मटलें कीं, ह्या सरड्यांनीं किंवा चोप- यांनीं आमचें कांहीं नुकसान केलेलें नाहीं. त्यांस आह्मीं जगूं दिलें पाहिजे. ह्यानंतर ते मुलगे त्या गरीब बिचाऱ्या प्राण्यांच्या कधींही वाटेस गेले नाहींत.

गरीब निरुपद्रवी प्राणी सुखानें यथेच्छ इकडे ति- कडे फिरतांना आपल्या नजरेस पडले, तर आह्मीं नेहमीं असें ह्मणावें कीं, ते प्राणी आह्मांस त्रास देत नाहींत, व ह्मणून त्यांस आह्मीं वांचूं दिलें पाहिजे.

---

## सरकार व स्वातंत्र्य.

एखादें स्वच्छंदी मुल असा प्रश्न करितें कीं, 'मला जें वाटतें तें मीं कां करूं नये?' ह्या प्रश्नाला योग्य उत्तर ह्मटलें ह्मणजे असें आहे कीं, तुला जें वाटतें तें करण्यास हरकत नाहीं, परंतु त्यापासून दुसऱ्यास जें करावेंसें वाटतें तें करण्यास त्यास नड येतां कामा नये. परंतु जें सर्वांना हवेंसें वाटतें त्यापैकीं तुझा जि- तका योग्य वांटा असेल त्यापेक्षां जर तूं जास्त घेऊं लागशील, जें वास्तविक रीतीनें तुझें नाहीं, तें घेऊन जर तूं दुसऱ्याचा हक्क बुडवूं पाहशील, किंवा दुस- ऱ्यांना शांतपणें बसावें असें वाटत असतां तूं जर गडबड करूं लागशील, तर मात्र दुसऱ्यांस जें नि- र्वेधपणें करावेंसें वाटतें त्यास तूं हरकत आणल्यासार- खें होतें. लहान मुलें तुझ्या सभोंवतीं गमतीनें खेळत असतां, जर तूं दांडगाई करून त्यांस त्रास देशील,

तर तूं त्यांच्या यथेच्छ आनंदामध्यें खेळण्याच्या हक्कास आड आल्यासारखें होईल.

जर एखाद्या कुटुंबांतील मुलें चांगलीं शहाणीं आणि उदार असतील, तर त्यांस त्यांच्या मनाप्रमाणें वागूं देण्यास हरकत नाहीं; कारण तीं इतरांच्या व आपल्या संबंधानें जें कांहीं योग्य व रास्त असेल तेंच नेहमीं करीत जातील. परंतु मुलें सदा सर्वकाळ शहाणपणानें आणि उदारपणानें वागतीलच, असा कांहीं नेम सांगतां येत. नाहीं. आणि मुलांना जर मनसोक्त वागण्याची परवानगी दिली, तर त्यांपैकीं दांडगी आणि शरीरानें धष्टपुष्ट असतील तीं गरीब आणि अशक्त मुलांना त्रास देण्यास कधीं चुकावयाचीं नाहींत. ह्याप्रमाणें एका मुलास जी मोकळीक होते, तिच्याच योगानें दुसऱ्यास त्रास होण्याचा संभव आहे.

ह्यास्तव दरएक मुलास मनाप्रमाणें वागण्याची योग्य तितकीच मोकळीक मिळत आहे, हें पाहण्यास प्रत्येक कुटुंबामध्यें एक शास्ता असणें अगदीं अवश्य आहे. त्यानें एका मुलाकडून दुसऱ्याच्या हक्कांस किंवा मोकळिकीस हरकत पोहोंचूं नये, ह्मणून सर्वांनीं कोणत्या रीतीनें वागावें, ह्याविषयीं योग्य नियम करून ठेविले पाहिजेत. मुलें जर हे नियम पाळीत गेलीं, तर त्यांजला प्रत्येक मुलास मनसोक्त रीतीनें वागण्याची परवानगी दिल्यानें आपसांमध्यें भांडणें सुरू होऊन जी मोकळीक मिळावयाची तिच्यापेक्षां खचितच जास्त खरी मोकळीक मिळेल.

तर मग प्रत्येकास मनाप्रमाणें वागावयास मिळणें ही खरी मोकळीक नव्हे. सर्वांना सारखे लागू असणारे असे जे न्यायाचे कायदे असतील ते पाळून सर्वांना सारखे हक्क मिळणें हीच खरी मोकळीक होय. ज्याप्रमाणें घरांतील शास्ता आपल्या लहान कुटुंबावर सत्ता चालवितो, त्याप्रमाणें सरकार राष्ट्ररूपी महा कुटुंबावर सत्ता चालवितें. ज्याप्रमाणें कुटुंबांतील सर्व मुलांस सारख्या ममतेनें आणि न्यायानें वागविणारा शास्ता उत्तम गृहशास्ता होय, त्याप्रमाणें आपल्या सर्व रयतेच्या सुरक्षिततेचा व स्वातंत्र्याचा योग्य रीतीनें बंदोबस्त पहाणारें सरकार चांगलें सरकार होय.

जर घरच्या शास्त्यानें एकाच मुलावर विशेष ममता व फाजील लाड करून त्यास शेफारूं दिलें, तर इतर मुलांस त्या पक्षपाताचा राग येतो, तीं त्याचा हेवा करूं लागतात, व घरामध्यें कलागती माजतात. त्याचप्रमाणें सरकार जर आपल्या प्रजेपैकीं एखाद्या विशिष्ट वर्गास जास्त सवलती देऊं लागलें, व इतरांची सोय गैरसोय न पाहतां त्या वर्गाच्या फायद्याकडे लक्ष देऊन सर्व कायदेकानू करूं लागलें, तर इतरांस त्या अन्यायाचें वैषम्य वाटून देशामध्यें दंगेधोपे, बंडें व आपसांत मारामारी सुरू होण्याचा संभव आहे.

सरकारें अनेक प्रकारचीं आहेत; त्या सर्वांचा उपयोग ह्मटला ह्मणजे सर्व मनुष्यजातीस सुखानें

एकत्र रहातां यावें हा आहे. लहानपणीं घरांत एकत्र राहणारीं बहीणभावंडें ह्मणजे एक लहानसा जनसमूहच होय; व तीं आपल्या आईबापांच्या आज्ञेंत राहून पुढें जनसमाजरूपी महा कुटुंबाचे घटकावयव होण्यास समर्थ होतात.

प्राचीन काळीं सरकार अगदीं साधें ह्मणजे कुटुंबसंस्थेच्या धर्तीवर असे. कुटुंबांतील मुलांचा बाप किंवा कुटुंबशास्ता हा त्या कुटुंबांतील सर्व मुलांवर आपली सत्ता चालवीत असे. पुढें त्या मुलांना मुलें झालीं ह्मणजे तीं मुलें आणि नातवंडें मिळून त्या वयोवृद्ध कुटुंबशास्त्याचाच मान राखून त्याच्या आज्ञा पाळीत असत, आणि आपल्या सर्व कज्जेकफवतींचा इनसाफ त्याच्यांवरच सोपवीत असत.

ह्या नातवंडांना मुलें झाल्यानंतरही जर तो वयातीत कुटुंबशास्ता हयात राहिला, तर तो मग त्या सर्व परिवाराचा मुख्य होत असे. प्रथमतः हा कुटुंबशास्ता आपल्या मुलांचाच शास्ता असे; परंतु पुढें तो मुलें, नातवंडें आणि पतवंडें ह्यांचाही शास्ता होत गेला. पुढें पुढें हे कुटुंबरूपी जनसमाज जसजसे वाढत गेले, तसतसे ते आपापल्या सोईप्रमाणें गुरांढोरांसहित निरनिराळ्या ठिकाणीं रहात गेले खरे; परंतु त्यांपैकीं प्रत्येकावर एक मानलेला कुटुंबशास्ता असेच. ह्याप्रमाणें सरकारचें अगदीं मूळ स्वरूप ह्मटलें ह्मणजे कुटुंबशास्त्याचा अंमल हें होय. हे लहान लहान जनसमूह आपले शत्रू, वन्यपशू आणि थंडीवारा

ह्यांपासून आपलें रक्षण करण्याकरितां कुटुंबशास्त्याच्या आज्ञेमध्यें मोठ्या एकोप्यानें रहात असत.

हा कुटुंबशास्ता मरण पावला ह्मणजे आपल्या कामाकाजाची व्यवस्था लावण्यास, आपल्या कज्जांचा इनसाफ करण्यास, आणि अन्न वगैरे सारखें वांटून देण्यास कोणी नाहीं असें लोकांस लागलेंच वाटूं लागे, आणि ते लगेच त्याच्या जागेवर कोणाची तरी नेमणूक करीत. एखादे वेळेस तो कुटुंबशास्ताच आपल्या मरणापूर्वी दुसऱ्या शास्त्याची नेमणूक करी. कधीं कधीं असेंही घडून येत असे कीं, एखाद्या कुटुंबाचा शास्ता मरण पावला ह्मणजे तें कुटुंब ज्या कुटुंबाचा शास्ता जिवंत आहे अशाला जाऊन मिळे. आणि असें होतां होतां दोन दोन, तीन तीन, अशीं कुटुंबें एकत्र मिळून एकाच शास्त्याच्या अमलाखालीं लोकांची एक मोठी टोळी जमत असे.

ज्या वेळेस लोकांना जमिनीची लागवड करण्याचें माहीत नव्हतें, त्या वेळेस त्यांच्या वस्तीच्या आसपासच्या जमिनींतील कंदमुळें, झाडपाला, आणि पारधींचीं रानटी जनावरें ह्यांचा ते लोक अन्नाच्याऐवजीं उपयोग करून, तेथें त्यांचा मागमूसही राहूं देत नसत. तेथील गवतचाऱ्याचाही त्यांच्या गुरांढोरांकडून तेव्हांच फडशा उडविण्यांत येत असे. अमेरिका खंडामध्यें असा प्रकार पुष्कळ घडून आलेला आहे. ज्या जमिनीच्या भागावर हल्लीं दोन तीन

हजार युरोपियन लोकांचा चांगला चरितार्थ चालूं लागला आहे, त्या जमिनीच्या त्या भागावर पूर्वी उत्तर अमेरिकेंतील दोनतनिशें रानटी लोकांचा चरितार्थ चालण्यासही कठिण पडून त्यांस अर्धपोटीं रहाण्याची पाळी येत असे. ही गोष्ट मनांत आणली ह्मणजे वरील प्रकार कसा घडून येत असे, ह्याचें कोणास आश्चर्य वाटावयाचें नाहीं.

ह्याप्रमाणें जमिनीच्या एका भागांतील अन्नाचा पुरवठा नाहींसा झाला ह्मणजे प्राचीन रानटी लोकांच्या टोळ्यांस ह्या जागेवरून त्या जागेवर भटकत फिरावें लागत असे; आणि अन्नपाण्याच्या सोयीची उत्तम जागा मिळविण्याकरितां त्यांच्यामध्यें वारंवार लढाईचेही प्रसंग येत असत. असे प्रसंग आले ह्मणजे जी बलाढ्य टोळी असे, ती इतरांचा पाडाव करून आपणच सर्व कांहीं बळकावून घेत असे. कधीं कधीं निरनिराळ्या टोळ्या एकत्र होऊन आपल्यास सबळ करण्याकरितां एखाद्या शूर लढाऊ पुरुषाच्या आश्रयास जाऊन त्याच्या हाताखालीं रहाण्यास तयार होत. ह्याप्रमाणें कुटुंबशास्त्याचा अंमल जाऊन त्याच्याऐवजीं शूर लढाऊ पुरुषाचा अमल लोकांमध्यें सुरू झाला.

विजयी लोकांच्या टोळ्या एकत्र जमूं लागल्या. कीं त्यांची संख्या व सामर्थ्य हीं भराभर वाढत जातात. कारण, त्यांनीं जिंकलेले लोक त्यांचे दास किंवा नोकर बनतात, आणि ज्या टोळ्यांच्या आंगीं सा-

मर्थ्य नाहीं, अशा टोळ्या त्यांचा स्नेह संपादून त्यांच्या आश्रयास जाण्याची इच्छा धरतात. अशा प्रकारें कांहीं काळानें जमत जमत पुष्कळ लोक झाले ह्मणजे त्यांना राहण्याकरितां एक मोठा देश हवा लागतो, आणि ते असा देश पसंत करून तेथें आपल्या सामर्थ्याच्या योगानें सुरक्षितपणें राहूं लागतात. ह्याप्रमाणें तो देश नंतर एक राष्ट्र होऊन जातें. राष्ट्राच्या शास्त्यास राजा असें ह्मणतात. राजा ह्मणजे रयतेचा बाप. परंतु प्राचीन काळीं कांहीं देशांमध्यें राजाचें नातें बापापेक्षां कांहीं निराळें होतें. तो आपल्या लोकांस सेनापतीसारखा असे, व आपण त्यांचा मुख्य होऊन त्यांच्या शत्रूंपासून त्यांचें रक्षण करीत असे. ह्याप्रमाणें लोकांमध्यें राजांचा अमल सुरू झाला. ह्या राजांपैकीं कांहीं राजे लोकनियुक्त असत, व कांहींना राजा हें पद वंशपरंपरेनें प्राप्त होत असे.

देशामध्यें लोकांस शांतता मिळावी, ह्मणून तेथील सरकारानें किंवा राजानें त्यांनीं कसें वागावें, ह्याविषयीं कांहीं नियम किंवा कायदे करून ठेविले पाहिजेत; व ज्या देशामध्यें हे नियम किंवा कायदे नीटपणें पाळले जात असतील, त्या देशांतील लोकांनाच शांतता मिळण्याचा संभव आहे. एखाद्या मुलाचीं आईबापें त्याच्या दुर्दैवानें अगदीं दुष्ट किंवा गैरचालीचीं असतील, तर गोष्ट निराळी; परंतु ज्या मुलांचीं आईबापें अशीं नाहींत, त्यापैकीं प्रत्येकानें

त्यांची आज्ञा अवश्य पाळली पाहिजे. त्याचप्रमाणें ज्या देशाचे कायदे इतके अन्यायाचे आहेत. कीं सार्वजनिक सुखाकरितां ते मोडले जाणें अवश्य आहे, त्या देशाची गोष्ट निराळी; परंतु इतर प्रत्येक देशांतील कायदे दरएक मनुष्यानें अवश्य पाळले पाहिजेत.

शहाणा बाप आपल्या मुलांकरितां जसे नियम करून ठेवितो, तसे नियम त्या मुलांना आपल्याकरितां कधीं करून ठेवितां यावयाचे नाहींत. ह्याचें कारण उघडच आहे कीं, त्याला पुष्कळ वर्षांचा अनुभव असतो, व त्यामुळें बरें कोणतें व वाईट कोणतें, हें त्याला चांगलें समजत असतें. त्याचप्रमाणें सुशिक्षित राष्ट्रांतील कायदे पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें सुधारत आले असल्यामुळें त्यांच्यापासून लोकांचा जीव, मालमत्ता, व हक्क ह्यांचें अधिक चांगल्या रीतीनें रक्षण होण्याचा संभव असतो.

आह्मी हिंदुस्थानांतील सर्व लोक महाराणी साहेबांची प्रजा आहों. आमच्यावर ज्या कायद्यांचा अमल चालतो ते कायदे महाराणी साहेबांचे प्रतिनिधी व्हाइसराय साहेब व इलाख्याचे गव्हर्नर ह्यांच्या कायदेकौन्सिलांमध्यें पसार होत असतात. हे कायदे सर्व जातींच्या लोकांस सारखे न्यायाचे व्हावे, ह्मणून ते लोकमतास अनुसरून असले पाहिजेत, हें उघड आहे. ह्या देशांतील राष्ट्रीय सभेनें सरकाराकडे जीं मागणीं केलीं आहेत, त्यांत कायदेकौन्सिलांतील कांहीं सभासद लोकनियुक्त असावे, हें मागणें इतर

सर्व मागण्यांचें सार ह्मणून अगदीं पहिल्यानेंच घातलें आहे, ह्याचें तरी कारण हेंच आहे. नुकतेंच हें मागणें अंशमात्र सफल झालें आहे.

एखाद्या राष्ट्रांतील लोक जर जवळच्या परराष्ट्रांबरोबर विनाकारण अन्यायानें लढाई करण्याविषयीं आपल्या सरकारास आग्रह करूं लागले, आणि तें सरकार जर त्यांच्या आग्रहाप्रमाणें वागूं लागलें, तर त्या एकंदर सर्व राष्ट्रांस कधींच शांतता मिळावयाची नाहीं. जर एखाद्या वर्गातले लोक आपण जे पदार्थ विशेष वापरतों, त्यांवरील कर कमी करण्यांत यावा, आणि दुसऱ्या एखाद्या वर्गांतील लोकांना जे पदार्थ विशेष अवश्य आहेत, त्यांवरील कर वाढविण्यांत यावा, असें सरकाराकडे मागणें करूं लागले, तर त्यांचें तें मागणें स्वार्थपर आणि अन्यायाचें होईल हें उघड आहे; व सरकारानें त्यांचें मागणें जर अविचारानें कबूल केलें, तर त्या सरकारानें त्या आप्पलपोट्या लोकांच्या नादीं लागून त्या दुसऱ्या वर्गांतील लोकांचें विनाकारण नुकसान केलें असें होईल. जर देशांतील कारखानदार आपल्या कारखान्यांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांस चांगली किंमत यावी ह्मणून इतर देशांतील ते पदार्थ आपल्या देशांत येऊं देऊं नये, असा कायदा करण्याविषयीं सरकाराकडे मागणें करतील, तर ते लोक आपल्या देशबांधवांस भारी किंमतीचे व कमी प्रतीचे पदार्थ विकत घेण्यास लावून आपल्या आप्पलपोटेपणानें आपणांस श्रीमंत करूं पहात आहेत, असें उघड होतें.

देशांतील प्रत्येक मनुष्य प्रामाणिकपणानें वागेल, स्वार्थत्याग करून परोपकाराकडे आपलें सतत लक्ष ठेवील, तर तो मनुष्य आपल्या देशाचें मोठेंच हित साधीत आहे, असें समजलें पाहिजे. जर एखादा मनुष्य असें ह्मणूं लागला कीं,. माझ्या देशांतील कायदे अगदीं न्यायाचे आहेत, कारण त्यांच्या योगानें सर्व लोकांस अगदीं सारखे हक्क मिळतात, व ह्मणून ते कायदे मीं सतत पाळीत जाईन, तर त्याचें हें ह्मणणें त्यास अत्यंत भूषणास्पद होईल. परंतु जर एखादा मनुष्य असें ह्मणूं लागला कीं, मी कोणाच्याही ताब्यांत राहणार नाहीं, आणि जे कायदे माझ्या स्वतःच्या हिताचे आहेत, तेवढेच मी पाळीन, तर त्याचें तें ह्मणणें अर्थात् मूर्खपणाचें होणार आहे. असा मनुष्य स्वार्थपरतेचा दास बनून स्वहित साधण्याकरितां काय करील आणि काय करणार नाहीं ह्याचा कांहीं नेम सांगतां येणार नाहीं.

लोक जसजसे आपल्या देशबांधवांशीं अधिक दयाशीलतेनें, न्यायानें व प्रामाणिकपणानें वागूं लागतील, तसतशी त्यांना सरकारची कमी गरज पडूं लागेल. ज्याप्रमाणें मुलगा मोठा होऊं लागला ह्मणजे बाप आपला त्यावरील धाक हळू हळू काढून घेऊं लागतो, आणि तो आपलें वर्तन योग्य रीतीनें ठेवण्यासारखा झाला ह्मणजे त्यास आपली आज्ञा पाळण्याचें भाग पाडीत नाहीं, त्याप्रमाणें शहाणें सरकार लोक आपण होऊन कायद्याप्रमाणें

आणि न्यायानें वागूं लागले ह्मणजे त्यांस जास्त स्वातंत्र्य देत जाईल. " आपणांपाशीं लोकांनीं जसें वागावें असें आपण इच्छितों, त्याप्रमाणें आह्मीं इतरांपाशीं वागलें पाहिजे " हें तत्व लोकांच्या मनांत चांगलें बिंबलें-जाऊन तदनुसार ते आपले सर्व व्यवहार चालवूं लागले, ह्मणजे गुन्हेगारांस शिक्षा करून गुन्हे कमी करण्याकरितां सरकारानें चालविलेला मोठा खर्च सहजीं कमी करितां येईल; व अशा रीतीनें शिल्लक राहिलेला पैसा सरकारास लोकांच्या सुखाकरितां खर्च करण्याची सवड मिळत जाईल.

जेथपर्यंत लोकांवर सरकारचा अमल असण्याची आवश्यकता आहे, तोंपर्यंत त्या सरकाराविषयीं तें न्यायी आहे असा त्यांचा भरंवसा असला पाहिजे. न्यायी असणें ह्मणजे प्रत्येकास जें कांहीं त्याचें आहे, ह्मणजे ज्यावर त्याची वास्तविक रीतीनें मालकी आहे, तें त्यास देणें. ह्यास्तव लोक जेव्हां न्याय ही एक देवता आहे अशी कल्पना करितात, किंवा तिचें चित्र काढतात, तेव्हां त्या देवतेचे डोळे पट्ट्यानें बांधून तिच्या हातांत एक तराजू देत असतात; त्या तराजूच्या योगानें ती प्रत्येकास, कोणाचा पक्षपात न करितां किंवा कोणाची भीड न धरितां जो त्याचा योग्य वांटा असेल तो त्यास देत आहे, असें दाखविलेलें असतें.

प्रत्येक मनुष्यास आपला जीव, आपले अवयव, आपली मालमत्ता व आपलें स्वातंत्र्य ह्यांपैकीं दरएक

गोष्टींचें रक्षण करण्याचा स्वाभाविक हक्क आहे. इतकेंच मात्र कीं, प्रत्येकानें आपल्या स्वातंत्र्याचा दुसऱ्याचे स्वाभाविक हक्क हिरावून घेण्याच्या कामीं कधीं उपयोग करितां कामा नये. न्यायी सरकार प्रत्येक मनुष्याच्या स्वाभाविक हक्काचें रक्षण करितें; ज्या लोकांना आपलें रक्षण करितां येत नाहीं, त्यांना आपला आश्रय देतें, आणि जे मनुष्येतर प्राणी आमच्या अनेक तऱ्हांनीं उपयोगी पडतात, किंवा जे आमच्यामध्यें निरुपद्रवीपणानें राहतात, त्या प्राण्यांचाही सांभाळ करण्यास विसरत नाहीं.

चांगलें सरकार ह्याहीपेक्षां लोकहिताचीं जास्त कामें करितें. तें आपल्या प्रजारूपी विस्तीर्ण कुटुंबाच्या शिक्षणाची तजवीज करितें; अशाकरितां कीं, सर्वांनीं सुशिक्षित होऊन राष्ट्राचे सामाजिक आणि नैतिक कायदे पाळावे, व एकंदर जनसमूहास शांतता आणि सुख हीं प्राप्त व्हावीं.

तुह्मी मोठे झाल्यावर तुह्मांस देशांतील कायदे कौन्सिलांकरितां सभासद निवडण्याच्या कामीं मत देण्याचा अधिकार कदाचित् प्राप्त होईल. तुह्मांस हा अधिकार प्राप्त झाला ह्मणजे जो मनुष्य फक्त तुमचें स्वतांचें किंवा तुमच्या वर्गाचें हित साधण्याविषयीं वचन देईल त्याला तुह्मी पसंत करूं नका. जो मनुष्य प्रत्येक वर्गाला हितकर असे कायदे करण्याचें वचन देईल, आणि जो एका वर्गातील लोकांचे हक्क कबूल करितांना त्या हक्कांच्या योगानें दुसऱ्या वर्गातील

लोकांवर अन्याय होत नाहीं, हें पहाण्यास विसरणार नाहीं, अशा मनुष्यासच तुह्मी पसंत करण्याची खबरदारी ठेवा.

---

## देशाभिमान.

देशप्रीति ही गृहप्रीतीप्रमाणेंच स्वाभाविक आहे; वस्तुतः ती अधिक विस्तृत गृहप्रीतिच होय. जीं स्थलें आह्मी नेहमीं पहातों, त्यांच्याविषयीं आपल्या मनांत विशेष कळकळ असणें, व जे लोक आह्मी ज्या देशामध्यें रहातों त्याच देशामध्यें रहातात, जे आह्मी भाषा बोलतों तीच भाषा बोलतात, आणि ज्यांच्या रीतीभाती, कायदेकानू, आणि इतिहास वगैरे सर्व गोष्टी अगदीं आमच्याप्रमाणें आहेत, त्या लोकांविषयीं विशेष कळवळा असणें ह्याचा अर्थ देशप्रीति.

ज्याप्रमाणें पुष्कळ लोकांस आपला देश सर्व जगामध्यें उत्तम वाटतो, त्याचप्रमाणें पुष्कळ मुलांना आपलेंच घर सर्व घरांमध्यें उत्तम वाटतें. परंतु त्या उभयतांसही, आपणांस असें कां वाटतें, ह्याचें समर्पक कारण देतां येत नाहीं.

कधीं कधीं मुलें एकत्र जमलीं ह्मणजे आपापल्या घराची वाखाणणी करीत असतात. एक असें ह्मणतें कीं, माझें घर सर्व घरांत उत्तम, कारण तें भररस्त्यावर व एका गिरणीस लागून असल्यामुळें आह्मां-

स नेहमीं गाड्या घोडे व जाणारे येणारे लोक पहावयास व चाकांची चाललेली घरघर ऐकावयास मिळते. दुसरें ह्मणतें, छे, तुमच्यापेक्षां आमचें चांगलें; कारण त्याच्याजवळ एक रान आहे. त्यामध्यें आमच्याखेरीज दुसरें कोणी जात नाहीं. तेथें खारी भराभर झाडांवर चढतांना आमच्या दृष्टीस पडतात, व रानखबुतरांचे घुमणारे शब्द आमच्या कानीं येत असतात. इतक्यांत एक कोळ्याचें मूल पुढें येऊन ह्मणतें; नाहीं, तुमच्यापेक्षां आमचेंच घर चागलें, कारण तेथून समुद्र अगदीं जवळ आहे, आणि त्यांतून जाणारी येणारीं सर्व गलबतें आह्मांस पहावयास मिळतात. शेवटीं एक गरीब मजुराचें मूल पुढें येऊन ह्मणतें, भलतेंच, त्या समुद्रांत काय आहे! आमच्या मागील दारीं एक छानदार डबकण आहे; त्यामध्यें आह्मीं आपल्या कागदाच्या होड्या फिरवितों, डुंबून आंघोळी करितों, आणि काय काय मजा करितों.

एक लहान मुलगी पुढें होऊन ह्मणते, आमच्या बाबाच्या घरासारखें तर कुणाचेंच घर नाहीं. त्यावर त्यानें आगाशी काढली आहे. तिच्याजवळच एक लहान मुलगी होती ती ह्मणते, भलतेंच! आमच्या बाबाच्या घराची सर तर कोणत्याच घराला यायची नाहीं. त्यावर तर त्यानें मोठें कर्ज काढिलें आहे! तिला कर्ज ह्मणजे काय हें माहीत नव्हतें, परंतु आपल्या बापानें घरावर कर्ज काढिलें आहे असें तिनें

नुसतें ऐकिलें होतें; व बाबा जें करितो तें कांहीं तरी चांगलेंच करितो अशी तिची नेहमीं समजूत असे. ज्याप्रमाणें अमेरिकन लोकांना आपलें राष्ट्रीय कर्ज वाढलें ह्या गोष्टीची प्रतिष्ठा वाटत असे, तशाच प्रकारची ह्या मुलीचीही ही प्रतिष्ठा होती. हिंदुस्थान, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि ग्रीनलन्ड ह्या प्रत्येक देशांतील लोक जर आपापला देश सर्वांत उत्तम असें ह्मणूं लागले, तर त्यांचें तें ह्मणणें आपापल्या घरांची प्रतिष्ठा मारणाऱ्या या मुलांच्या ह्मणण्याप्रमाणेंच होणार आहे.

एकदां कांहीं अमेरिकन खलाशांना ग्रीनलंड बेटांतील एक मनुष्य आर्टिक महासागराच्या किनाऱ्यावर आढळला. तो एका बर्फाच्या झोपडींत रहात असे, हरणाची कातडी पांघरीत असे, व नुसते मासे खाऊन आपला उदरनिर्वाह करीत असे. तिकडे हिंवाळ्यामध्यें कित्येक आठवडेपर्यंत एकसारखी रात्रच असते, व त्या अंधारामध्यें त्याच्या खोलींत एक माशाच्या तेलाचा टिकटिक जळणारा दिवा व बाहेर आरोराबोरिआलिस नांवाच्या तेजाचा अंधुक प्रकाश एवढाच काय तो उजेड असे. पुढें हिंवाळा जाऊन वसंतऋतु प्राप्त झाला, तरी तिकडे झाडें पानांनीं व फुलांनीं, व मैदानें हिरव्या चार गवतानें सुशोभित दिसत नाहींत. सर्व कांहीं पूर्वीप्रमाणें रुक्ष आणि ओसाडच दिसतें.

परंतु ग्रीनलन्डांतील त्या मनुष्यास तो आपला

देश फार प्रिय वाटत असे, आणि तो असें ह्मणे कीं, असा रमणीय देश जगाच्या दुसऱ्या कोणत्याही भागामध्यें सांपडावयाचा नाहीं. त्या खलाशांनीं त्या मनुष्यास आपल्यावरोबर आग्रहानें दक्षिणेकडील ऊष्ण प्रदेशांत आणिलें. ह्या दक्षिण प्रदेशामध्यें चांगलीं हिरवींगार शेतें होतीं, झाडें पानांनीं व फुलांनीं नेहमीं भरलेलीं होतीं, दर दिवस सूर्याचा प्रकाश मिळत होता, व निरनिराळ्या प्रकारचे सुंदर प्राणी नजरेस पडत होते. परंतु तेथें त्यास कांहीं केल्यानें चैन पडेना; व त्यानें त्या खलाशांस मला माझ्या मुलखास परत घेऊन चला, असें सांगितलें. त्यांनीं त्याच्या सांगण्याप्रमाणें उत्तरेस जाणाऱ्या गलबतांतून त्यास रवाना केलें. त्या गलबतावरील खलाशांस उजाडल्यावरोबर त्याचा पहिला प्रश्न असा असे कीं, "बर्फ दिसायला लागलें काय?" शेवटीं जेव्हां तें गलबत एकदां आर्टिक महासागराच्या किनाऱ्यास येऊन त्याचे त्या बर्फाळ प्रदेशाला पाय लागले, तेव्हां तो पूर्वींप्रमाणें आनंदी दिसूं लागला.

ह्यावरून तुमच्या असें लक्षांत येईल कीं, ज्या गोष्टींमुळें आपला देश दुसऱ्यास नकोसा वाटतो, त्याच गोष्टींमुळें तो आपणांस कदाचित् हवासा वाटत असेल; आणि आपल्या देशाचा आपणांस अभिमान वाटतो ह्यावरून तो देश इतर देशांपेक्षां चांगलाच आहे, असें बिलकूल मानितां येत नाहीं. ह्यास्तव देशाभिमानाच्या तरी दोन जाती आहेत.

एक खरा आणि रास्त देशाभिमान, आणि दुसरा वेडगळ आणि खोटा देशाभिमान. खरा देशाभिमानी पुरुष इतर राष्ट्रांचे गुण कबूल करितो, आणि वेडगळ आणि खोट्या देशाभिमानी पुरुषाला आपल्या देशांतील तेवढ्या गोष्टी चांगल्या असें कोत्या दुराग्रहानें वाटत असतें.

खऱ्या देशाभिमानी पुरुषाला आपापल्या देशाच्या हिताची मोठी कळकळ असते. आजपर्यंत शेंकडों खऱ्या देशाभिमानी पुरुषांनीं स्वदेशाकरितां आपले प्राण खर्ची घातले आहेत; व अशा रीतीनें मरणें हेंच खरें शौर्य, अशी सर्व लोकांची समजूत आहे. खऱ्या देशाभिमानी पुरुषाची आपल्या देशावर प्रीति असते, आणि ह्मणून त्याचे दोष त्याच्या चटकन लक्षांत येऊन तो ते नाहींतसे करण्याकरितां किंवा सुधारण्याकरितां आपल्याकडून एकसारखा झटत असतो. ज्या आईबापांना आपल्या मुलांची खरी काळजी असते त्या आईबापांना आपल्या मुलांच्या हातून कांहीं अपराध झाला तर त्याचें फार वाईट वाटतें, आणि त्यांच्या मनांत आपल्या मुलांचे नेहमीं अवगुण उभे राहून तीं ते सुधारण्याचा प्रयत्न करीत असतात. खऱ्या देशाभिमानी पुरुषाची वृत्ति आपल्या देशाच्या संबंधानें अशाच प्रकारची असते. त्याच्या लक्षांत इतर देशांतील घेण्यासारख्या गोष्टी लवकर येतात; आणि परदेशांतील रीतीभाती, कलाकौशल्य वगैरे जें कांहीं त्याला चांगलें वाटेल तें तो आपल्या

देशामध्यें आणण्यास सतत तयार असतो. ह्यास्तव तो आपला देश आणि इतर देश ह्यांच्या दरम्यान दळणवळण चालण्यास ज्या कांहीं हरकती असतील त्या काढून टाकण्यास तयार होतो. त्याला आपल्या देशाचा अभिमान वाटतो. ह्याचें कारण त्या देशाचा विस्तार मोठा आहे किंवा सैन्य अफाट आहे हें नव्हे, तर त्याच्या अभिमानाचें कारण आपल्या देशाच्या हातून चांगलीं कामें होत आहेत व त्यामध्यें इतर देशांतील लोकांस सुशिक्षित, नीतिमान् आणि सुखी करण्याचीं साधनें आहेत हेंच असतें. ज्या पुरुषाला खरा देशाभिमान नाहीं तो पुरुष आपल्या देशाच्या संबंधानें विनाकारण बढाया मारीत असतो. ज्याप्रमाणें वेडगळ आईबापांना आपलीं मुलें इतरांच्या मुलांपेक्षां अधिक चांगलीं आणि अधिक सुंदर वाटतात, त्याप्रमाणेंच ह्या पुरुषाला आपला देश इतर देशांपेक्षां अधिक चांगला वाटतो, दुसरें कांहीं नाहीं.

खरा देशाभिमान इतर देशांचें हित चिंतण्याच्या कामीं आह्मांस आडवा येतो असें नाहीं. आमची आपल्या घरांतील माणसांवर प्रीति असली ह्मणजे ती आपणांस शेजाऱ्यापाजाऱ्यांचें किंवा इतर लोकांचें हित चिंतूं देत नाहीं असें नाहीं. प्रीति हा मनोभाव आपणांमध्यें घरांतील माणसांविषयीं प्रथमतः उत्पन्न होतो खरा, परंतु जसजसे आह्मी वाढत जातों तसतसा तोही वाढत जाऊन, ज्या ज्या

मनुष्याशीं आपला परिचय होतो, त्या त्या विषयीं आपणांस ममता आणि कळवळा येऊं लागतो. तेव्हां प्रीति हा मनोविकार आपल्या देशाच्या हद्दीच्या आंतच राहिला पाहिजे असें नाहीं; व तो तसा रहातही नाहीं. आपली ओळख जसजशी वाढत जाते, तसतसा तोही वाढत जातो. आपली प्रीति अशा रीतीनें वाढत गेली ह्मणजे आपणांस ह्या भूतलावरील सर्व मानवी प्राणी आपलीं बहीणभावंडें आहेत असें वाटूं लागतें.

मनुष्य आपल्या गांवाच्या किंवा शहराच्या संबंधानें आपलें कर्तव्य करीत गेला ह्मणजे त्याच्या आंगीं आपल्या देशाच्या किंवा संपूर्ण जगाच्या संबंधानें आपलें कर्तव्य बजाविण्याची योग्यता सहजीं येते.

---

## अनिष्ट टाळण्यास इष्ट उपाय.

जर एखाद्या कुटुंबामध्यें पुष्कळ मुलें असलीं तर तीं सर्वच नेहमीं योग्य रीतीनें वागतात असें नाहीं. त्यांपैकीं कांहीं हट्टी असतात, कांहीं आपलपोटीं असतात, कांहीं अशक्त व चिरडखोर असतात, व कांहीं अगदीं लहान असल्यामुळें त्यांस बरेंवाईट समजत नाहीं. हीं सर्व मुलें खोड्या करून घरांतील माणसांस त्रास देतील. परंतु त्याबद्दल त्या सर्वांस सारखे दोषी मानणें योग्य होणार नाहीं.

एक लहान दोन तीन वर्षांचें मूल आपल्या घरच्या दिवाणखान्यामध्यें एका गोटीशीं खेळत होतें. तें इकडे तिकडे गोटी उडवीत असतां, ती गोटी एका खिडकीवर जोरानें आदळून तिची कांच फुटली. त्याबद्दल त्या मुलाला शिक्षा करावी किंवा नुसतें बोलावें असेंही कोणाच्या मनांत आलें नाहीं. दाईनें मुल खेळत असतांना आपण त्याच्यावर नजर ठेविली नाहीं, ही आपली चूक झाली असें कबूल केलें; व तिनें पुढें तें मूल दिवाणखान्यांत खेळत असतां पुन्हां त्याच्या हातीं जड गोटी न देण्याचा बंदोबस्त ठेविला.

एक दहा वर्षांचा मुलगा आपली गोफण घेऊन रस्त्यावर गेला, आणि ती कशी काय चालते हें पाहण्याकरितां तिनें धोंडे फेकूं लागला. रस्त्यांतून लोक जात येत होतेच. त्याचा बाप त्याबद्दल त्यास रागें भरला. कारण रस्त्यावर जर असे धोंडे उडविले, तर ते जाणाऱ्या येणाऱ्या लोकांस लागण्याचा संभव आहे, इतकें समजण्यापुरता तो मुलगा जाणता होता. परंतु तो स्वच्छंदी व फाजील असल्यामुळें पुन्हां रस्त्यावर गेला आणि गोफणीनें धोंडे मारूं लागला. ह्या वेळीं एक तरुण मनुष्य त्या रस्त्यानें जात होता व एक धोंडा त्याच्या डोळ्यावर जोरानें बसून त्या डोळ्यानें तो जन्माचा आंधळा झाला.

आतां हा जर मुलगा स्वभावानें चांगला असता, तर त्याजला आपण त्या तरुण मनुष्याच्या डोळ्यास

जी भयंकर दुखापत केली तिजबद्दल वाईट वाटलें असतें; व तेवढीच शिक्षा त्याजला पुरे आहे असें समजून, त्यास त्याच्या हातून झालेल्या चुकीबद्दल क्षमा करण्यासही हरकत नव्हती. आपण एका तरुण मनुष्यास आपल्या चुकीनें जन्माचें आंधळें करून टाकिलें, ही गोष्ट त्याच्या ध्यानांत पक्की राहिली असती, आणि पुन्हां तो आपल्या हातून अशी चुका न होऊं देण्याविषयीं चांगली खबरदारी ठेवता. अशा मुलास शिक्षा करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. अशा प्रसंगीं शिक्षा केल्यानें विनाकारण दुःखास भर घातल्यासारखें होईल. परंतु हा मुलगा अगदीं स्वच्छंदी व निष्काळजी होता. आणि तो पुन्हां गोफणीनें असेच धोंडे उडवून लोकांस दुखापती करण्यास चुकावयाचा नाहीं, ही गोष्ट त्याचा बाप पक्की समजून होता. ह्यास्तव त्याच्या बापानें त्यास झालेल्या अपराधाबद्दल अशी चांगली कडक शिक्षा केली कीं, तिची त्याला जन्माची आठवण राहून त्याच्या हातून तशा प्रकारची चूक पुन्हां कधींच झाली नाहीं.

ह्याप्रमाणें त्या मुलास शिक्षा झाली हें अगदीं योग्यच झालें, असें ह्मटलें पाहिजे. कारण अशा मुलास शिक्षा करणें ह्मणजे दुसऱ्यांवर दया आणि न्याय करणें आहे. कारण त्या शिक्षेच्या योगानें त्यांस पुढें अशी दुखापत होण्याची बंदी झाली. बरें, ह्या मुलाला तो गुन्हा जर माफ करण्यांत आला

असता, तर तसें करणें इतरांच्या संबंधानें अन्यायाचें आणि निर्दयपणाचें झालें असतें. कारण त्या मार्फीनें तो मुलगा जास्तच निष्काळजी व खोडकर होऊन लोकांस अधिकच दुखापती करीत सुटता.

त्या मुलास शिक्षा झाली तेंच योग्य झालें, असें आह्मी ह्मणतों, ह्यास दुसरेंही एक कारण आहे. असा अपराध करूनही कांहीं शिक्षा होत नाहीं, असें जर इतर खोडकर मुलांस कळून आलें असतें, तर तेही गोफणीनें धोंडे उडविण्याच्या संबंधानें जास्तच निष्काळजी झाले असते; आणि त्यांच्यापासून शेजाऱ्यापाजाऱ्यांस मोठाच त्रास झाला असता. ह्या लहानशा गोष्टीवरून शिक्षा ह्मणजे काय, व ती कशाकरितां करावयाची हें आपल्या चांगलें लक्षांत येतें. शिक्षा ह्मणजे झालेल्या अपराधाचा सूड घेणें नव्हे. अपराध एकदां झाला तो झालाच. तो कधीं परत यावयाचा नाहीं. अपराध्यास शिक्षा करावयाची ती एवढ्याचकरितां कीं, पुढें त्याच्या किंवा इतरांच्या हातून तशा प्रकारचा अपराध पुन्हां कधीं होऊं नये. अपराधाची पुनरावृत्ति होऊं न देण्याकरितां जेवढ्या शिक्षेची आवश्यकता आहे, तिच्यापेक्षां जर आपण जास्त शिक्षा करूं, तर तो निर्दयपणा होय. त्या कामाकरितां जितक्या शिक्षेची आवश्यकता आहे, तिच्यापेक्षां कमी शिक्षा केली, तर तो इतरांच्या संबंधानें अन्याय होतो.

तेव्हां कुटुंबाच्या किंवा राष्ट्राच्या शास्त्याचें असें

कर्तव्य ठरतें कीं, त्यानें अपराध्यास शिक्षा करावयाची ती अशी करावी कीं, ती होतां होईल तितकी हलकी असून तिच्यायोगानें अपराध व गुन्हे होण्याचें मान साधेल तितकें कमी व्हावें.

कुटुंबांतील माणसें किंवा मित्र ह्यांच्यामध्यें आपसांत जे लहानसहान अपराध घडून येत असतात, ते बहुतेक उतावळ्या स्वभावामुळें घडून येत असतात, आणि त्याबद्दल शिक्षा होण्याचेंही कारण नाहीं. ते अपराध झाल्याबद्दल आह्मांस वाईट वाटतें, व त्यासंबंधानें आह्मीं मनामध्यें कांहीं ठेवीत नाहीं इतकेंच नव्हे, तर एकास झालेलें दुःख व दुसऱ्यानें दाखविलेलें क्षमाशीलत्व ह्यांच्या योगानें परस्परांतील प्रेम वृद्धिंगत होत जातें.

पुढें गोडा होण्याकरितां आधीं आपण भांडावें असें नाहीं; परंतु कडूपणाचा परिणाम कधीं कधीं गोड होतो, व सहजीं आलेल्या भांडणरूपी ढगांतूनही शीतळ पर्जन्यवृष्टि होऊन संसारयात्रारूपी वृक्षास चांगला धजाव व टवटवी येते हा विचार मनामध्यें आला ह्मणजे एक प्रकारचें समाधान वाटतें. ही एक विशेष गोष्ट सर्वांनीं लक्षांत घेण्यासारखी आहे.

आमच्यामध्यें एकही इतका सुज्ञ आणि परिपूर्ण मनुष्य मिळावयाचा नाहीं कीं त्याच्या हातून अपराध मिळून कधीं व्हावयाचाच नाहीं. आपला जर कोणी अपराध केला, तर त्याबद्दल सूड घेण्यापेक्षां क्षमा करणेंच बरें. कारण होतां होईल तितकें जगां-

तील अनिष्ट कमी करणें व चुकांची दुरुस्ती करणें ह्या गोष्टींकडेच आपली नजर असली पाहिजे. कोणीं एखाद्यानें आपलें कांहीं नुकसान केलें म्हणून जर परत आपण त्याचें नुकसान केलें, तर आपण जगांतील अनिष्ट द्विगुणित करितों; परंतु आपण जर त्याला त्याबद्दल क्षमा केली, तर आमच्या क्षमाशीलत्वानें त्यास केलेल्या नुकसानाबद्दल वाईट वाटून तो तें भरून देण्याच्या उद्योगास लागेल; तो आमचें हित करण्याची संधि साधील; आणि आम्हीही त्याचें परत आपल्याकडून हित करीत जाऊं. ह्याप्रमाणें जगांतील इष्ट वाढत जाऊन मूळच्या दुष्ट कृत्यांपासूनही मित्रत्व निष्पन्न होऊं लागेल.

केलेल्या अपराधाबद्दल एका मनुष्यानें दुसऱ्यास क्षमा करावी, व दुसऱ्यानें तें स्मरून त्याच्याशीं प्रेमभावानें वागावें अशीं पुष्कळ उदाहरणें घडून येतात. ह्यावरून एका गालावर मारलें तर दुसरा गाल पुढें करावा, अशी जी लोकांमध्यें म्हण आहे, ती किती शहाणपणाची आणि खरी आहे, हें आपल्या स्पष्टपणें लक्षांत येईल. जगाच्या ज्या स्थितीमध्यें शिक्षेची आवश्यकता रहाणार, जींमध्यें दया, सद्वासना, व क्षमा ह्यांच्याच योगानें अनिष्ट टाळलें जाऊन इष्ट प्राप्त होईल, आणि जींमध्यें मुलें, मोठीं माणसें आणि राष्ट्रें ह्यांमधील भांडणें उभय पक्षांकडून प्रारंभींच सौजन्य व शहाणपण प्रकट करण्यांत येऊन बंद केलीं जातील, तीच स्थिति आमच्या मतें उत्तम होय.

परंतु आमची सांप्रतची स्थिति ह्या स्थितीहून निराळी आहे. सर्व अपराध्यांस एकसारखी माफीच मिळत गेली तर दुष्ट लोकांची पोळी पिकून ते सुष्ट लोकांस सुखानें नांदूं देणार नाहींत. न्यायी व शहाणें सरकार ज्या गुन्ह्यांमध्यें दया दाखविली असतां खात्रीनें अनिष्ट बंद होईल असें असतें त्या गुन्ह्यांमध्यें दया दाखवितें; आणि ज्या गुन्ह्यांमध्यें गुन्हेगारास ताळ्यावर आणण्याकरितां किंवा इतरांस सावध करण्याकरितां शिक्षेची आवश्यकता आहे त्यांमध्यें मात्र तें शिक्षा करतें.

---

## अनिष्ट टाळण्यास इष्ट उपाय.

लहान मुलानें दिवाणखान्यांतील खिडकीची कांच फोडली असतां त्याला ज्याप्रमाणें शिक्षा करणें योग्य नाहीं, त्याप्रमाणें मोठ्या वयाच्या मनुष्यांमध्यें कांहीं अशीं मनुष्यें असतात कीं, त्यांना त्यांनीं केलेल्या अपराधांबद्दल शिक्षा करणें योग्य नाहीं. अशा प्रकारचीं मनुष्यें ह्मटलीं ह्मणजे वेडीं व भ्रमिष्ट मनुष्यें. त्यांना बरें वाईट कांहीं समजत नाहीं. त्यांच्या हातून स्वतांस किंवा इतरांस कांहीं इजा होऊं नये ह्मणून आपण त्यांस आश्रयस्थानामध्यें किंवा घरीं कोंडून ठेवून त्यांस नेहमीं मोठ्या दयेनें वागवितों. त्यांच्यावर दया करणें ह्मणजे प्रत्येक मनुष्यावर दया करण्यासारखें आहे,

कारण त्यांच्यावर जितकी आपण जास्त दया करूं तितक्या त्यांच्या हातून कमी खोड्या होतील.

दुसरे असेही कांहीं लोक आहेत कीं, ते आपल्या अनियमित वर्तनानें आपणास खुळे किंवा वेडे करून घेतात, व ज्यांना मादक पदार्थांच्या यथेच्छ सेवनानें आपल्या कृत्यांवर दाब ठेवितां येत नाहीं, ह्या लोकांस मादक पदार्थांच्या झिंगीमध्यें केलेल्या गुन्ह्यांबद्दल कडक शिक्षाच झाली पाहिजे. ही शिक्षा करावयाची ती दोन गोष्टींसाठीं;—त्यांनीं पुन्हां झिंगून बेशुद्ध होऊं नये, व इतरांनींही आपणांस कधीं त्या स्थितीस न आणण्याची खबरदारी ठेवावी.

दारूबाजावर दया करणें ह्मणजे व्यवस्थित व निरुपद्रवी लोकांवर जुलूम आणि अन्याय करणें आहे. एखाद्या मनुष्याला जर दारू पिण्याचें व्यसनच लागलें असेल, तर त्याला इतर वेडे लोकांप्रमाणें आश्रयस्थानांतच पाठविलें पाहिजे. परंतु दारूबाज मनुष्यास ममतेनें वागवून किंवा त्यास चांगलें वळण लावून जर आपण बेतावर आणूं, तर तें त्यास व एकंदर समाजास जास्त हितकारक आहे.

कांहीं मुलांच्या हातून मोठमाठे अन्याय व अपराध होत असतात. परंतु त्यांनाही त्यांबद्दल शिक्षा करणें रास्त नाहीं. हीं मुलें ह्मटलीं ह्मणजे भिकार आईबापांचीं मुलें. ह्या मुलांस त्यांच्या आईबापांनींच चोरी करून, भीक मागून, लोकांस फसवून,

मराठी ग्रंथ संग्रहालय.



किंवा अशाच कांहीं निंद्य मार्गानें आपलें पोट भरण्याचें शिकविलेलें असतें. त्यांना कोठें घरदार नसतें, व तीं आपल्या आईबापांप्रमाणेंच एखाद्या शहरामध्यें इकडे तिकडे भटकून लोकांस पीडा देऊन सरासरी आपला काळ काढून घेत असतात.

अशा मुलांस बरेंवाईट कळूं लागण्यापूर्वीं शिक्षा करणें निरुपयोगी आहे. त्यांच्या मनांत प्रथमतः सदसद्विचारबुद्धि जागृत केली पाहिजे, व त्यांस सदाचारानें व प्रामाणिकपणानें वागणें दुराचारानें व अप्रामाणिकपणानें वागण्यापेक्षां चांगलें हें समजावून दिलें पाहिजे. ह्यास्तव त्यांना आम्हीं ममतेनें वागवितों, व त्यांकरितां शाळा व शासनालयें घालितों. येथें त्यांस सुशिक्षण मिळून तीं चांगल्या मार्गास लागण्याचा संभव असतो. अशा मुलांवर दया करणें ह्मणजे इतर प्रत्येक माणसावर दया करण्यासारखें आहे; कारण तरुण खोडकर मुलांस पुढें दुर्गुणाचे पक्के पुतळे बनूं न देण्यास ह्याच्यासारखा दुसरा उपाय नाहीं.

जे पहिल्यानेंच अपराध करितात, किंवा ज्यांना लहान वयामुळें कांहीं समजत नाहीं, अशांवर न्यायाधीश खुषीनें मेहेर नजर करण्यास तयार असतो. समाजास पीडा देणाऱ्या लोकांस कैदेंत ठेवण्याकरितां जे तुरुंग ठेविलेले आहेत, त्यांमध्यें कैद्यांस सुशिक्षण मिळण्याची सोय असली पाहिजे, व त्यांपैकीं गुन्हे करकरून अगदीं लाजकोडग्या बन-

लेल्या मनुष्यासही आपलें वर्तन सुधारून चांगल्या मार्गास लागण्याची संधि मिळाली पाहिजे. परंतु मागाहून उपाय करण्यापेक्षां रोग पहिल्यानेंच न होऊं देण्याची तजवीज करणें अधिक इष्ट आहे, आणि ह्मणून शाळा उत्तम तुरुंगांपेक्षांही चांगल्या होत.

समाजामध्यें असेही कांहीं लोक आढळून येतात कीं, ज्यांना केवळ गुन्हेगार तर ह्मणतां येत नाहीं, परंतु ज्यांच्यापासून लोकांस मोठा उपद्रव होतो. हे लोक कोणते ह्मणाल तर शहरांत भीक मागत फिरणारे, आळशी, निरुद्योगी, व व्यसनी लोक. हे लोक नेहमीं भिकारीच रहातात. कारण श्रम करून आपल्या पोटाची तजवीज ते कधीं करीत नाहींत, व खुशाल भीक मागून आपला चरितार्थ चालवितात. अशा लोकांवर दया करणें, किंवा त्यांस भिक्षा घालणें ह्मणजे स्वतां मेहनत करून आपली आपण तजवीज पाहणाऱ्या उद्योगी लोकांच्या संबंधानें अन्याय करणें आहे. कारण त्याच्या योगानें लोकाच्या आळसास उत्तेजन मिळतें. ह्या भिकारी लोकांचा वर्ग ह्मणजे समाजावर एक प्रकारचें जबरदस्त ओझेंच आहे; कारण ‘ खायला काळ आणि भुईला भार ’ ह्यापलीकडे त्यांचा कांहीं एक उपयोग नाहीं; आणि आळशी व निरुद्योगी लोक बहुधा वाईट चालीचे व खोडकर असतात असें आह्मीं पूर्वींच्या भागामध्यें सांगितलेंच आहे.

पात्रापात्र विचार करून जो धर्म करणें तोच खरा धर्म होय. जे लोक क्लेशांत आहेत त्यांच्याविषयीं कळवळा बाळगणें, त्यांच्यावर दया करणें, व ज्या लोकांस मदत करणें योग्य आहे अशा लोकांस मदत करणें हा खरा धर्म नव्हे असें कोण ह्मणेल ? परंतु जे स्वतां कांहीं एक न करितां नेहमीं दुसऱ्यावर अवलंबूं इच्छितात अशा लोकांस मदत करणें ह्मणजे अधर्म होय असें ह्मटलें तरी चालेल. लोकांस चांगलें शिक्षण मिळून आळसामध्यें दिवस काढून भिक्षा मागण्यापेक्षां स्वतां श्रम करून प्रत्येकानें आपल्या पोटाची तजवीज करणें अधिक चांगलें हें त्यांस कळूं लागलें ह्मणजे ह्या निरुपद्रवी आणि त्रासदायक लोकांचा वर्ग हळू हळू आपोआप कमी होत जाईल.

सर्वांवर न्यायदृष्टि व दयादृष्टि करावयाची ह्मणजे कांहींस शिक्षा व कांहींस क्षमा केली पाहिजे. हें कसें तें स्पष्टपणें लक्षांत येण्याकरितां येथें एक उदाहरण देतों.

एक रामचंद्रपंत नांवाचा मोठा न्यायी आणि दयाळू कारखानदार होता. त्याचा कारकून कारखान्यांतील लोकांस दर शनिवारीं संध्याकाळीं आठवड्याचा रोजमुरा चुकवून देत असे. त्या कारकुनानें एका शनिवारीं संध्याकाळीं आपल्या धन्यास असें जाहीर केलें कीं, कोणी एक लक्ष्मण नांवाचा इमानी आणि मेहनती कामगार गेल्या आठवड्यामध्यें तीन

दिवस कामावर आला नव्हता, व ह्मणून त्याचा तीस दिवसांचा रोजमुरा त्याच्या पगाराच्या रकमेंतून कापून घेतला पाहिजे. रामचंद्रपंतानें तो कां गैरहजर होता, असें कारकुनास विचारिलें. कारकून ह्मणाला, तो आजारी आहे. वाफेच्या यंत्राजवळ काम करून आंगाची आग झाली कीं तो थंड हवेवर जाऊन पडत असे व त्यामुळें आतां त्याचे सांधे धरले आहेत. रामचंद्रपंत ह्मणाला, अरेरे, बिचारा! त्याला भरआठवड्याचा पगार देऊन आणखीही कांहीं औषधपाण्याकरितां जास्त द्या. तो फार प्रामाणिक मनुष्य आहे, व तो बरा झाल्याबरोबर आपल्या कामावर येईल अशी माझी खात्री आहे.

त्या कारकुनास दुसऱ्या शनिवारीं एका सदू नांवाच्या मजुराच्या गैरहजिरीची हकीगत आपल्या धन्याच्या कानांवर घालणें भाग पडलें. धन्यानें विचारिलें, सदू कामावर कां नाहीं आला? कारकुनानें उत्तर दिलें, मी आंव वायूनें आजारी आहें असा त्यानें निरोप पाठविला आहे. धन्यानें विचारलें तो खरोखर आजारी आहे काय? कारकून ह्मणाला नाहीं, तो नेहमीं नाटकें तमाशे पहावयास जात असतो, व अलीकडे त्याला दारू पिण्याचेंही व्यसन लागलें आहे. शिवाय तो एकाजवळ असें ह्मणत होता कीं, ज्याप्रमाणें लक्ष्मणास कामावर न जातां एक आठवड्याचा

पगार मिळाला त्याप्रमाणें घरीं बसून पगार काढण्याची मीही युक्ति करून पहाणार आहें. धनी ह्मणाला, तर मग त्याला एकदम कामावरून दूर करा, असा एक मनुष्य कारखान्यांत असला तरी तो इतरां सर्वांस बिघडवून टाकण्यास पुरे आहे.

सदूला जर त्याच्या लबाडीबद्दल शिक्षा झाली नसती, तर कारखान्यांतील सर्व इमानी मजुरांच्या संबंधानें अन्याय झाला असता.

यावरून इतकें स्पष्ट होतें कीं, न्यायबुद्धि व दया यांचा सतत मिलाफ असला पाहिजे. जेथें क्षमाशीलत्वाच्या सौम्य उपायांनीं अनिष्टाचा प्रतिकार होण्याचा संभव नाहीं, तेथें अन्याय टाळला जाण्याकरितां शिक्षेच्या उग्र उपायांचीच योजना झाली पाहिजे. ह्याप्रमाणें दयेची आवड आणि आपल्या हातून अन्याय न होऊं देण्याचा निग्रह हे गुण मनुष्यमात्रास अत्यंत महत्वाचे आहेत.

लोकांच्या हातून चुकीनें किंवा मुर्खपणानें जीं अनिष्टें होतात, त्यांना नैतिक अनिष्टें ह्मणतात. परंतु दुसरीं अशींही कांहीं अनिष्टें आहेत कीं, जीं ज्या जगामध्यें आह्मी राहतों त्यामध्यें नैसर्गिकच आहेत. ह्यांना नैसर्गिक अनिष्टें ह्मणतात. उदाहरणार्थ, क्लेश, रोग, व आप, तेज, वायु इत्यादि पंचमहाभूतांच्या शक्तींच्या अतिरेकानें होणारीं अनिष्टें. जो अग्नि आह्मांस उबारा देतो, तोच आह्मांस जाळून टाकील; जें पाणी आह्मांस तजेतवानें व स्वच्छ

करितें, तेंच पाणी आह्मांस बुडवूं शकेल; व जी हवा आमच्या जीविताचें रक्षण करिते, तीच हवा स्पर्शजन्य रोगाचें बीज इकडे तिकडे पसरूं किंवा भयंकर वादळें उत्पन्न करूं शकेल.

ह्या नैसर्गिक अरिष्टांपैकीं बरींच अरिष्टें आह्मांस आपल्या शहाणपणानें किंवा दूरदृष्टीनें टाळतां येतात. विस्तवाच्या योगानें आह्मांस उबारा मिळून जोपर्यंत सुख होत असतें, तोंपर्यंत त्याची उष्णता आमच्या शरिरास हितकर आहे; परंतु त्या उष्णतेच्या योगानें आमच्या शरिराची त्वचा भाजून जळूं लागली ह्मणजे जी वेदना होऊं लागते ती वेदना आह्मांस भावी अरिष्टाची सूचना देत आहे असें समजावें. ही वेदना आह्मांस भावी अरिष्टाविषयीं सावध करणारा एक स्वाभाविक पहारेकरीच आहे. जें अन्न आमच्या शरिरप्रकृतीस मानतें, तें खातांना आह्मांस आनंद वाटतो; परंतु ज्यापासून आमच्या शरिरास अपाय होण्याचा किंवा आह्मांस दुखणेंबाणें येण्याचा संभव आहे, तें खातांनाच आह्मांस दुःख होऊं लागतें; व हें दुःख पुढें होणाऱ्या इजेचें ज्ञापक होय.

मनुष्य टक्केटोणपे खाऊनच शहाणा होतो, असें जें ह्मणतात, तें अगदीं खरें आहे. आपणांवर येणारे प्रसंग व संकटें हीं आपल्या मानसिक शक्तींस चांगलें चलन देतात. कारण ते प्रसंग व तीं संकटें आह्मांस त्यांच्याशीं सतत जोरानें ठक्कर देऊनच टाळावयाचीं असतात. ज्या सद्गुणांचें आह्मांस अत्यंत महत्व वा-

टतें, त्या सर्वांची उत्पत्ति संकटापासूनच आहे. आह्मांवर जर कधीं संकटेंच आलीं नाहींत, तर आह्मीं शूर आणि धीट व्हावें कसें? आह्मांस अडचणी सोसाव्या लागल्या नाहींत, तर आमच्या आगीं सहनशीलता यावी कशी? संकटापासून आपलें रक्षण व्हावें, रोगाचें निवारण व्हावें व प्रत्यक्ष अनिष्ट टाळले जावें ह्मणून जर ज्ञान संपादन करून नवीन शोध व नवीन कल्पना काढण्याची आह्मांस गरज पडली नसती, तर आमच्या मानसिक शक्ती कशा विकास पावत जात्या?

वालेस नांवाचा एक विद्वान आपल्या 'मलायाद्वीपसमूह' नांवाच्या पुस्तकामध्यें असें सांगतो कीं, न्यूगिनी बेटामध्यें जे कांगरू नांवाचे प्राणी आहेत, त्यांना इतर देशांतील कांगरू प्राण्यांप्रमाणें उड्या मारितां किंवा झाडांवर चढतां येत नाहीं. ह्याचें कारण तो असें सांगतो कीं, न्यूगिनी बेटामध्यें क्रूर वनपशु नाहींत, व तेथें कांगरूंना शत्रूंपासून आपलें रक्षण करण्याकरितां भराभर झाडांवर चढावें लागत नाहीं.

आमच्या आयुष्यक्रमणाच्या मार्गामध्यें जर संकटरूपी सिंह नसतील, तर आमच्या मानसिक शक्तींची वाढ बंद होऊन त्या केव्हांच खुरटून जातील. तर मग ही नैसर्गिक अरिष्टें पर्यायानें कांहीं अशीं आह्मांस हितकरच आहेत. जगांतील अनिष्ट व दुःख होतां होईल तितकें कमी करणें हें आह्मांपैकीं

प्रत्येकाचें कर्तव्य आहे; व अनिष्ट टाळण्याचा प्रयत्न करितांनाच आपल्या हातून इष्ट उत्पन्न होत असतें ही गोष्ट मनामध्यें आणून सर्वांनीं आपलें तें कर्तव्य बजाविण्यास आनंदानें तयार असलें पाहिजे.

---

## आमच्या सत्कृत्यांचें अजरामरत्व.

एखाद्या तळ्यामध्यें धोंडा टाकिला असतां पाण्याच्या पृष्ठभागावर एकामागून एक कशीं वर्तुळें उत्पन्न होतात, तीं हळू हळू मोठीं होत जाऊन शेवटीं तीं त्या तळ्याच्या कांठाला कशीं जाऊन पोहोंचतात, आणि तीं अशा रीतीनें जेथपर्यंत तें पाणी पसरलेलें आहे तेथपर्यंत त्या धोंड्याच्या आघाताचा परिणाम कसा पोहोंचवितात, हें सर्व तुमच्या पाहण्यांत आलें असेल. त्याचप्रमाणें आह्मी जीं कृत्यें करितों त्यांचें परिणाम आमच्या आयुष्यरूपी वर्तुलाच्या आकुंचित मर्यादेपलीकडे जाऊन कालरूपी महासागराच्या अति दूरच्या पैलतिरास जाऊन पोहोंचतात. ह्याप्रमाणें आमच्या पूर्वीं अति प्राचीन काळीं जीं मनुष्यें होऊन गेलीं त्यांच्या उदार सत्कृत्यांचें उदाहरण पाहून आह्मांस आपलें वर्तन सुधारतां येतें; व जे लोक आमच्या पश्चात् ह्या जगामध्यें रहातील त्यांना जे लोक हल्लीं जगामध्यें रहात आहेत त्यांचीं सत्कृत्यें आणि सद्विचार ह्यांच्या योगानें आपलें वर्तन सुधारतां येईल.

जगाच्या कल्याणार्थ ज्या संतांच्या विभूती होऊन

गेल्या, व ज्यांनीं जगामध्यें सत्कृत्यें करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे त्यांचें आपण नेहमीं स्मरण करावें. ज्यांनीं आपल्या सौजन्यानें, दयाशीलत्वानें, निष्कलंक आचरणानें, आणि निःसीम भक्तीनें लोकांस सुनीतीचें असें कांहीं वळण लावून दिलें कीं, जें जगामध्यें इतक्या घडामोडी घडून आल्या तरी कायम राहिलें आहे, ज्यांनीं आपल्या चातुर्यानें, ज्ञानानें, आणि दीर्घ शोधांनीं संसारयात्रा अधिक सुखकर केली, ज्यांनीं संगीत, कविता इत्यादि ललित कलांच्या योगानें तीस अधिक रमणीयत्व आणिलें, ज्यांनीं वैद्यकादिं शास्त्रांच्या योगानें तिचें कष्टमयत्व अधिक सुसह्य केलें, ज्यांनीं बोधपर आणि मनोरंजक पुस्तकें लिहून ती अधिक आनंदमय केली, व ज्यांनीं आपल्या उदार सत्कृत्यांनीं तिचें वैभव वृद्धिंगत केलें, त्या सत्पुरुषांचें मंगल नामस्मरण आपणांस किती शुभदायक होईल, हें सांगावयास नकोच.

ज्यांनीं आह्मांवर असे महदुपकार करून ठेविले आहेत, त्यांपैकीं थोड्यांचींच नांवें तूर्त तुह्मांस माहीत असतील; परंतु जसजसें तुमचें ज्ञान वाढत जाईल, तसतशी तुह्मांस त्यांच्यापैकीं अधिकाधिकांचीं नांवें माहीत होत जातील; व आजपर्यंत होऊन गेलेल्या साधु पुरुषांनीं आणि साध्वी स्त्रियांनीं आपापलीं कर्तव्यें उत्तम प्रकारें बजावून जगाचें केवढें कल्याण केलें आहे, ह्या विचारानें तुमचीं मनें आश्चर्यचकित होतील.

जे लोक परोपकाराचीं कृत्यें करितांना आपण कोण व काय करीत आहों, हें मनांत आणीत नाहींत, त्यांच्याविषयीं आपल्या मनावर कांहीं विलक्षण प्रकारचा ग्रह होतो. एखाद्या अप्रसिद्ध व विनयशील मनुष्यानें केलेलें उदार सत्कृत्य पाहून पुष्कळांच्या अंतःकरणामध्यें श्रेष्ठ प्रतीची कर्तव्यनिष्ठा जागृत होते. ग्रेस डार्लिंगनें बुडत असलेल्या खलाशांस वांचविण्याकरितां जेव्हां आपलें होडकें समुद्रांत लोटलें तेव्हां तिनें आपलें काय होईल हें मनांत आणिलें काय? आगीच्या भडक्यांत सांपडलेल्या मनुष्यांचे जीव वांचविण्याकरितां एकदम आंत घुसून आपल्या प्राणाची आहुति दिलेल्या शूर पुरुषांचीं उदाहरणें आपण ऐकलेलीं व वाचलेलीं आहेत. हे लोक आगींत उडी टाकतांना आपल्या जिवाचें काय होईल, हा विचार मनांत तरी आणितात काय?

अशा प्रकारचीं कृत्यें करणें आणि आपल्या आचरणामध्यें धैर्य, कष्ट सहन करण्याची शक्ति व आत्मसंनियमन हे गुण सतत प्रकट करणें यासच आपण खरें शौर्य ह्मणतों. ह्या गुणासारखा मानवी स्वभावामध्यें दुसरा श्रेयस्कर गुण नाहीं. ज्यांनीं सत्कृत्यें करून आपलें शौर्य गाजविलें आहे, अशा पुरुषांचीं नांवें, ते आपले अत्यंत हितकर मित्र होत, असें समजून आपण आपल्या हृदयसंदुकीमध्यें राखून ठेवितों. अशा पुरुषांच्या स्मरणानें आह्मांस आपल्या भित्रेपणाची आणि आपल्या आपलपोटेपणाची

शरम वाटूं लागते, आणि ह्या जगामध्यें आत्मरक्षण आणि आत्मरंजन ह्यांहिपेक्षां अधिक महत्वाचीं अशीं आपलीं कांहीं कर्तव्यें आहेत, ह्या गोष्टीचा आपणांस चांगला उमज पडतो.

शूर आणि उदार माणसें सर्व प्रतींच्या लोकांमध्यें सांपडतात. कधीं कधीं तर ज्या ठिकाणीं अशीं माणसें मिळण्याची बिलकूल आशा नसते, अशा ठिकाणींही तीं आढळतात. हें कसें तें लक्षांत येण्याकरितां इंग्लंड देशामध्यें थोड्या वर्षांपूर्वीं एक प्रत्यक्ष घडून आलेली गोष्ट आह्मीं येथें देतों. एकदां एका व्यापारी मंडळीच्या गोलियाथ नांवाच्या गलबतास आग लागली. त्या गलबतावर कांहीं बिनवारशी रस्त्यावर भटकत फिरणारे मुलगे खलाशाचा धंदा शिकविण्याकरितां ठेवण्यांत आले होते. प्रथमतः पोलिस कामगारांनीं ह्या मुलांस सुधारणागृहामध्यें ठेविलें होतें. तेथें त्यांची अन्नपाण्याची व कपड्यालत्त्याची वगैरे सर्व व्यवस्था नीट असे. परंतु पुढें सुधारणागृहांच्या व्यवस्थापकांस त्यांस खलाशाचा धंदा शिकवावा असें वाटलें; आणि ह्मणून त्यांनीं त्यांची गोलियाथ गलबतावर रवानगी केली. ह्या गलबतावर त्या मुलांना लिहिणें, वाचणें, स्वच्छता ठेवणें, व्यवस्थित राहणें, वरिष्ठाचा हुकूम पाळणें वगैरे गोष्टींचें शिक्षण मिळून शिवाय त्यांस खलाशाचा धंदा शिकविण्यांत येत असे. त्यांना ह्या सर्व गोष्टींमध्यें कसें चांगलें शिक्षण मिळालें होतें, ह्या गोष्टीचा अनुभव

तारीख २२ डिसेंबर सन १८७५ रोजीं आला. त्या दिवशीं एक केरोसाइन तेलाचा तेवता दिवा उपडा होऊन त्या गलबतास आग लागली. ज्या मुलाच्या हातून तो दिवा उपडा झाला होता, त्यानें ती आग पहिल्यानेंच विझविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. एकदम गलबतानें पेट घेतली, आणि आग भराभर भडकत चालली. तुम्हांला कदाचित् असें वाटत असेल कीं, गलबतावरील ते मुलगे गलबत पेटूं लागल्याबरोबर आपापले जीव घेऊन पळाले असतील; परंतु नाहीं, तसें त्यांनीं केलें नाहीं इतकेंच नव्हे, तर आग लागल्याची आरोळी झाल्याबरोबर ते आपल्या नेहमींच्या नेमलेल्या ठिकाणीं जाऊन उभे राहिले आणि वरिष्ठाच्या हुकुमाची वाट पहात बसले. त्यांपैकीं कांहीं त्या पेटत्या गलबताजवळ एक होडी होती, तीमध्यें होते, व ते त्या आगीच्या ज्वाला पाहून भ्याले, आणि ती होडी वल्वून दूर नेऊं लागले. परंतु त्यांतच एक तेरा वर्षांचा मुलगा होता, त्यानें इतरांस ती होडी तेथून हालवूं न देतां पेटत्या गलबतावरील प्रत्येक मुलगा त्या होडींतून सुरक्षित स्थळीं नेण्याचा आग्रह धरिला. त्या पेटत्या गलबतावरील शूर कप्तान गलबतांतील सर्व मुलगे सुरक्षितपणें पार पडत तोंपर्यंत तेथून हालला नाहीं. गलबतावरील मुलगे कप्तानास आधीं होडींतून जाण्याविषयीं सांगत होते; परंतु त्या उदार कप्तानानें असें उत्तर दिलें कीं, समुद्रावर कोणी असें करीत

नसतो. त्यांपैकीं एक लहान मुलगा कप्तानाला ह्मणाला, कप्तान साहेब, तुह्मीं जळून जाल. परंतु ईश्वराची काय करणी ती त्यांपैकीं कोणीही जळून किंवा बुडून मेला नाहीं. सर्व त्या होडीच्या साहाय्यानें सुरक्षित स्थळीं येऊन पोहोंचले. त्या शूर कप्तानाच्या आणि त्या शूर मुलांच्या औदार्याचें स्मरण कधीं तरी कोणाच्या मनांतून नाहींसें होईल काय ?

संपूर्ण जग अशा शूर माणसांस फार चाहतें. ज्यांनीं सत्याकरितां आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या, ज्यांनीं स्वदेशाकरितां आपले प्राण खर्चीं घातले, ज्यांनीं आपलें सर्व आयुष्य लोकसेवेमध्यें घालविलें, ते सर्व खरे शूर पुरुष होत; व त्यांचा आह्मी मोठ्या आनंदानें सत्कार करितों. ह्यांपैकीं कांहींकरितां आपण पुतळे उभारितों, व कांहींचीं चरित्रें लिहून त्यांची कीर्ति पुस्तकामध्यें चिरस्थाई करितों. सारांश, त्यांस आपण कधीं विसरत नाहीं.

साधूंचीं सत्कृत्येंच काय, परंतु त्यांचा सदुपदेशही त्यांच्या पश्चात् चिरकाल रहातो. त्यांनीं शेंकडों वर्षांपूर्वीं उच्चारिलेल्या उक्ती आह्मांस प्रसंगविशेषीं बोध करून आमचें समाधान करितात. साधुजनांनीं लिहून ठेविलेल्या पुस्तकांतील वचनें आह्मांस संकटसमयीं किती उपयोगीं पडतात हें मनांत आणा.

ह्याप्रमाणें ज्या साधुजनांनीं संपूर्ण जगावर उपकार केले आहेत, त्यांचें आपणांस उतराई कसें होत येइल ? त्यांचें उतराई होण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे

जें जें काम करण्याचें आपल्या नशिबीं येतें, तें तें आपण आपल्या सामर्थ्यानुरूप उत्तम प्रकारें करणें. आपल्या हातून होणाऱ्या लहान कृत्यांचेंही फल वायां जात नाहीं, हें ध्यानांत ठेवावें. जें जें काम तुह्मी करावयास लागाल, त्या त्या कामामध्यें आपली पराकाष्ठा करा; त्यामध्यें तुह्मांस यश आलें तर वरेंच झालें, नच आलें तर पुन्हां यत्न करा. तुह्मी आपली सर्व शक्ति खर्च करून जरी तुह्मांस यश आलें नाहीं, तरी सत्कृत्य करण्याचा तुमचा प्रयत्न आणि तो करितांना आलेला अनुभव, ह्याचा खुद्द तुह्मांस आणि इतरांस उपयोग झाल्यावांचून रहावयाचा नाहीं.

आमच्यापैकीं बहुतेकांचीं नांवें आमच्या मागें फार दिवस रहावयाचीं नाहींत; परंतु आह्मीं जर आपलें काम उत्तम प्रकारें बजाविलें असेल, तर नांवांत कांहीं अर्थ नाहीं. ह्यासंबंधानें इंग्लंडांतील एक प्रसिद्ध ग्रंथकर्ता असें ह्मणतो, "—जगाची स्थिति उत्तरोत्तर सुधारत चालली आहे ही गोष्ट अंशमात्रें-करूनच ज्यांचीं नांवें इतिहासामध्यें नमूद झालेलीं आहेत अशा पुरुषांच्या कृत्यांवर अवलंबून आहे. तुमची आमची स्थिति आज आहे इतपत चांगली आहे, ह्याचें अर्धें कारण हें आहे कीं, पुष्कळ लोक गाजावाजा केल्याशिवाय आपलीं कर्तव्यें बजावून आतां कोनाकोपऱ्यांतील आपल्या थडग्यांमध्यें स्वस्थपणें पडून आहेत."

## सृष्ट पदार्थांशीं आमचा संबंध.

आह्मी सर्व एका कुटुंबांतील माणसें आहों, आह्मांस आपल्या चरितार्थाकरितां ह्या भूमातेवर अवलंबून असावें लागतें. ती जें आह्मांस देईल त्याचा सर्वांनीं एकत्र खपून योग्य उपयोग करून घेतला पाहिजे, वगैरे गोष्टी आमच्या लक्षांत येऊन गेल्याच आहेत. त्याचप्रमाणें आह्मांस एकटें असें कधींच राहातां यावयाचें नाहीं; मनुष्यजातीच्या गरजा, हितसंबंध, कर्तव्यें, आणि प्रीतिपाश इत्यादि गोष्टींच्या योगानें जडलेला अन्योन्यसंबंध कालाच्या किंवा स्थलाच्या अंतरानें नष्ट व्हावयाचा नाहीं, हेंही आमच्या लक्षांत येऊन गेलें असावें. जो प्रीतिपाश आमच्या जातिबांधवांशींच नव्हे, तर ह्या जगांतील सर्व सृष्टपदार्थांशींही आमचा संबंध जडवितो त्याचा आपण आतां विचार करूं.

ज्याप्रमाणें आमच्या शरीराचें हवा आणि अन्न ह्यांनीं पोषण होतें, त्याचप्रमाणें इंद्रियांच्या द्वारानें ज्या गोष्टींचें व पदार्थांचें आह्मांस ज्ञान होतें, त्यांच्या संस्कारांनीं आमच्या मनाचें पोषण होतें. हेच संस्कार आमच्या मनामध्यें विचार होऊन जातात; व त्यांचा मनामध्यें संचय झाला ह्मणजे ते आमच्या स्मरणांत राहिले असें आपण ह्मणतों. ह्याच संस्कारांच्या योगानें आह्मांस कळल्याशिवाय आमच्या मनामध्यें बुद्धि, विवेक, इत्यादि मानासिक शक्ती जागृत होऊन त्या आपणांस विचारी व सुज्ञ मानवी प्राणी बनवितात.

एकदां आमच्यामध्यें विचारशक्ति निर्माण झाली ह्मणजे आमच्या मनाची वाढ भराभर होत जाते. त्यांत एक चमत्कारिक गोष्ट अशी आहे कीं, ज्या गोष्टींचें आह्मांस ज्ञान होतें, व ज्या गोष्टींचें आह्मांस ज्ञान होत नाहीं, अशा दोन्ही गोष्टींच्या योगानें आमच्या मनाचें पोषण होत असतें. सृष्टींतील प्रत्येक वस्तु आमच्या मनामध्यें जिज्ञासा उत्पन्न करून तिची कधीं पूर्तता होऊं देत नाहीं. ज्याप्रमाणें व्यायामानें आमचे अवयव सशक्त होत जातात, त्याप्रमाणेंच ज्ञान मिळविण्यासाठीं आह्मी जे प्रयत्न करीत असतों त्यांच्या योगानें आमचीं मनें अधिक विस्तृत व अधिक शक्तिमान होत असतात. ह्या जगामध्यें आह्मांस इतक्या गोष्टींचें ज्ञान करून घ्यावयाचें आहे कीं, आमचा ज्ञान मिळविण्याचा उद्योग कधींच पुरा व्हावयाचा नाहीं.

आह्मीं हें जग कधीं अस्तित्वांत आलें ह्याचा शोध लावण्यांसाठीं नेहमीं जुन्या खडकांच्या खाणाखुणा पहात असतों. त्यांवर कधीं कधीं आह्मांस नेहमीं समुद्रावर सांपडणाऱ्या साधारण शिंपांचे ठसे उमटलेले दृष्टीस पडतात. हे ठसे जणूं काय आह्मांपाशीं बोलूनच आह्मांस असें सांगतात कीं, ह्या जगावर मनुष्याची वसति होण्यापूर्वी असंख्य वर्षं मनुष्येतर सजीव प्राण्यांची वसति होती. ह्या जुन्या खडकावरील खाणाखुणांवरूनच आह्मांस असें दिसून येतें कीं, ते लक्षावधि वर्षांच्या

पूर्वींच बनलेले आहेत. परंतु त्यांवरूनच ते केव्हां बनले, व त्यांची मूळ स्थिति काय होती, हें मात्र आह्मांस निश्चितपणें समजत नाहीं. त्याचप्रमाणें प्राचीन युगांचा इतिहास जाणून घेण्याविषयीं आमचा नेहमीं प्रयत्न चालला असतो; व त्या इतिहासाचें ज्ञान जरी आपणांस होत नाहीं, तरी आह्मांस आमचा तो उद्योग चालला असतां जातां जातां उपयुक्त ज्ञानाच्या अनेक धनत्तर खाणी आढळतात.

एक चकचकणारा गोल प्रतिदिनीं सकाळीं उगवतांना आणि संध्याकाळीं मावळतांना आह्मीं पहातों. त्या गोलाचें उगवणें आणि मावळणें हें दिवस आणि रात्र ह्यांचें कारण आहे. हा गोल आमच्यापासून नव्वद कोटी आणि पन्नास लक्ष मैल दूर आहे, व तो त्या अंतरावरून आह्मांस जो प्रकाश आणि उबारा पाठवितो, तो जर त्यानें पाठविला नाहीं, तर ह्या पृथ्वीवरील कोणतीही वस्तु सजीव रहाणार नाहीं. ह्या गोलास आपण सूर्य ह्मणतों, व तो ह्या पृथ्वीपेक्षां दशलक्षपटीनें मोठा आहे. पृथ्वीवरील सर्व सजीव वस्तूंचें जीवन ह्या गोलावर अवलंबून आहे इतकेंच नव्हे, तर या अवाढव्य गोलाच्या वजनानें किंवा आकर्षणानें जर तिचें समतोलन झालेलें नसतें तर ती ह्या आकाशाच्या पोकळीमध्यें कधीं कोठें जाऊन पडली असती ह्याचा पत्ताही लागला नसता. ह्याप्रमाणें हा प्रचंड सूर्य आणि ही अल्प पृथ्वी ह्यांमधील अंतर जरी इतकें मोठें आहे कीं, तेथें पोहोंचण्यास

आगगाडीच्या वेगानें ह्मणजे दर तासास आह्मी तीस मैल प्रवास केला तरी आह्मांस तीनशें वर्षांहून कांहीं तरी जास्त वर्षें लागतील, तरी तो तिचा संरक्षक आणि तिच्यावरील प्रत्येक सजीव वस्तूचा जीवनदाता आहे. जरी आह्मी सूर्य नेहमीं पाहत आहों, आणि जरी आमचें सर्व अस्तित्व त्याच्यावर अवलंबून आहे, तरी त्याच्या संबंधानें आह्मांस मुळींच कांहीं माहिती नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. खगोलशास्त्रवेत्ते त्या दिव्य व अपूर्व गोलाच्या वस्तुस्थितीच्या संबंधानें काय माहिती आणितात ह्या गोष्टीकडे आपले एकसारखे डोळे लागलेले असतात.

रात्रीं सूर्य आह्मांस सोडून गेला ह्मणजे दुसरे चकचकीत तारे आकाशामध्यें दिसूं लागून पृथ्वीवरील लोकांस आनंदित करितात. चंद्र शुक्ल किंवा कृष्ण पक्षांतील तिथीच्या मानानें सूर्यापासून प्राप्त झालेला प्रकाश आह्मांस देत असतो. सूर्यग्रहमालिकेंतील ग्रहही आह्मांस आकाशामध्यें प्रकाशमान होऊन असें सुचवीत असतात कीं, आपला प्रकाश, प्रकाशाचें आदिस्थान जो सूर्य त्यापासूनच प्राप्त झालेला आहे; व त्याच्याच बलवत् आकर्षणानें आपण आपापल्या कक्षांमध्यें सुरक्षिपणें फिरत आहों.

चंद्र किंवा इतर ग्रह ह्यांच्यापलीकडे फार दूर आकाशामध्यें आह्मांस असंख्य तारे चमकतांना दिसतात; ते आपल्या उज्वल तेजानें रात्रीस शोभा

थ संग्रहालय.



आणितात, आणि त्यांचें स्थान आमच्या दृष्टीच्या टप्प्यांत असल्यामुळें त्यांच्याविषयीं माहिती मिळविण्याची आमच्या मनांत उत्कट इच्छा जागृत होते. ह्यांना अचल तारे असें नांव आहे. कारण, ते पृथ्वी, चन्द्र आणि इतर ग्रह ह्यांप्रमाणें आपल्या कक्षांमध्यें फिरत नाहींत. किंवा त्यांचीं परस्परांच्या संबंधानें स्थानें बदलत नाहींत. त्यांतील अगदीं जवळचा तारा आह्मांपासून सूर्यापेक्षां दोन लक्षपटीनें दूर आहे. आणि तेथें पोंचण्यास आह्मांस रेल्वेच्या गतीनेंही सहा कोटी वर्षें पुरावयाचीं नाहींत.

ह्या अचल ताऱ्यांशीं आमचा संबंध आहे काय? त्यांचा आह्मांस कांहीं उपयोग होतो काय? अलबत त्यांचा आमचा संबंध असून त्यांचा आह्मांस उपयोगही होतो. उत्तर ध्रुव तारा हा साधारणपणें अचलच आहे. आणि त्याचा प्राचीन कालापासून विस्तीर्ण महासागरांतून प्रवास करितांना नाविकांस मार्गदर्शक ह्या नात्यानें उपयोग होत आलेला आहे. त्याचप्रमाणें ह्या ताऱ्याच्या स्थानाच्या धोरणानें ऋतूंचीं कारणें आणि पृथ्वीच्या प्रतिवर्षीं सूर्याभोंवतीं होणाऱ्या प्रवासाची लांबी वगैरे गोष्टी आह्मांस माहीत झाल्या आहेत. फार तर काय, आज आह्मांमध्यें जें खगोलशास्त्र ह्मणून झालें आहे तें सर्व ह्या अचल ताऱ्यांच्या साधनांनींच प्राप्त झालेलें आहे. ह्याप्रमाणें हे अचल तारे जरी आकाशामध्यें फार दूर आहेत, आणि त्यांच्या स्वरूपाच्या संबंधानें आह्मांस

जरी कांहीं ह्मणण्यासारखी माहिती नाहीं, तरी त्यांच्या साहाय्यानें आह्मांस खगोलशास्त्र प्राप्त होऊन आमच्या व्यापारास, आमच्या उदारनिर्वाहाचे पदार्थ मिळविण्यास आणि आमची मानसिक सुधारणा होण्यास त्यांचा मोठा उपयोग झाला आहे, ही गोष्ट आह्मी विसरतां कामा नये. ह्या अचल ताऱ्यांपैकीं प्रत्येक तारा आपापल्या मालिकेचा सूर्य असून त्याच्यावर कांहीं ग्रह अवलंबून आहेत, व ते त्याच्याभोंवतीं फिरत आहेत, असा तर्क करणें सयुक्तिक दिसतें.

आमच्या पृथ्वीचा इतर गोलांशीं संबंध कसा पोंचत आहे ही गोष्ट आह्मांस समजली ह्मणजे ह्या विश्वामध्यें असंख्य गोल ह्याप्रमाणें एकमेकांवर अवलंबून आहेत, ह्या गोष्टीचेंही आपणांस आकलन होतें; व ज्या अदृश्य आदिशक्तीच्या प्रभावानें दूरदूरच्या जगांमध्यें आणि ह्या पृथ्वीवरील आमच्या गृहामध्यें व्यवस्था आणि सुस्थिति राहून व आमचीं कुटुंबें बनून आह्मीं परस्परांवर प्रीति करूं लागतों, त्या आदिशक्तीच्या महिम्याचें आह्मांस ज्ञान होतें.

जसजशी आमच्या मनाची वाढ होत जाते तसतसें सृष्टीमध्यें आपणांस जें कांहीं आढळून येतें तें समजावून घ्यावें, व त्याचा उपयोग करून घ्यावा, असें आह्मांस वाटूं लागतें, इतकेंच नव्हे तर आमच्या अंतःकरणामध्यें सृष्टिसौंदर्याविषयीं प्रेमभावही उत्पन्न होत जातो. आकाश, तारे, तरु, पुष्पें, नद्या, पर्वत,

पक्ष्यांचें गान, ओढ्यांचें झुळझुळ वाहणें, इत्यादि गोष्टींच्या रमणीयत्वानें आम्हांस आनंद होतो. इतकेंच नाहीं, तर त्या सुंदर वस्तु पाहून व ते मधुर ध्वनी ऐकून आमच्या आत्म्याचें आणि त्यांचें अगदीं तादात्म्य होऊन आमच्या मनामध्यें सृष्टीविषयीं अगाध प्रीति जागृत होते.

लहान मुलांच्या मनांत सृष्ट पदार्थांविषयीं हा प्रेमभाव नसतो. मुलांस एखादें झगझगीत रंगाचें फूल पाहून आनंद होतो, परंतु त्या मुलाचें त्या रंगापलीकडे दुसऱ्या कशाकडे लक्ष नसतें. तें तें फूल घेतें आणि त्याच्या त्या नाजुक पाकळ्या तेव्हांच कुसकरून टाकितें. ज्या मनुष्याचें मन विद्यासंस्कारानें प्रगल्भ झालेलें नाहीं, त्या मनुष्याच्या मनाची स्थिति सृष्ट पदार्थांच्या संबंधानें त्या लहान मुलाच्या मनाच्या स्थितीसारखीच असते.

परंतु मुलें जसजशीं मोठीं होत जातात तसतशीं त्यांच्या मनामध्यें त्यांना समजल्याशिवाय सृष्ट पदार्थांविषयीं प्रीति उत्पन्न होऊं लागते. समुद्राच्या कांठीं कांहीं मुलें गमतीनें खेळत असतात. प्रथमतः त्यांचें नुसतें खेळाकडेच लक्ष असतें. परंतु त्यांच्या पायांशीं समुद्राच्या लाटा येऊन पडूं लागल्या व त्यांमध्यें सूर्याचीं किरणें शतशः विदीर्ण होऊन चमकूं लागलीं ह्मणजे तीं आपला पहिला खेळ सोडून त्या लाटांशींच खेळूं लागतात. त्यांना तो समुद्र आपणांबरोबर हंसत आहे असें वाटतें. आणि तो त्यांचा एक गम-

तीचा खेळगडी होऊन जातो. पुढें तीं जसजशीं जाणतीं होत जातात, तसतसें त्यांना तोच समुद्र आपल्याबरोबर कांहीं महत्वाच्या विषयावर बोलत आहे असें वाटतें. समुद्राच्या लाटा आतां त्यांच्याबरोबर नुसत्या हंसत नाहींत, तर त्या दैवरूपी सागराच्या लाटा आपल्या सर्व मनोरथांचा व आशांचा कसा विध्वंस उडवितात, हे गंभीर विचार त्यांच्या मनास हळू हळू सुचवूं लागतात.

ह्याप्रमाणें समुद्र हा आपला लहानपणाचाच मित्र असतो असें नाहीं; परंतु त्याच्या मित्रत्वाचा आह्मांस मोठेपणींही उपयोग होतो. जाणत्या मनुष्यास समुद्राच्या संनिध बसून लाटांचें नेहमीं चालणारें चलन अवलोकन करण्यास सांपडतें. समुद्रामध्यें ज्याप्रमाणें चंद्र प्रतिबिंबित झालेला दिसतो, त्याचप्रमाणें त्याची मनोवृत्तिही त्यामध्यें प्रतिबिंबित झालेली त्यास दिसेल. समुद्राच्या तुफान झालेल्या लाटा पाहून त्याला आपल्या क्षुब्ध मनोवृत्तींचें स्मरण होईल. समुद्राची भरती आणि ओहटी ह्या गोष्टींच्या योगानें त्याच्या मनांत आपल्या जननमरणाचे विचार येतील, व समुद्राचें आणि आकाशाचें रात्रीच्या प्रसंगीं एकांतामध्यें शांत स्वरूप पाहून त्याच्या मनोवृत्तीही शांत आणि गंभीर होत जातील.

कधीं कधीं लहान मुलें गवताच्या हिरव्याचार मैदानावर आनंदानें खेळतांना तुमच्या नजरेस पड-

तात. तें मैदान ह्मणजे त्यांना आपणांकरितां एक मुद्दाम हिरवाचार गालिचा पसरलेला आहेसें वाटतें. व त्यावर तीं एकसारखीं मौजेनें लोळकंड्या व लोटांगणें घालीत असतात. आसपासच्या झाडझुडपांतील कांहीं रंगी बेरंगी फुलें तोडून त्यांचे तुरे व माळा करून तीं आपल्या कानांमध्यें आणि गळ्यांत लटकावितात. इतक्यांत एखादी वाऱ्याची झुळूक येऊन ती त्यांनीं जमा करून ठेवलेलीं फुलें हवेमध्यें इकडे तिकडे पसरून टाकिते. एखाद्या वेळेस अधिक जोराचा वारा येऊन तो त्यांचे पतंग हवेमध्यें उंच वर घेऊन जातो; व अशा रीतीनें ते पतंग उंच जात जात शेवटीं निळ्या आकाशामध्यें लहानशा ठिपक्यांप्रमाणें दिसूं लागतात. इतक्यांत वाऱ्याच्या झुळकीनें उडविलेला एखादा फुलाचा तुरा जमिनीवरून उचलून त्यांतलि एखादें मुल मोठ्यानें ओरडून ह्मणतें, 'हैं पहा मला काय सांपडलें तें!' ह्या समोरच्या जाळींतील वेलीवरील काढलेला सुंदर फुलांचा हा तुरा आहे. तो किती गमतीचा दिसतो बरें! मुला, जर सृष्टिदेवीनें ह्या उखिरवळ्या जमिनीमध्यें आपल्या अलौकिक गुप्त शक्तीनें त्या सुंदर, नाजुक, मनोरम वेली उत्पन्न करून त्यांवर पांढऱ्या, पिंवळ्या आणि निळ्या फुलांचे झुबके आणिले नसते, तर तुला हीं फुलें आज मिळालीं नसतीं. त्या सर्व मुलांना ह्या सर्व चाललेल्या गमतीचा मोठा आनंद वाटतो, आणि त्यांना असेंही वाटूं लागतें कीं, सूर्यप्रकाश, गवत, वाऱ्याची झुळुक

आणि पुष्पें, ह्यांमध्यें अशी कांहीं विलक्षण प्रेमळ शक्ति आहे, कीं जिला आमच्या आनंदानें सतत आनंद होत असतो. मुलें जाणतीं झाल्यावर त्यांना सृष्टीमध्यें अशा प्रकारची शक्ति आहे असें अधिकाधिकच वाटूं लागतें; आणि त्याच्या योगानें त्यांना आपापल्या दुःखांचाही विसर पडतो. कविता ह्मणजे उत्तम विचार उत्तम भाषेमध्यें प्रदर्शित करणें होय. व कित्येक मनोरम काव्यांमध्यें सृष्टींतील सुखदुःखांच्या ह्या सांगडीचें फार मनोवेधक रीतीनें वर्णन केलेलें असतें.

प्राचीन काळीं लोक सृष्टींतील ही अद्भुत शक्ति मनांत आणून सृष्ट पदार्थांस निरनिराळ्या देवता कल्पित असत. वेदामध्यें इन्द्र, वरुण, अग्नि, यम, सूर्य, चन्द्र इत्यादींस देवता मानण्यांत आलें आहे, त्याचें तरी बीज हेंच आहे. लोकांमध्यें ह्या देवतांचीं आराधना करण्याचा परिपाठ पडला ह्याचें कारण त्यांच्या मनांत त्या देवतांपैकीं कांहींविषयीं भीति असे, व कांहींविषयीं प्रेम असे, हेंच होय. आतां लोकांच्या मनांतून ह्या कल्पना हळूहळू नाहींशा होत चालल्या आहेत. परंतु कवी अजूनही आपापल्या काव्यांमध्यें सृष्टपदार्थांस देवता मानून त्यांचीं वर्णनें करीत असतात. निरनिराळ्या भाषांमध्यें अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें आढळून येतील.

तेव्हां "सृष्टीविषयीं प्रेम" ह्या शब्दांचा अर्थ मनोहर सृष्ट पदार्थ पाहून आपणांस होणारा आनंद

इतकाच घ्यावयाचा नाहीं; तर बाह्य सृष्टींतील व आमच्या मानसिक सृष्टींतील सद्वस्तूंच्या आदिकारणांमध्यें अदृश्य परंतु भासमान होणारी समभावना असा घेतला पाहिजे.

---

## सृष्टीच्या अदृष्ट कारणाशीं आमचा संबंध.

ज्याप्रमाणें ह्या भव्य व मनोरम सृष्टींतील पदार्थांशीं आमचा संबंध असतो त्याप्रमाणेंच आमच्या आत्म्यांचा अदृष्ट कारणांशीं संबंध असतो. हा संबंध आह्मांस विशेष महत्वाचा आहे, व त्याचे आमच्यावर होणारे परिणामही फार अगाध आहेत. ह्यासंबंधालाच आपण धर्म हें नांव देतों; व त्याच्या योगानेंच सर्व वस्तूंचें आदिकरण जो ईश्वर त्याच्याकडे आमचें मन वळतें. ह्यासंबंधाच्या योगानेंच सृष्टींतील ज्या पदार्थांवरून त्याचें अस्तित्व आह्मांस व्यक्त होतें, त्याविषयीं आह्मांस आश्चर्य वाटूं लागतें, व ज्या जगामध्यें आपण जन्मास आलों आहों, त्या जगांतील आपलें कर्तव्य यथाशक्ति पुरें करावें, अशी इच्छा आमच्या मनामध्यें जागृत होते. ही इच्छा आमच्या मनामध्यें जागृत झाली, ह्मणजे आह्मांस अशीं कांहीं बंधनें लागू होतात, कीं त्यांच्या योगानें आपल्या हातून नेहमीं सत्कृत्येंच होऊं लागतात. ऐहिक अपेक्षा किंवा

मराठी

ऐहिक इच्छा ह्यांची केवळ तृप्ति करून घेण्याप-लीकडे आमच्या आत्म्याची अधिक श्रेयस्कर वस्तु प्राप्त करून घेण्याकडे जी प्रवृत्ति होते तिलाच धर्म हें नांव आहे. ह्या प्रवृत्तीच्या योगानें सृष्टींतील सुंदर व मनोहर वस्तु पाहून आ-ह्मांस आनंद होतो; तिच्या योगानें आम-च्या मनामध्यें एक प्रकारची श्रद्धा उत्पन्न होऊन आह्मी त्या श्रद्धेच्या बलावर सर्व ऐहिक संकटें भोगण्यास तयार होतों; व ती ह्याप्रमाणें आह्मांस "ईश्वरा, तुझी इच्छा" असें ह्मणण्यास लावून अत्यंत दुर्घट प्रसंगांतूनही पार पाडिते.

धर्मबुद्धि इतकी पवित्र आहे कीं तिचें साधा-रण शब्दांनीं वर्णन होणें फार कठिण आहे. अति प्राचीन कालापासून मनुष्याच्या अंतःकरणामध्यें तिचें बीजारोपण झालेलें आहे, आणि तिच्याच योगानें आमच्या मनामध्यें अत्यंत श्लाघ्य विचार उत्पन्न होऊन आमच्या हातून अनेक उदार कृत्यें घडून आलीं आहेत.

मनुष्यें धर्माविषयीं अगदीं पहिल्यापासून एक-सारखी सत्कारबुद्धि प्रगट करीत आलीं आहेत. त्यांनीं धर्माला आपल्यापाशीं असलेल्या सर्व उत्तम वस्तु अर्पण केल्या आहेत. गान, चित्रकला, शि-ल्पकला वगैरे सर्व ललितकला आह्मांस आमच्या धर्मबुद्धीमुळेंच प्राप्त झाल्या आहेत. सांप्रतचीं व अति प्राचीन काळचीं ठिकठिकाणीं दिसून येणारीं

सुंदर आणि भव्य देवालयें जर आपण पाहिलीं, तर त्यांवरून असें दिसून येतें कीं, मनुष्यांनीं आपलीं गृहें बांधण्याकरितां जे कांहीं परिश्रम घेतले आहेत, त्यांपेक्षां त्या अदृश्य परंतु अत्यंत पवित्र परमेश्वराकरितां सुंदर मंदिरें तयार करण्याकरितां जास्त परिश्रम घेतले आहेत. प्राचीन काळचीं देवालयें जरी हल्लीं मोडकळीस आलेलीं दिसतात, तरी त्या स्थितीमध्येंही त्यांचें प्राचीन भव्य सौंदर्य व्यक्त होत असतें.

धर्मबुद्धि प्रगट करण्याचे अनेक मार्ग आहेत. ते निरनिराळ्या प्रकारचे असतात. ज्या लोकांची मानसिक उन्नति झालेली नाहीं, त्या लोकांचे धार्मिक आचार रानटी असतात. कधीं कधीं धर्माच्या नांवाखालीं अनेक दुष्कृत्यें केलीं जातात; व धर्म ह्मणून आमच्यामध्यें नाना प्रकारचे विलक्षण पंथ उपस्थित झालेले आहेत. तरी त्यांमध्यें धार्मिक बुद्धि नेहमीं कायम असतेच. ती आह्मांस साधतील तितक्या ऐहिक सुखांचा उपभोग घ्या इतकेंच सांगत नाहीं. तिचा सतत आह्मांस पुढें लिहिल्याप्रमाणें उपदेश चाललेला असतो;—परस्परांवर प्रीति करा; दुसऱ्यांस आनंद झाला तर तुह्मांस आनंद होऊं द्या; दुसऱ्यांस दुःख झालें तर तुह्मांस दुःख होऊं द्या; तुमचें कोणी वाईट केलें तरी त्याचें तुह्मीं वाईट करूं नका; अशुभाचा शुभानें प्रतिकार करा; तुमच्या अस्तित्वाविषयीं आणि ज्यानें तुह्मांस

अस्तित्वांत आणिलें त्याच्याविषयीं सतत तुमच्या मनामध्यें पूज्यबुद्धि धारण करा; आणि आपलें वर्तन सतत ह्या वरील नियमांस अनुसरून ठेऊन सतत अक्षय सुखाचा मार्ग चोखाळीत जा.

सदसद्विचारशक्ति आह्मांस नेहमीं जें कांहीं रास्त आहे तें करण्यास सांगत असते. ह्या शक्तीला आमच्या अंतःकरणामध्यें अवतीर्ण झालेली ईश्वराची शक्ति असें नांव दिलेलें आहे. धर्म आणि सदसद्विचारशक्ति ह्या उभयतांची सांगड जमली ह्मणजे जें कांहीं रास्त आहे तेंच करण्याविषयीं आमच्या मनास अधिकच स्फूर्ति येत जाते. आह्मी जें कांहीं रास्त तेंच करितों; त्यामध्यें आमची दृष्टि पुढें होणाऱ्या फलावर नसते, तर जें कांहीं रास्त तेंच केलें पाहिजे अशाच समजुतीनें तें आह्मीं करीत असतों.

कर्तव्य केल्याबद्दल आह्मांस पुढें जी फलप्राप्ति होते ती निरनिराळ्या प्रकारची असते. नेहमीं आपलें कर्तव्य कर्म करीत गेल्यानें आह्मांस इहलोकींची लोकयात्रा अधिक सुखकर होते. निरनिराळ्य कामांमध्यें यशाचा वांटा येऊन नेहमीं आनंद होतो, किंवा इतर लोकांचें मत आपणांविषयीं चांगलें होत जातें. हीं सर्व आपणांस प्राप्त होणारीं फलें खरोखर अत्यंत इष्ट आहेत. परंतु धर्म, आपण रास्त तेंच केलें, किंवा आपण दुसऱ्याच्या उपयोगीं पडलों, ही गोष्ट आमच्या मनांत आणून देऊन आह्मांस

जी शांति देते, ती एवढी मोठी असते, कीं तिजपासून आह्मांस जरी कांहीं ऐहिक लाभ झाला नाहीं, किंवा आमची लोकांमध्यें वाहवा झाली नाहीं, तरी तिच्या योगानें आमची वृत्ति नेहमीं आनंदी रहाते.

लबाडीच्या धंद्यानेंही आह्मांस आपला उदार-निर्वाह किंवा चैन चालवितां येईल. एखादी गैर गोष्ट करूनही आह्मांस एखाद्या कामामध्यें यश मिळण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणें आपल्या अंगीं योग्यता नसतांनाही आपणांस इतरांपासून मान आणि प्रतिष्ठा संपादन करितां येईल. परंतु आह्मीं जर खोटें बोलून एखादें हलकट, दुष्ट किंवा लबाडीचें काम करूं, किंवा आपल्या मनामध्यें दुष्ट विचार आणि दुष्ट वासना आणूं, तर आमच्या मनाला कधींही शांति मिळून प्राप्त व्हावयाची नाहीं. आणि जर आमच्या मनास अशी शांति नसेल तर आह्मांस कधीं सुख होण्याचा संभव नाहीं. दुष्ट मनुष्याच्या मनास कधीं शांति नसते अशी प्राचीन काळापासून एक ह्मण प्रसिद्ध आहे, व तिचें यथार्थत्व जसें प्राचीन काळाला लागू होतें तसेंच सांप्रतच्या काळालाही आहे. आमच्या मनामध्यें एखादा वाईट विचार येऊं द्या, किंवा आमच्या हातून एखादी वाईट गोष्ट घडून येऊं द्या, लगेच आह्मीं ईश्वरापासून तितके दूर होऊन जातों. बरें, तेच आपल्या मनामध्यें चांगले विचार येऊं द्या, किंवा आपल्या हातून चांगलीं कृत्यें होऊं द्या, आह्मांस

लगेच दिव्य प्रकाश प्राप्त होऊन आह्मी ईश्वराच्या प्रीतींतलीं माणसें होऊन जातों.

ख्रिस्ती लोकांचा प्रसिद्ध पैगंबर येशू ह्यासंबंधानें असें ह्मणतो:—"ज्यांचीं अंतःकरणें निर्मल आहेत तेच खरोखर धन्य होत. ईश्वराचें राज्य तुमच्यामध्येंच आहे."

बौद्धधर्माचा संस्थापक गौतम बुद्ध ह्यासंबंधानें पुढें लिहिल्याप्रमाणें ह्मणतो:—"ज्या मनुष्याचे विचार नेहमीं शुद्ध असतात, ज्याला द्वेष ह्मणजे काय तें माहित नाहीं, जो आपलें आयुष्य पवित्रपणामध्यें घालवितो, ज्याच्या अंगीं भूतदया वास करीत आहे, जो नेहमीं नम्र आणि खऱ्या अंतःकरणापासून लोकांस शहाणपणाचा उपदेश करित असतो, त्या मनुष्याच्या अंतःकरणामध्यें सदैव ईश्वर वास करीत आहे असें समजावें."

प्रसिद्ध ग्रीक तत्ववेत्ता साक्रेटीस याला अथीनियन न्यायाधीशांनीं देहांतप्रायश्चित्ताची शिक्षा सांगितली, तेव्हां तो पुढें लिहिल्याप्रमाणें ह्मणाला:—"प्रामाणिक मनुष्याला इहलोकीं किंवा परलोकीं आपले हाल होतील अशी भीति बाळगण्याचें बिलकूल कारण नाहीं."

सेनेका नांवाचा रोमन तत्ववेत्ता असें ह्मणत असे कीं, "मनुष्य दुसऱ्याचें हित साधून आपलेंही हित साधतो." ह्याचा अर्थ सत्कृत्याचें त्यास चांगलें फल मिळतें

इतकाच समजावयाचा नाहीं; कारण सत्कृत्य करतांनाच मनुष्यास एक प्रकारचें समाधान वाटतें, व हेंच सत्कृत्याचें उत्तम बक्षीस होय.

प्रसिद्ध रोमन वक्ता सिसरो ह्याचा सर्व काल लोकांस असा उपदेश असे कीं, "तुह्मीं आपल्या जातिबांधवांवर दया करा; आपल्या वर्तनानें दुसऱ्यास काय वाटेल ह्याचा विचार करून तदनुरूप त्याच्याशीं ठेवीत जा. वृद्ध मनुष्याशीं तुमचें वर्तन सहनशीलतेचें असावें; व मुलांशीं प्रीतीचें असावें."

चीन देशामध्यें होऊन गेलेला साधु पुरुष मेन्शियस हा आपल्या शिष्यवर्गास पुढील बोध करीत असे:—"मनुष्याच्या अंतःकरणामध्यें दया असावी, व त्यानें सदैव न्यायानें वागावें. आपल्या श्रेष्ठ मनोवृत्तींचा विकास कशानें होईल हें मनांत आणून मनुष्य वागला, ह्मणजे तो त्याला स्वर्गवासच आहे."

मुसलमान लोकांचा पैगंबर महंमद हा आपल्या शिष्यांस पुढें लिहिल्याप्रमाणें सांगत असे:—"दुष्ट वासनांचा त्याग करा, खरें बोला; आपलीं वचनें पाळा; व आपले शेजारी व नातलग ह्यांच्या उपयोगीं पडा."

प्रसिद्ध इंग्लिश तत्वज्ञानी बेकन ह्यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—"मनामध्यें सदैव सद्वासना धारण करणें, ईश्वरावर भरंवसा ठेवणें आणि सत्याचें दृढावलंबन करणें ह्मणजे इहलोकींच स्वर्गसुख भोगण्यासारखें आहे."

प्राचीन हिंदु ग्रंथांतही ठिकठिकाणीं परमेश्वराच्या सर्वव्यापकत्वाचीं दर्शक अनेक वचनें आहेतः—

एको देवः सर्वभूतेषु गूढः
सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ॥
' वेदान्तेषु यमाहुरेकपुरुषं
व्याप्य स्थितं रोदसी । यस्मिन्नीश्वर-
इत्यनन्यविषयः शब्दो यथार्थाक्षरः '॥
अन्तर्यश्च मुमुक्षुभिर्नियमितप्राणादि-
भिर्व्यज्यते । स स्थाणुः स्थिरभक्ति-
योगसुलभो निश्रेयसायास्तु नः ॥

ह्याप्रमाणें जगाच्या निरनिराळ्या भागांतील लोक निरनिराळ्या काळीं अदृष्टावर भरंवसा ठेवीत आले आहेत. सत्कृत्यांच्या या अदृष्ट फलावर भरंवसा असल्यानें मनुष्यास आपलें कर्तव्य करण्यास व आपलें अंतःकरण शुद्ध राखण्यास उत्तेजन येऊन परमेश्वराच्या आज्ञा आपण सदोदीत पाळीत आलों आहों ह्या विचारानें त्याची समाधानवृत्ति कायम राहते.

आपला प्रिय आप्तवर्ग आणि इष्टमित्र यांस मरण येऊन त्यांचीं शरीरें जरी नष्ट झालीं तरी त्यांचे जीवात्मे अस्तित्वांत आहेत असें आपण समजतों. हें तरी आह्मी अदृष्टावर नेहमीं भरंवसा ठेवीत आलों आलों ह्याचेंच एक ज्ञापक होय. हा अदृष्ट संबंध आपणास इतका प्रिय आणि पवित्र वाटतो कीं तो आपल्या धर्माचा अगदीं एक भागच होऊन राहिला

आहे. मृत माणसांवर आमचें जें प्रेम असतें त्यास आदरबुद्धीची भर पडून त्यांचें स्मरण आपणांस अत्यंत पूज्य होऊन जातें.

ज्या माणसांवर आपलें प्रेम असतें तीं माणसें जरी मरण पावलीं, तरी तीं खरोखर आपल्यांतून गेलींसें आपणांस वाटत नाहीं. त्यांचा आमचा संबंध इतका एकवटून गेलेला असतो कीं, त्यांच्याशिवाय आतां पुढें आपले दिवस पूर्वीप्रमाणें जाणें आपणांस अशक्य वाटूं लागतें. तीं माणसें जर पुन्हां आपल्यामध्यें आलीं, तर त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करण्यास आपण किती बरें झटूं! त्यांस जर आपण एखादे वेळेस टाकून बोललों असलों, किंवा आपल्या हातून त्यांच्या मनास दुःख होण्यासारखी एखादी गोष्ट झाली असली, तर त्याबद्दल आपणांस किती वाईट वाटतें! आमची त्यांच्यावर केवढी प्रीति आहे हें त्यांस समजावें अशा व्यर्थ आशेनें आम्हीं त्यांचीं उत्तरकार्यें आणि श्राद्धें करितों; आणि त्यांस उद्देशून आपल्या मनामध्यें असें ह्मणतों कीं, जर तुह्मी पुन्हां येऊन आपला समागम द्याल, व सदुपदेशाच्या चार गोष्टी सांगाल तर किती चांगलें होईल बरें!

मृत माणसांनीं जीवंतपणीं आपला काळ चांगलीं आणि खरीं कृत्यें करण्यामध्यें घालविला असला, तर तीं अजूनही आह्मांस आपला समागम देऊन सदुपचाराच्या गोष्टी सांगूं शकतील. त्यांचें उदाहरण मनामध्यें आणून आह्मीं नेहमीं सन्मार्गानें वागत

जाऊं; व त्यांच्या उपदेशपर व समाधानपर वचनांचें स्मरण होऊन आह्मांस या जगांतील कंटकयुक्त मार्गाचें आक्रमण सुसह्य होऊन जाईल. त्यांच्याप्रमाणें आह्मींही विपन्न स्थितीमध्यें आनंदवृत्ति ठेवून, संकटसमयीं धैर्याचें अवलंबन करून, दुःखामध्यें सहनशीलता दाखवून, आपलें प्रत्येक काम इमानें-इतबारें बजावून, आणि सर्वांबरोबर प्रीतीनें आणि खरेपणानें वागून आपल्या पश्चात् राहणाऱ्या लोकांस आपल्या वर्तनाचा कित्ता घालून दिला पाहिजे. ज्या स्थलीं आपल्या आयुष्याचे दिवस गेले त्या स्थलांतून आह्मीं नाहींसे झाल्यावर तेथें आपल्यामागें असे पुष्कळ लोक रहावे कीं ज्यांना आह्मी गेल्याबद्दल दुःख तर होत आहेच, परंतु ज्यांना आह्मी जन्मास आल्याबद्दल आनंदही होत आहे.

॥ समाप्त ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय